म. ग्रं. मं. ठाणें
विषय भू. प्रवास
सं. नं. १७८
१८५२

# झपाटलेला प्रवासी



REFBK-0007885

दंबरी : अनुवादक : भा. रा. भागवत

# झपाटलेला प्रवासी

अर्थात्

ऐंशी दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा

REFBK-0007885

पॉप्युलर बुक डेपो, मुंबई ७

प्रकाशक :

जी. आर. भटकळ
पॉप्युलर बुक डेपो,
लॅमिंग्टन रोड, मुंबई ७

प्रथमावृत्ति :
मार्च १९५२

मुद्रक :

वि. ग. भाटे
'विश्वकर्मा' मुद्रणालय,
टिळक रोड, पुणें २

मुखपृष्ठ :

दीनानाथ दलाल

मूळ फ्रेंच लेखक
ज्यूल व्हर्न
यांच्या कादंबरीचा
संक्षिप्त अनुवाद

किंमत दीड रुपया

# झपाटलेला प्रवासी

गेल्या वर्षी बालमित्र मासिकांतून क्रमाक्रमानें अवतरला;

त्या वेळीं त्याच्या प्रत्येक हालचालीची ज्यांनीं आतुरतेनें

वाट पाहिली, त्या

उत्साही बालवाचकांस

१३८९२
२१।८।५२
दा. क्र.
शाखा

# ज्यूल व्हर्न

## [१८२८-१९०५]

### आणि त्याचा

## फिलिअस फॉग

ज्यूल व्हर्नचा जन्म नॉन्त गांवीं झाला आणि तिथेंच त्याचें बाळपण गेलें. नॉन्त हें ल्वार नदीच्या पात्रांतलें एक लहानसें बेटच आहे. व्हर्नचें



आणि बापाचें कधीं पटलें नाहीं तरी त्याला आपल्या घराण्याचा फार अभिमान होता. तो म्हणतो, "माझी वंशावळ चाळायला मी बसतों तेव्हां मला सेनानी, न्यायधुरंधर, कायदेपंडित अन् खलाशी भेटतात." यांपैकीं शेवटच्या जातीचे लोक व्हर्नला विशेष आवडत. त्याच्या सबंध लिखाणांतून समुद्राचे वारे वाहाताहेत असें वाटतें. इतकेंच नाहीं, तर त्याच्या

वडिलांच्या कायदेविषयक कागदपत्रांनासुद्धा समुद्राचा खारा वास यायचा; कारण त्यांनीं लढवलेले बहुतेक खटले आयातनिर्यात मालाबाबत, गलबतांच्या विम्याबाबत किंवा खलाशांच्या भांडणाबाबत 'असायचे !

ज्यूल व्हर्नचे वडील विलक्षण कडक स्वभावाचे होते आणि घड्याळ हा त्यांचा आदर्श होता ! 'एक एक क्षण म्हणजे सोन्याचा कण' अशा अर्थाचीं सुभाषितें त्यांच्या शय्यागृहाच्या भिंतीवर लटकलेलीं असत. बापाच्या या काटेकोरपणाची ज्यूल व्हर्नच्या वाङ्मयावर किती छाप पडली आहे तें सांगायला नकोच. सेकंदाबरहुकूम आपले कार्यक्रम पाळून पैज जिंकण्याची हिरिरी बाळगणारा फिलिअस फॉग हा या काटेकोरपणाचा अर्क आहे.

आपल्या खऱ्या जीवनांत मात्र ज्यूल कितपत वक्तशीरपणें वागला असेल याबद्दल शंकाच वाटते. विद्यार्थिदशेंत त्याचें अभ्यासाच्या पुस्तकाकडे कधीं लक्ष नसे. क्रीडांगणावर मात्र तो चांगला चमकला. आपल्या मित्रांत तो विनोदी बोलणारा म्हणून प्रसिद्ध असे. त्यामुळें त्यानें बाराव्या वर्षीं जेव्हां अतिशय मेहनत घेऊन एक शोकान्तिका लिहिली आणि ती आपल्या मित्रांना वाचून दाखवली, तेव्हां ते 'वा, काय मजा आहे !' म्हणून खो खो हसत सुटले !

समुद्राचें वारें त्याच्या वृत्तींत इतकें भिरभिरत असे कीं अगदीं लहान असतांनाच तो एकदा घर सोडून पळाला. ती पहाटेची वेळ होती. सर्वांची नजर चुकवून ज्यूल बंदराकडे चालला. वाटेंत एका खाणावळीचे नांव दर्शवणारी पाटी होती. पाटीवर एक माकड, एक बाई आणि एक पोपट यांच्या घोळक्यांत बसलेल्या एका माणसाचें चित्र काढलेलें होतें. पाटीच्या खांबाला टेकून एक खराखुरा मुलगा बसला होता आणि तो मुसमुसून रडत होता. ज्यूलनें विचारलें, "कां रे बाबा रडतोस ?" मुलगा म्हणाला, "कोरॅली बोटीवर मी कॅबिनबॉय आहें. आमची बोट आज युरोप सोडून जायची. खूप खूप लांब जायची. मला जावंसं वाटत नाहीं. भीति वाटते."

ज्यूलच्या छातींत धडधड सुरू झाली. त्यानें उत्कंठेनें विचारलें, "कुठें जाणार तुमची बोट ?"

"हिंदुस्थान – चीन – जपान –"

हिंदुस्थान – चीन – जपान ! ज्यूल व्हर्नला आणखी काय हवें होतें ! सबंध पृथ्वीचा गोल त्याच्या डोळ्यांपुढून गरगर फिरूं लागला. मनानें तो केव्हांच दूरपूर्वेत जाऊन पोचला होता. तो एकदम म्हणाला, " तूं काळजी करूं नकोस. मी जाईन तुझ्या जागीं ! "

त्या मुलाला कोण आनंद झाला ! त्यानें लगेच ज्यूलला आपल्याबरोबर घेतलें आणि दोघेहां लहानशा मचव्यांत बसून कोरली बोटीकडे गेले. येथपर्यंत सगळें ठीक जमलें. या दोघांनीं काय काय थापा मारल्या असतील कोण जाणे, पण कप्तानानें ज्यूलला नोकरीवर घ्यायचें कबूल केलें. आणि आतां आगबोट सुटणार तोंच—

ज्यूलला कसला तरी धक्का बसला.

बंदराच्या धक्क्यावर निश्चल उभी असलेली एक उंच, कठोर चेहऱ्याची मूर्ति आपल्याकडे रोखून बघते आहे असें त्याला दिसलें.

ते ज्यूलचे बाबाच होते.

त्या वेळीं ज्यूलला काय वाटलें असेल याची तुम्ही कल्पना करूं शकाल का ?

वडिलांना पाहून ज्यूलला जो धक्का बसला तो निव्वळ भीतीचा किंवा दुःखाचा नव्हता. आपण जो मार्ग पत्करला तो कितपत शहाणपणाचा आहे याबद्दल ज्यूलला धाकधूक वाटूं लागली होती. त्याचें एक मन जगभर भराऱ्या मारीत होतें तर दुसरें मन त्याला सारखें टोचत होतें. घरीं कुणालाही न कळवतां त्यानें हें जें पाऊल टाकलें होतें त्याबद्दल त्याच्या बालमनाला नक्कीच पश्चाताप वाटत होता. त्यामुळें बाबा दिसल्याबरोबर त्याला एकदम हायसें वाटलें. पुढें घरीं गेल्यावर त्याला जो मार खावा लागला आणि जेवणाऐवजीं पावलोण्यावर राहावें लागलें, त्या शिक्षेचेंही त्याला कांहीं वाटलें नाहीं. तो आईला एवढेंच म्हणाला, " आतां यापुढें मी जे प्रवास करीन ते फक्त कल्पनेंतच. "

आणि खरोखरच त्यानें हें वचन अक्षरशः पाळलें. प्रत्यक्ष प्रवास त्यानें फारसा केला नाहीं; पण ज्या शेंकडों गोष्टी त्यानें लिहिल्या त्या सर्वांतून त्याची प्रतिभा अनिर्बंध संचार करीत राहिली. खगोल, भूगोल आणि भूगर्भ हे त्याचे आवडते विषय होते. भूगोलावर तर त्यानें गंभीर, माहिती-

पूर्ण पुस्तकेंसुद्धा बरींच लिहिलीं. 'पृथ्वीचा शोध' नांवाचा तीन भागांचा एक अभ्यासू ग्रंथ त्यानें पुरा केला. त्या काळीं शास्त्रीय शोधांमुळें प्रवासमार्ग सोपे बनत चालले होते. त्यामुळें नवे नवे देश पाहाण्याची उत्सुकता लोकांत वाढत होती. पण ज्यूलला दिसलें कीं सामान्य लोक जितके उत्सुक असतात तितके उद्योगी नसतात प्रवासाच्या गोष्टींचें ते केवळ तोंडीं–लावणें म्हणून उपयोग करतात. स्वतः हिंडून देश पाहाण्याची त्यांची तयारी नसते. आपल्या शेजारी देशांबद्दलही त्यांच्यांत भयंकर अज्ञान असतें. याचें एक उदाहरण त्यानें आपला मित्र प्रख्यात लेखक अलेक्झांद्र ड्यूमा याला सांगितलें, तें असें —

क्रिमिया प्रांतावरून तुर्कस्तानचें रशियाविरुद्ध युद्ध सुरू झालें तेव्हांची गोष्ट आहे. या युद्धांत इंग्लंड व फ्रान्स यांनीं तुर्कस्तानला मदत दिली होती. त्यामुळें तुर्कस्तानांतलीं इस्तबूल ऊर्फ कॉन्स्टॅन्टिनोपल, अंगोरा (आतां अंकारा, ) स्कुटारी वगैरे गांवांचीं नांवें लोकांना नव्यानेंच माहीत झालीं होतीं. त्यांना या दूरदेशांतल्या गांवांबद्दल खूप आतुरता वाटे. एकदा पॅरिसमध्यें कसल्याशा समारंभाच्या वेळीं नुकताच तुर्कस्तानांतून परतलेला एक पाहुणा हजर होता. त्याच्या भोवतीं श्रोत्यांचा घोळका जमला होता. त्यांतल्या एका सुंदर नखरेल स्त्रीनें पंख्यानें वारा घेत विचारलें, "खरंच तुम्हीं कॉन्स्टॅन्टिनोपल पाह्यलंत? कसं काय वाटलं? हें बॉस्फरस कीं फॉस्फरस म्हणतात तें काय आहे हो? तें अजिबात घेतां येत नाहीं म्हणे!... इतकं का हो तें जळजळीत असतं?" त्याच दिवाणखान्यांत दुसरी एक मूर्ति हजर होती. वार्धक्यानें सुरकुतलेला माणूस होता तो. पण त्याच्या छातीवर इतके बिल्ले लटकत होते कीं रणक्षेत्रावर या स्वारीनें गाजवलेल्या पराक्रमाबद्दल कुणाला शंकाच राहूं नये. अर्थात् तुर्कस्तानची त्याला खूपच माहिती असावी. तुर्कस्तानची कदाचित् असेल. पण इतर देशांबद्दल मात्र त्याला थापा मारण्याइतकेंच ज्ञान होतें. कारण तो कुणाला तरी शपथेवर सांगत होता कीं टांगानिका हें पोलंडमधलं एक शहर आहे!

ज्यूल व्हर्न म्हणतो कीं लोकांना भौगोलिक माहिती देणारीं पण त्यांची करमणूक करणारीं पुस्तकें लिहिण्याची कल्पना याच वेळीं प्रथम आपल्या मनांत आली. तिला अनुसरून लगेच त्यानें भराभर किती तरी

गोष्टी लिहिल्या; आणि अपार कीर्ति व संपत्ति मिळवली. १८७२ साली त्यानें 'ऐंशी दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा' ही कादंबरी लिहिल्याचें जाहीर झालें मात्र, त्याच्याकडे प्रकाशकांच्या मागण्या सुरू झाल्या. 'ला तें' या फ्रेंच साप्ताहिकानें ही कादंबरी क्रमश: प्रसिद्ध करण्याचें ठरवलें.

लोकांना या कादंबरीनें अक्षरश: वेड लावलें. वृत्तपत्रांतून एक एक प्रकरण क्रमश: छापून येई, त्याच्यावर वाचकांच्या उड्या पडत, आणि प्रकरण वाचून झाल्यावर पुढें काय होणार याची त्यांना चुटपुट लागे. आपल्याला अधांतरीं लोंबकळत सोडल्याबद्दल कांहीं वाचक चिडून कादंबरीकाराला धमक्याही देत. ज्यूल व्हर्नची कीर्ति अमेरिकेपर्यंत पोचली होती आणि तिथेंसुद्धा 'राऊंड दि वर्ल्ड' नें खळबळ उडवली होती. फिलिअस फॉगचा नवा विक्रम वाचण्यासाठीं तिथेंही लोक अधीरे बनत होते. फॉगच्या मागें डिटेक्टिव्ह फिक्स हात धुवून लागला तेव्हां ज्यूल व्हर्नचे वाचक त्याच्यावर भयंकर संतापले. हा चोंबडा माणूस आतां फिलिअस फॉगच्या सगळ्या बहाद्दुरीवर बोळा फिरवतो काय अशी त्यांना भीति वाटूं लागली. पण दुसऱ्या कांहीं वाचकांनीं मात्र छातीठोकपणें सांगितलें कीं 'फिक्स नाहीं, फिक्सचा बाप आला तरी हा पठ्ठ्या त्याला पाणी पाजील बघा!' फॉग आपली पैज जिंकणार कीं हरणार याबद्दल अमेरिकन वृत्तपत्रांच्या पॅरिसमधल्या बातमीदारांत पैजा लागल्या. फॉगनें 'पॅसिफिक कंपनी' च्या 'जनरल ग्रॅंट' बोटींत बसून याकोहामा सोडलें आणि पॅसिफिक महासागराच्या लाटांप्रमाणें वाचकांचीं हृदयेंही खालींवर होऊं लागलीं. त्याच वेळीं युरोप-अमेरिकेमधील बड्या बड्या आगबोट कंपन्यांतून निराळेच तरंग उठले......समजा, असें केलें तर?......ज्या बोटींतून हा झपाट-लेला प्रवासी चालला आहे ती बोट आपल्या कंपनीची असेल तर आणखीच बहार नाहीं का होणार? तसें झालें तर आपल्या कंपनीची केवढी मोठी जाहिरात होईल!

कल्पना सुचण्याचा अवकाश, आगबोट कंपन्यांकडून ज्यूल व्हर्नवर पत्रांचा मारा झाला. 'फिलिअस फॉगनें पॅसिफिक महासागर आधींच ओलांडला. त्याला इलाज नाहीं. पण आतां अॅटलांटिक पार होतांना

तरी या साहेबबहाद्दुरांना आमची बोट द्या की! आगबोटीला नांव निवडाल तें फक्त आमच्या कंपनीच्या बोटीचं निवडा एवढीच अट. आम्ही तुम्हांला अमुक अमुक रक्कम देऊं' असा त्यांनीं लकडा लावला. फॉगनें आपल्याच बोटीवर चढावें म्हणून या कंपन्यांत चढाओढ लागली. पण फॉग कुणाच्याच बोटींत चढला नाहीं. कारण त्याचा सूत्रधार ज्यूल व्हर्न असा विचित्र कीं त्यानें या सर्व मागण्या धुडकावून तर लावल्याच, पण जणूं कांहीं या सगळ्या कंपन्यांवर सूड उगवण्यासाठी त्यानें फॉगला एक मामुली बोट वापरायला दिली. ही बोट कोणत्याही बड्या कंपनीची नव्हती. ती मामुली तर होतीच, पण जुनाट व मोडकळीला आलेली होती. 'हेन्रिएटा' हें तिचें नांव. या मोडक्या खोक्यालाही व्हर्ननें फार काळ जिवंत ठेवलें नाहीं. आपल्या कथानायकाच्या हस्तेंच त्यानें तिची होळी पेटवली. हें करतांना आगबोट कंपन्यांनीं देऊं केलेल्या जंगी रकमा व्हर्नच्या डोळ्यांपुढें उभ्या राहिल्या असतील आणि त्याच्या विनोद-बुद्धीला अगदीं गुदगुल्या झाल्या असतील, नाहीं?

व्हर्नचा कथानायक अखेरीस लंडनला पोचतो कीं नाहीं याबद्दल युरोप-अमेरिकेंत पराकोटीचें कुतूहल निर्माण झालें. शेवटच्या क्षणीं अवसानघात करणाऱ्या विघ्नसंतोषी फिक्सला तर खाऊं कीं गिळूं असें फॉगच्या भक्तांना झालें. आणि शेवटीं——

फिलिअस फॉगच्या या अचाट प्रवासाचें नाटक करून रंगभूमीवर आणावें असें एका धाडसी दिग्दर्शकानें ठरवलें. त्याप्रमाणें नटांचा संच, पडदे, पुठ्याचे व लाकडी देखावे वगैरे गोष्टींची जमवाजमव त्यानें केली. पृथ्वीप्रदक्षिणेचें हें नाटक रंगभूमीवर आणायचें म्हणजे केवढा उपद्व्याप असेल याची तुम्हीच कल्पना करा. पण इच्छा असली कीं मार्ग निघतो त्याप्रमाणें त्या चतुर प्राण्यानें कोणतीही गोष्ट करायची बाकी ठेवली नाहीं. आगगाडी पाहिजे, आगगाडी आणली; तिच्या-साठीं स्टेजवर रूळ टाकले. आगबोट पाहिजे, आगबोट आणली; तिच्यासाठीं कृत्रिम समुद्र तयार केला. योग्य वेळीं आगबोट भस्मसात् सुद्धा केली. एवढ्यानें भागलें नव्हतें. विंध्याद्रीच्या अरण्यांतला प्रवास खरोखरच हत्तीवरून केला नाहीं तर तो फिलिअस फॉग कसला!

नाटक निर्मात्याच्या हें पूर्णपणें ध्यानांत होतें आणि त्यानें मुद्दाम लंडनच्या प्राणि संग्रहालयांतला खास हत्ती दर प्रयोगाला २०० फ्रँक एवढें जबरदस्त भाडें देऊन मागवला होता. राणीचा बाग सोडून कुठेंही न जाणारे हे गजराज अशा रीतीनें क्रमानें बोटींत व आगगाडींत बसून पॅरिसला गेले आणि तिथल्या पोर्त सां मार्ता थिएटरांत नट म्हणून चमकले. आणि खरोखरच ते असे चमकले कीं ज्याचें नाव तें! लंडनच्या या शुंडाधरानें पॅरिसची रंगभूमि दणाणून सोडली. गंधर्व मंडळींचें नाटक पाहायला जाणारे लोक जसे मुख्यतः बालगंधर्वांच्या गाण्यासाठीं जात, तसे 'ऐंशी दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा' हें नाटक बघायला जाणारे बहुतेक प्रेक्षक हत्तीचें काम बघायला जात. सतीचा प्रसंग पाहतांना त्यांच्या अंगावर कांटा उभा राही आणि या संकटांतून पासपार्तूच्या चातुर्यामुळें पार पडल्यावर आपले धाडसी प्रवासी पुन्हा हत्तीवर स्वार होऊन त्याला पिटाळतात तेव्हां टाळ्यांचा कडकडाट होई. पण जेव्हां फॉग हत्तीचें दान करून टाकतो तेव्हां प्रेक्षक हळहळत आणि आपला लाडका नट रंगभूमीवरून चालला म्हणून दुःखाश्रु ढाळीत. आपल्या गांववाल्या हत्तीच्या दिग्विजयाचें वृत्त एक दिवस लंडनच्या लॉर्ड मेयर-साहेबांना कळलें आणि आपल्या लवाजम्यानिशीं त्यांनीं एकदा पॅरिसच्या थिएटरांत पायधूळ झाडली. रंगभूमीच्या आंत बसलेला ज्यूल व्हर्न कंपनीच्या मॅनेजरांना भीत भीत विचारी, "कसं काय चाललंय् बाहेर?" मॅनेजरचा गल्ला भरत चालला होता; तो अगदीं मनापासून मान डोल-वीत म्हणे, "उत्–कृष्ट!"

व्हर्नला मात्र आपल्या आवडत्या कथानकाचें हें अगडबंब विडंबन पाहून काय वाटलें असेल हें नक्की सांगणें कठीण आहे. कदाचित् पासपार्तू-प्रमाणें त्यानेंही चक्क बोंब मारली असेल हें अगदींच अशक्य नाहीं. पण असें मात्र सांगतात, कीं नाट्यप्रयोग यशस्वी झाल्याचें ऐकून एका मित्रानें जेव्हां त्याचें अभिनंदन केलें तेव्हां व्हर्ननें उत्तर दिलें, "या यशाचं श्रेय मला देऊं नका. हत्तीला द्या!"

एकोणिसाव्या शतकाला प्रवासयुग हें नांव शोभेल. कितीतरी लोकांना त्या काळीं प्रवासाचा छंद लागलेला होता. त्यांत व्हर्ननें आणखी भर

घातली. अमुक वेळांत तमुक प्रवास पार पाडण्याच्या पैजा लागूं लागल्या. ज्या दिवशीं 'पृथ्वीप्रदक्षिणा' रंगभूमीवर यायची होती त्याच दिवशीं एक हंगेरियन तरुण पॅरिसमध्यें येऊन दाखल झाला आणि त्यानें ज्यूल व्हर्नची गांठ घेतली. व्हिएन्ना-पॅरिस हें अंतर आपण घोड्यावरून १५ दिवसांत तोडलें असें त्यानें सांगितलें.

पण हें कांहींच नाहीं. 'फॉग हें पात्र काल्पनिक असेल. पण त्यानें सुरू केलेला प्रवास जर कोष्टकाला धरून होता तर त्यांत अशक्य असें काय आहे? आपणही असा विक्रम करूं' अशा निर्धारानें कांहीं धाडसी प्रवाशांनीं कंबरा कसल्या. नेली ब्लाय नांवाची बावीस वर्षांची तरुणी 'न्यूयॉर्क वर्ल्ड' पत्राची बातमीदार होती. या बाईला 'फिलिअस फॉगची स्त्री-आवृत्ति' अशी पदवी द्यायला हरकत नाहीं. आपल्या स्फूर्तिदात्या फॉग-प्रमाणेंच तिच्या मनांत आलें कीं आपण फॉगपेक्षां कमी वेळांत जगप्रवास करावा. लगेच आपल्या छोट्या बॅगेंत तिनें चार किरकोळ कपडे कोंबले आणि तडकाफडकीं त्याच दिवशीं ती न्यूयॉर्कहून निघाली. पॅसिफिक महासागरांतून जातांना तिची बोट वादळांत सांपडली. एक एक क्षण मोलाचा असतांना आगबोटीचा वेग मात्र सारखा मंदावत होता. पण ती शूर मुलगी मुळींच हताश न होतां म्हणाली, "मी वाटेंत मेलें तरी बेहत्तर, पण माझं प्रेत वेळेवर पोचलं पाहिजे. जिवंतपणीं न्यूयॉर्कला पोचायचं असेल तर ८१ व्या दिवशीं पोचण्याची माझी तयारी नाहीं."

आणि नेली न्यूयॉर्कला पोचली ती फॉगपेक्षां एक आठवडा आधींच. ७२ दिवसांत तिनें पृथ्वी-प्रदक्षिणा केली आणि न्यूयॉर्कच्या नागरिकांनीं प्रचंड उत्साहानें तिचें स्वागत केलें. फोर्ट ग्रीन किल्ल्यांतून तिच्या सन्मा-नार्थ तोफा डागण्यांत आल्या.

यानंतर पुढल्याच वर्षी 'एको द पारी' या फ्रेंच पत्राचा बातमीदार स्तेग्लर हाही जगाच्या प्रवासाला निघाला. अवघ्या ६३ दिवसांत आपला प्रवास पुरा करून तो फ्रान्समध्यें परतला. या वेळीं ७३ वर्षांचा ज्यूल व्हर्न अमीआन् शहरीं स्थायिक झालेला होता. त्याला ही बातमी कळली तेव्हां स्तेग्लरची आगगाडी आमीआनवरून जात असतां व्हर्ननें मुद्दाम स्टेशनवर जाऊन त्याच्याशीं हस्तांदोलन केलें. स्तेग्लरचें अभिनंदन करून

तो म्हणाला, " पण काय हो, बरोबर आवडा दिसत नाहीं ! "

स्तेग्लरनें हसून उत्तर दिलें, " सत्य हें कधीं कधीं कल्पनेपेक्षां भिकार असतं तें असं. सबंध प्रवासांत मला ती भेटलीसुद्धा नाहीं बघा ! "

ज्यूल व्हर्ननें आपलें अखेरचें आयुष्य अमीआन् शहरींच घालवलें. त्याच्या लेखनाचा सपाटा मात्र सारखा चालू होता. तो इतकें लिहितो कसा याचेंच लोकांना आश्चर्य वाटे. पुष्कळांना तर अशीही शंका येई कीं 'ज्यूल व्हर्न' या नांवानें जें अफाट यश मिळवून दिलें त्याचा प्रकाशक फायदा घेत आहे. वास्तविक अलीकडे व्हर्न स्वतः लिहीत नसून दुसरेच लेखक त्याच्या नांवाखालीं लिहीत असावेत. पण व्हर्नच्या अखेरीच्या गोष्टी पूर्वीं इतक्या बहारदार नसल्या तरी तें सर्व विपुल लिखाण एकट्या ज्यूल व्हर्नचेंच होतें, हें त्यानें स्वतः सांगितलेल्या माहितीवरून कळतें.

म्हातारपणीं व्हर्न बहिरा झाला तेव्हां त्यानें गमतीनें म्हटलें, " बरं झालं. आतां फालतू गोष्टी ऐकायला नकोत ! " मधुमेहाच्या विकारानें तो बिछान्याला खिळला आणि त्यांतच त्याला मरण आलें.

ज्यूल व्हर्नचें नांव त्या वेळीं सर्वतोमुखीं झालेलें होतें. मोठमोठ्या लोकांना हेवा वाटावा अशी लोकप्रियता त्याला लाभलेली होती. त्याच्या आजारपणांत युरोपमध्यें प्रशियन युद्धाचा डोंब उसळला होता. पण बहुतेक वृत्तपत्रांनीं युद्धवार्तेपेक्षांही जास्त महत्त्व देऊन ज्यूल व्हर्नवरचे मृत्युलेख छापले.

•

## ज्यूल व्हर्नचें वाङ्मय वैशिष्ट्य

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत युरोपखंड एका मोठ्या क्रांति-काळांतून बाहेर पडत होतें. यंत्रयुगाचा प्रारंभ निश्चितपणें झालेला होता. यंत्रनिर्मित सुखसोयींची लोकांना संवय होत होती. वाहनांच्या विविधतेमुळें

प्रवास सुखकर बनत होता. विज्ञानाचा विकास होत होता. नवे नवे शोध लागत होते. अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य कोटींत येत होत्या. शास्त्रीय प्रगति ज्या झपाट्यानें होत होती त्या मानानें तिच्यांत दडलेले दोष अजून नजरेला आलेले नव्हते. त्यामुळें लोकांचीं मनें उत्फुल्ल बनलीं होतीं. गरुडासारखीं भराऱ्या मारीत होतीं. सर्व दुःखावर त्यांना एक तोडगा सांपडला होता. तो म्हणजे विज्ञान !

वाङ्मयांतही क्रान्ति होत होती. अद्‌भुत आणि रम्य हें लोकांना नेहमींच हवें असतें. पण जुन्या धर्तीच्या अद्‌भुत कथा लोकांना आतां नकोशा झाल्या होत्या. त्यांना नवीन कांहींतरी हवें होतें. तें नवीन त्यांना ज्यूल व्हर्ननें दिलें.

ज्यूल व्हर्न हा त्या काळांतला एक वाङ्मयीन चमत्कार होता. लहानपणीं त्याच्या वडिलांनीं त्याला वॉल्टर स्कॉटच्या गोष्टी सांगितल्या. त्यामुळें तो स्कॉटचा भक्त बनला होता. पुढें अलेक्झांद्र ड्यूमा व एड्‌गर ॲलन पो यांनीही त्याच्यावर मोहिनी टाकली. अशा रीतीनें इंग्लिश, फ्रेंच आणि अमेरिकन अशा तीन राष्ट्रांतल्या लेखकांनीं ज्यूल व्हर्नचा सांचा तयार केला ! हे तिघेही लेखक अद्‌भुतरम्यतेचे उपासक होते. पण स्कॉट व ड्यूमा यांची मनें इतिहासांतल्या अद्‌भुतांत रमत. पो हा अद्‌भुत रहस्यकथा लिहिण्याबद्दल प्रसिद्ध होता. ज्यूल व्हर्नची अद्‌भुतरम्यता हे दोन्ही पंथ सोडून तिसरीकडेच वळली. भूत काळाऐवजीं त्याचें मन भविष्यकाळांत वावरूं लागलें आणि थक्क करून सोडणाऱ्या लढायांऐवजीं थक्क करून सोडणारे शास्त्रीय शोध त्याला आवडूं लागले. स्कॉटच्या कथा-नायकांजवळ नेहमीं तलवारी व ढाली असत; व्हर्नचे कथानायक घड्याळें दुर्बिणी घेऊन हिंडत. राक्षसभुतांऐवजीं राक्षसी यंत्रांशीं त्यांची गांठ पडे. नागलोकांत आणि स्वर्गांत जाण्याऐवजीं ते पाताळ किंवा चंद्रलोकावर स्वारी करीत. ज्याला प्रत्यक्ष प्रवास करण्याची कधीं संधी मिळाली नाहीं त्या ज्यूल व्हर्नच्या लेखणीनें तिन्ही लोकांत संचार केला हें एक अद्‌भुतच नाहीं का ? व्हर्नच्या प्रतिभेला मुळीं धरबंधच नव्हता. पृथ्वीप्रदक्षिणेप्रमाणें तिनें अंतराळांत उड्डाण केलें, सप्तसागरांत बुड्या मारल्या, इतकेंच नव्हे तर पाताळाचा छेद केला. त्याचें हें परिभ्रमण मति कुंठित करणारें होतें; पण

त्याला विज्ञानाचा आधार होता. ज्यूल व्हर्न जे जे चमत्कार वर्णन करी ते त्या काळीं विलक्षण वाटले तरी अशक्य कोटींतले नव्हते. कारण व्हर्न केवळ खळबळ माजवण्यासाठीं लिहीत नव्हता. तो आपल्या चमत्कारांना संशोधनांचा आधार सांगे, शास्त्रीय ग्रंथांतले उतारे देई, अशक्य वाटणाऱ्या गोष्टी गणितानें सिद्ध करी. त्याची दूरदृष्टि इतकी विलक्षण होती कीं पुढें घडणारे कितीतरी क्रांतिकारक शोध – उदाहरणार्थ, टेलिफोन, ग्रामोफोन, विमान, सबमरीन – त्यानें आधींच हेरून ठेवले होते. त्याच्या कादंबऱ्यांतले कितीतरी चमत्कार वीसपंचवीस वर्षांतच आश्चर्यकारक रीतीने खरे ठरले; आणि १९०० सालीं एका टीकाकाराला असें नमूद करावें लागलें कीं "गेलीं वीस वर्षं आपण व्हर्नच्या कादंबऱ्या जगत आलों आहों!"

'ऐंशी दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा' हीच व्हर्नची त्यांतल्या त्यांत कमी चमत्कारिक कादंबरी आहे. कारण फिलिअस फॉग स्वत: चमत्कारिक माणूस असला तरी त्यानें वापरलेलीं वाहनें व साधनें त्या काळीं उपलब्ध अशींच होतीं. त्यांत शास्त्रीय चमत्कार नव्हता. घड्याळाबरहुकूम वागण्याचें असामान्य कौशल्य (सामान्य माणसाला हें खरोखर अशक्यच होतें. कारण सामान्य माणूस चुका करतो आणि चूक करायची नाहीं हा तर फिलिअस फॉगचा कटाक्ष होता!) हाच या कादंबरींतला खरा चमत्कार आहे.

घड्याळ हा व्हर्नच्या वडिलांचा आदर्श होता हें वर सांगितलेंच आहे. व्हर्नच्या सर्व कथानायकांचाही तोच आदर्श होता. कांटेकोरपणानें वागणें आणि चुका न करणें हें या पात्रांचें वैशिष्ट्यच! एक लक्षांश इंचापासून तों परार्ध मैलांपर्यंत कोणत्याही संख्येचा विचार करतांना आपण बिनचूक वागलों तर आज ना उद्यां प्रतिसृष्टि निर्माण करूं असें व्हर्नसारख्यांना वाटे. विज्ञानावर त्याची एवढी श्रद्धा होती याचा अर्थ तो नास्तिक होता असा मात्र नाहीं. ईश्वरी शक्तीवर त्याचा पूर्ण विश्वास होता.

'मास्टर झकेरिअस' नावाचें एका स्विस घड्याळजीच्या जीवनावरचें नाटक त्यानें लिहिलें. त्या नाटकाचा हा सांगाडा बघा म्हणजे ही गोष्ट तुमच्या लक्षांत येईल ––

घड्याळजीचें आयुष्य संपुष्टांत येत असतें; आणि स्वर्गांत काळपुरुष

त्याच्या आत्म्याची वाट पाहात असतो.

घड्याळावर सुभाषितें लिहिलेलीं दिसतात. तीं सारखीं बदलतात.

५ वाजतां : मानवानें ज्ञानवृक्षाचें फळ खावें.

१० ,, : मानवाला ईश्वर होणें शक्य आहे.

११ ,, : मानवानें विज्ञानाची गुलामगिरी पत्करावी; आणि तेवढ्यासाठीं आईबापांचा व कुटुंबाचा त्याग करावा.

मध्यरात्रीं : अकस्मात् घड्याळावर दैवाचा आघात होतो आणि आतां पुढील सुभाषित दिसूं लागतें—ईश्वराची बरोबरी करूं पाहील तो कायमचा नरकांत पडेल!

व्हर्नच्या लेखनशैलीवर ह्यूमाचा प्रभाव पडलेला दिसतो. सोपीं त्रोटक वाक्यें, चटकदार संवाद आणि वाचकांची उत्कंठा वाढवण्याची हातोटी हे त्याच्या लिखाणांतले गुण होत. आपला दावा सिद्ध करण्यासाठींच तो पुष्कळदा संभाषणाची योजना करतो आणि अशा वेळीं त्याच्या संवादांतलें चापल्य पाहिलें कीं आपण सिनेमांतलें एखादें द्वंद्व पाहातों आहों असा भास होतो.

## : १ : ओळख

एका चमत्कारिक माणसाची ही गोष्ट आहे. सर्वसाधारण लोक त्याला तऱ्हेवाईक म्हणतील, विक्षिप्त म्हणतील, माथेफिरूसुद्धा म्हणतील. पण खरें बोलायचें तर त्याच्याइतका थंड माथ्याचा माणूस विरळा. आणि वृत्ति थंड असूनदेखील त्याचें धाडस जबरें होतें. आपण नेहमीं पाहतों, कीं थंड प्रकृतीचे हिशेबी लोक हे बहुतेक धोपटमार्गी असायचे हें ठरलेलें. ते नेहमीं नाकासमोर जायचे. अनोळखी रस्ता त्यांना वर्ज्य. भलभलतें साहस तर ते कधींच करायचे नाहींत.

आमच्या या कथेचा नायक तसा नव्हता. त्यानें एवढें भयंकर अचाट साहस केलें, कीं त्याची हकीकत वाचून तुम्ही तोंडांत बोट घालाल. पण तें प्रचंड साहस करतांना त्याच्या मनाची जरासुद्धा चलं-बिचल झाली नाहीं. या चक्कर माणसाचें डोकें शेवटपर्यंत ताळ्यावर होतें. आणि त्याचा प्रत्येक विक्रम त्यानें कोष्टकांत बसवून पार पाडला होता. पण आतां जास्त प्रस्तावना कशाला? सांगतोंच तुम्हांला त्याची

सगळी विचित्र हकीकत—

सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. आमचा विक्षिप्त कथा-नायक लंडनच्या सेव्हिल रो रस्त्यावर सात नंबरच्या घरांत राहात असे. फिलिअस फॉग हें त्याचें नांव. तो ज्या घरांत राहायचा, त्यांत पूर्वीं इंग्लंडमधल्या शेरिडन नांवाच्या प्रसिद्ध नाटककारानें वस्ती केली होती. पण त्याच्याशीं आपल्याला कांहीं करायचें नाहीं. फिलिअस फॉगचें जीवन कसें नाट्यमय होतें तेवढेंच आपण पाहूं या.

फॉग म्हणजे धुकें. आणि खरोखर धुक्यासारखेंच त्याचें तें जीवन होतें. बाहेरच्या लोकांना त्याचा कांहीं पत्ता लागत नसे. तो आपला सदोदित स्वतःच्या कामांत गुरफटलेला असे. खोली सोडून तो क्लब-खेरीज कुठें जायचा नाहीं. लंडन सोडून तर तो कधींच कुठें गेला नाहीं. लंडनला जवळजवळ बारा महिनें धुकें असतें म्हणतात. हे 'श्रीयुत धुके' पण तसेच—लंडन शहराची पाठ सोडीत नव्हते. आपल्या त्या छोटेखानी घरांत तो एकटाच राहात असे. त्याच्याकडे कोणी येत नसे आणि तो कोणाकडे जात नसे. त्याचा उद्योग कसला होता हेंही अर्थात् कोणाला माहीत नव्हतें. पण मला मात्र तें माहीत आहे; तेव्हां सांगून टाकतों तुम्हांला एकदमच. त्याचा तो उद्योग म्हणजे वर्तमानपत्रांचें वाचन. सकाळीं उठल्यापासून तों संध्याकाळीं दिवस मावळेपर्यंत हा गडी लंडनचीं झाडून सगळीं वर्तमानपत्रें चाळीत बसायचा! न्याहारी झाल्यावर तो एकदा क्लबांत जाई. तिथेंही त्याचा कार्यक्रम ठरलेला असे. तो म्हणजे वर्तमानपत्रांचें वाचन आणि पत्यांचा एक ठराविक डाव. तेवढा खेळून झाला कीं तो परत घरीं जाई.

घरांत तो एकटाच राही असें मीं म्हटलें, पण त्यांत थोडा फरक करायला हवा. फिलिअस फॉगनें एक विश्वासू नोकर बाळगलेला होता. त्याचें नांव पासपार्तू. पासपोर्ट म्हणजे काय तें माहीत आहे ना

तुम्हांला? पासपार्तूचा जवळ जवळ अर्थ तसाच. वाटेल तिकडे जाण्याचा परवाना! पासपार्तू या फ्रेंच शब्दाचे दोन अर्थ आहेत. एक म्हणजे गुरुकिल्ली किंवा कोणतेंही कुलूप उघडणारी किल्ली आणि दुसरा म्हणजे कोणत्याही कामीं उपयोगी पडणारा जिन्नस—किंवा माणूस! आणि पासपार्तू होताही तसाच. आपल्या मालकाचा तो हरकाम्या गडी होता.



फिलिअस फॉग

फिलिअस फॉग हा भयंकर हिशेबी माणूस होता हें मीं सांगितलेंच. इतका हिशेबी कीं आपल्या नेहमींच्या कार्यक्रमांत काडीचा बदल झालेला त्याला खपत नसे. ज्या वेळची गोष्ट त्या वेळींच झाली पाहिजे; त्यांत पाव मिनिटाचा उशीर झालेला फॉगला चालत नसे. यंत्रासारखें त्याचें आयुष्य होतें आणि त्यामुळें त्याच्या गड्याचीं कामेंही यंत्रासारखीं ठरलेलीं असत. फॉगसाहेब पासपार्तूवर अगदीं खूष होते, कारण त्यांना जो घड्याळा-सारखा वक्तशीरपणा हवा होता तो पासपार्तू कटाक्षानें पाळी. असा नोकर यापूर्वी त्यांना मिळालेला नव्हता. पासपार्तू आपल्याला मिळाला तो दिवस भाग्याचा असें त्यांना राहून राहून वाटे.

तो दिवस म्हणजे १८७२ सालच्या ऑक्टोबर महिन्याची दुसरी तारीख. त्या वेळीं जेम्स फॉर्स्टर नांवाचा इसम फॉगसाहेबांकडे नोकरीला होता. पण साहेबांनीं त्याला नुकतीच

नोटीस दिली होती. आणि त्याचें कारण असें कीं साहेबांना हजामती-साठीं ८६ अंश उष्णतेचें पाणी लागे त्याऐवजीं या इसमानें ८४ अंशांपर्यंतच तापलेलें पाणी दिलें. अर्थात् त्यामुळ साहेबांचें डोकेंच गरम झालें आणि गड्याला त्यानीं तेथल्या तेथें रजा दिली. आतां फॉर्स्टर जाण्याच्या तयारींत होता. नवा उमेदवार येण्याची वेळ झाली होती. तो एकदा आला कीं त्याच्या हातीं सगळा कारभार सोंपवून फॉस्टर आपल्या विचित्र मालकाचा निरोप घेणार होता.

साडेअकराचा ठोका पडल्यावरोबर फिलिअस फॉग क्लबांत जाण्या-साठीं उठला. पण त्याच क्षणीं बाहेरच्या दरवाजावर थाप ऐकूं आली. जुन्या नोकरानें जाऊन दार उघडलें आणि आंत मालकाला वर्दी दिली, " नवा नोकर आला आहे, साहेब. "

त्याच्याच मागोमाग नवा नोकर आंत आला आणि त्यानें फॉग-साहेबांना सलाम केला.

" तूं फ्रेंच आहेस, नाहीं का ? " फॉगनीं विचारलें, " आणि तुझं नांव जॉन म्हणून लिहिलं आहेस तूं ! "

" जॉन उच्चार नाहीं साहेब त्याचा. जीआं. मी फ्रेंचमन आहें. माझं आडनांव पासपार्तू. मला लहानपणापासून इकडे तिकडे भटका-यची आवड आहे, त्यामुळें मला हें नांव लोकांनीं चिकटवलं. कस-ल्याही अडचणींत सांपडलों तरी त्यांतून निभावून जातों अशी माझी ख्याति आहे. आणखीन् कांहीं माहिती सांगूं, साहेब ? "

" कांहीं जरूर नाहीं " फॉगसाहेबांनीं निर्णय दिला. " तुझ्याबद्दल माझ्याकडे जीं शिफारसपत्रें आलीं तीं सगळीं चांगलीं आहेत. मला तर तूं ठीक दिसतोस. पण कामाबद्दलच्या माझ्या शर्ती कबूल आहेत ना तुला ? "

" शंभर टक्के कबूल आहेत, साहेब. "

"मग फार चांगलं. आतां, या क्षणापासूनच .... म्हणजे तारीख दोन ऑक्टोबर अठराशें बहात्तर रोजीं सकाळचे साडेअकरापासून तूं माझ्या नोकरींत रुजू झालास असं समजायचं."

अशा रीतीनें फिलिअस फॉगनें झटपट नव्या नोकराची नेमणूक करून टाकली. मग तो खुर्चीवरून उठला; खुंटीवरची हॅट त्यानें डाव्या हातानें काढली आणि डोक्यावर ठेवली. तीदेखील अशी कीं जणूं कांहीं एखादें यंत्रच काम करतें आहे. नंतर एक शब्दही न बोलतां तो क्लबांत निघून गेला.

साहेब निघून गेल्याचें पासपार्तूला कळलें; कारण बाहेरचा दरवाजा लागल्याचा आवाज झाला. थोड्या मिनिटांनीं पुन्हा एकदा दरवाजाचा आवाज झाला. पासपार्तूनें ओळखलें, कीं पूर्वींचा नोकर जेम्स फॉर्स्टर निघून चालला आहे; आतां हें घर राखण्याची सर्व जबाबदारी आपल्यावर येऊन पडली.

## : २ : चालतें बोलतें घड्याळ

**कामाला** सुरवात करण्यापूर्वींच एकदा घराची संपूर्ण पाहणी करावी असें पासपार्तूनें ठरवलें आणि त्याप्रमाणें पोटमाळ्यापासून ते तळघरापर्यंत घराचा कोनान् कोपरा तो हिंडून आला. आपली स्वतःची खोली कोणती तेंही ओळखायला त्याला उशीर लागला नाहीं. दुसऱ्या मजल्यावर त्याची खोली होती आणि एकंदरींत पाहतां ती

चांगलीच सोयिस्कर होती. त्या खोलींत अद्ययावत् अशा सर्व सोयी होत्या. अर्थात् अद्ययावत् म्हणजे त्या काळीं जेवढ्या उपलब्ध तेवढ्या सोयी. विजेची घंटा होती आणि टेलिफोनही होता. त्या काळीं आजच्यासारखा दूरपर्यंत बोलूं देणारा विजेचा टेलिफोन नसे. घरांतल्या घरांत मालकाचे हुकूम नोकराला ऐकूं जावेत म्हणून एक नळी नेलेली असे. तोच त्या काळचा टेलिफोन. ' बोलायची नळी ' असेंच म्हणत त्या 'यंत्रा'ला !

इंग्लंडमध्यें हवेंत नेहमींच गारठा असल्यामुळें प्रत्येक खोलींत शेगडी पेटती ठेवण्याची पद्धत आहे. ही शेगडी म्हणजे भिंतींतच बांधून काढलेलें चांगलें प्रशस्त चुलाण असतें. पासपार्तूच्या खोलींतही अशी मोठी शेगडी होती आणि शेगडीच्या वरच्या बाजूला पुढें आलेल्या चुनेगच्ची भिंतीचा कठडा केलेला होता. ही भिंत वरून चांगली सपाट गुळगुळीत असून किरकोळ जिनसा ठेवण्यासाठीं तिचा फळीप्रमाणें उपयोग करीत असत. पासपार्तूनें पाहिलें तर भिंतीवर ठेवलेल्या जिनसांत टिकटिक वाजणारे एक टाइमपीस होतें. तें साधें घड्याळ नसून विजेचें होतें आणि फॉगसाहेबाच्या झोपायच्या खोलींतल्या घड्याळाशीं तें जोडलेलें होतें. याचा उद्देश अर्थात् कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखा आहे. मालकानें सांगितलेल्या कामाला सेकंदाचाही उशीर नोकराकडून होऊं नये म्हणून ही तजवीज असे. नोकराची चूक झाली तर, ' काय कीं बुवा ! माझ्या घड्याळांत अजून इतके इतकेच वाजताहेत ' असें म्हणून त्यानें खाका वर करून मोकळें होऊं नये म्हणून हा बंदोबस्त होता. दोन्ही घड्याळें जोडलीं असल्यामुळें त्यांच्या वेळेंत सेकंदाचीही तफावत राहात नसे.

आपल्या खोलींतलें घड्याळ पासपार्तूनें हलकेंच उचलून पाहिलें. कारण खालीं एक जाड कागद ठेवलेला त्याला आढळला. या कागदावर नोकराच्या कामाचें संपूर्ण वेळापत्रक लिहिलेलें होतें. सकाळीं साडेसात वाजतां फिलिअस फॉग उठे. तेव्हांपासून तो साडेअकरा वाजतां क्लबांत जाण्याकरतां बाहेर पडेपर्यंत त्याच्या कार्यक्रमांतल्या बारीक-सारीक सर्व गोष्टी वेळापत्रकांत नमूद केलेल्या होत्या. सात वाजून त्रेपन्न मिनिटांनीं त्याला चहा व टोस्ट लागे. नऊ वाजून तीन मिनि-टांनीं हजामतीचें पाणी हजर करण्याचा हुकूम होता. नंतर पावणेदहा वाजेपर्यंत साहेबांचें स्नान, केस विंचरणें वगैरे चाले. त्या वेळीं साहेबांना काय हवें नको तें पाहण्यासाठीं नोकरानें जवळ हजर राहण्याचा शिरस्ता होता. जेव्हां साहेब घरीं जेवत तेव्हां जेवणांतल्या पदार्थांची नांवनिशी प्रत्येक वाराप्रमाणें ठरलेली असे. सोमवारची कोशिंबीर मंगळवारीं करणें किंवा बुधवारची भाजी गुरुवारीं शिजवणें हा अक्षम्य अपराध गणला जाई. जेवतांना टेबलावर कोणत्या पदार्थाचें भांडें कुठें ठेवायचें हें देखील ठरलेलें असें. भांड्यांच्या जागा बदलणें किंवा कांट्याचमच्यांचीं टोकें भलत्या दिशेला करून ठेवणें हेंही महत्पाप मानलें जाई.

साहेब रात्रीं बारा वाजतां दिवा मालवून झोपीं जात. तोंपर्यंत नोकरानेंही भांडीं घासणें, दरवाजे लावणें वगैरे कामें उरकून टाकायचीं; आणि मगच, मालकांनीं दिवा मालवलेला दिसल्यावर आपण झोपायचें असा शिरस्ता होता.

पासपार्तूनें हें सर्व वेळापत्रक अतिशय काळजीपूर्वक वाचलें आणि पाठ केलें. कारण पासपार्तू स्वतःही फार नियमित माणूस होता. शिवाय तो नोकरी टिकवायला आलेला होता, घालवायला नाहीं!

# : ३ : पैज



पासपार्तू

**तो** यंत्रासारखा माणूस फिलिअस फॉग ठीक साडेअकरा वाजतां घराबाहेर पडला हें मीं तुम्हांला सांगितलेंच. खरें म्हणाल तर बरोबर ठोक्याला कांहीं तो घर सोडूं शकला नाहीं. कारण नव्या नोकराची रुजवात करण्यांत त्याचें अगदींच नाहीं म्हटलें तरी पाऊण मिनिट खर्चीं पडलें. आणि याच गोष्टीची त्याला चुटपुट लागून राहिली. पण घराबाहेर पडतांना त्याच्या व्यवस्थित कपाळावर एकही आठी चटलेली नव्हती.

रिफॉर्म क्लबची इमारत पेलमेल भागांत होती आणि फॉग नेहमीं तिकडे पायीं पायींच जाई. आजही नेहमींप्रमाणें त्यानें आपलीं पावलें तिकडें वळवलीं. पायऱ्या उतरल्यावर त्यानें पहिल्यानें उजवा पाय पुढें टाकला, मग डावा पाय. नंतर उजव्या पायानें पांचशें शहात्तर पावलें आणि डाव्या पायानें फक्त पांचशें पंचाहत्तर पावलें चालून होतांच तो नेमका क्लबाशीं पोचला. क्लबांत शिरल्याबरोबर त्यानें सरळ भोजनगृह गांठलें आणि तिथें ठराविक टेबलापासची ठराविक खुर्ची पकडून त्यानें जेवणाला आरंभ केला. कारण जेवणाचें ताट वगैरे व्यवस्थित वाढलेलें तयारच होतें.

फॉगचें जेवण बारा वाजून सत्तेचाळीस मिनिटांनीं उरकलें. रुमालानें तोंड पुसून तो उठला. नळावर जाऊन त्यानें एक

चूळ भरली. पुन्हा एकदा तोंड पुसलें. मग तो दिवाणखान्यांत जाऊन एका लठ्ठ आरामखुर्चीत आसनस्थ झाला. लगेच एका नोकरानें त्या दिवसाचा ताजा ' टाइम्स ' त्याच्यापुढें केला. टाइम्सचा अंक अगदीं नीटनेटका नि ताजा होता. त्याची घडी तर मोडलेली नव्हतीच; पण पानांच्या कडा देखील कापलेल्या नव्हत्या. फॉगनें कागद कापण्याची लाकडी सुरी घेऊन त्या कौशल्यानें कापल्या. नंतर पावणेचार वाजेपर्यंत टाइम्स वाचण्यांत स्वारी मग्न झाली होती. पुढें ' स्टँडर्ड ' हें वर्तमानपत्र त्यानें आमूलाग्र वाचलें. तोंपर्यंत चहाफराळाची वेळ झाली होती. तो त्यानें एकट्यानेंच उरकला आणि सहाला वीस मिनिटें असतांना तो पुन्हा दिवाणखान्यांत येऊन दाखल झाला. अजून त्याचें एक वर्तमानपत्र वाचण्याचें राहिलें होतें. तें म्हणजे ' मॉर्निंग ' क्रॉनिकल. त्यानें फॉगचा जवळजवळ अर्धा तास खाल्ला.

आतां संध्याकाळ झालेली होती. तेव्हां कामधंद्यावरून परतणाऱ्या सभासदांची क्लबांत आवक सुरू झाली. ते सर्वजण शेगडीभोवतीं जमले आणि त्यांच्या गप्पाटप्पा चालू झाल्या. इकडे फॉगचें वृत्तपत्र वाचन संपत आलें आणि त्याची पत्ते खेळायची वेळ झाली. आतां जमलेले सभासद हेच फॉगचे पत्त्यांतचे खेळाडू मित्र होत. ते सर्वच पत्ते खेळण्यांत पटाईत होते. रोज एक तरी डाव टाकल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे. चला, आपणही त्यांची ओळख करून घेऊं या.

या सभासद मित्रांत अँड्र्यू स्टुअर्ट नांवाचा एक यंत्रविशारद होता; जॉन सलिवान आणि सॅम्युएल फॅलेन्टिन नांवाचे दोघे सावकार होते; टॉमस फ्लॅनगन नांवाचा एक दारूच्या भट्टीचा मालक होता आणि वॉल्टर राल्फ नांवाचा ' बँक ऑफ इंग्लंड'चा एक डायरेक्टर होता. म्हणजे सर्वच जण सधन प्रतिष्ठित लोक होते. आधींच रिफॉर्म क्लब हा बड्या लोकांचा क्लब म्हणून प्रसिद्ध होता. इंग्लंडच्या व्यापारी वर्गी-

तले बहुतेक मानकरी या क्लबाला आश्रय देत. पण फॉगचा हा मित्र-वर्ग म्हणजे तर त्या सगळ्या प्रतिष्ठित मंडळींचाही अर्क होता असें म्हटलें तरी चालेल.

पत्ते खेळतां खेळतां या मंडळींच्या गप्पा चालत आणि एरवीं 'एका वेळीं एक काम' करण्याबद्दल कटाक्ष ठेवणारा फॉगही त्यांत सामील होई.

आज टॉमस फ्लॅनॅगननें गप्पांना तोंड फोडलें.

"काय राल्फ," तो म्हणाला, "तुला कसं काय वाटतं या बँकेंतल्या दरोड्याबद्दल ?"

अँड्र्यू स्टुअर्टनें उत्तर दिलें, "त्यांत वाटायचं काय ? बँक त्या पैशांना मुकली हें उघडच दिसतं."

राल्फचा या बाबतींत मतभेद दिसला. तो जोरानें मान हालवून म्हणाला, "मला नाहीं वाटत तसं. मला वाटतं ज्या कुणीं हा डाका घातला त्याचा लवकरच पत्ता लागेल. आपलं पोलिसखातं कांहीं डोळे मिटून बसलेलं नाहीं. युरोपच्या कोनाकोपऱ्यांत हुशार गुप्तपोलीस रवाना झाले आहेत. इतकंच काय, अमेरिकेच्या बंदराबंदरांतून कडक पहारा आहे. इतक्या सर्व बंदोबस्तांतून निसटणं कांहीं सोपं काम नाहीं."

"तें सर्व ठीक आहे हो !" स्टुअर्टनें शंका काढली, "पण चोराचं कांहीं वर्णन तरी आहे का तुमच्याजवळ ?"

"आहे तर. पण तो तसं म्हणाल तर चोर मुळींच नाहीं !" राल्फनें सांगितलें.

"म्हणजे काय ? पंचावन्न हजार पौंडांच्या नोटा लांबवणारा माणूस चोर नाहीं ? आपलीं मतं बरींच क्रांतिकारक दिसतात."

"तो चोर नाहीं," राल्फनें पुन्हा ठासून सांगितलें.

सलिवाननें हळूच विचारलें, "व्यापारी वर्गांतला आहे कीं काय कुणी ?"

यावर कोणीतरी म्हणालें, "मॉर्निंग पोस्टच्या मतें तो एक प्रतिष्ठित सभ्य गृहस्थ आहे !"

कोणी बरें काढले हे उद्गार ? सर्वांनीं माना वळवून फिलिअस फॉगकडे पाहिलें. कारण वर्तमानपत्र मिटून ठेवतां ठेवतां त्यानेंच ही घोषणा केली होती. फिलिअस फॉग आतां गप्पांत सामील होणार याची ती नांदी होती.

आज त्यांच्या संभाषणाचा विषय बँकेंतला दरोडा हाच होता: तीनच दिवसांपूर्वीं, म्हणजे २९ सप्टेंबर रोजीं 'बँक ऑफ इंग्लंड'च्या कचेरीवर धाडसी दरोडा पडला होता आणि मुख्य कॅशियरच्या टेबलावरून नोटांचा एक ढीगच्या ढीग कोणी तरी हातोहात लांबवला होता. एकंदर रक्कम पंचावन्न हजार पौंडांची होती.

हो चोरी झाल्याचें कळतांक्षणीं इंग्लंडमधले हुशारांत हुशार नि मुरब्बी गुप्त पोलीस दाही दिशांना रवाना झाले. लिव्हरपूल, ग्लासगो, हाव्र, सुएज, ब्रिंडिसी, न्यूयॉर्क, सान्फ्रान्सिस्को इत्यादि मोठमोठ्या बंदरांवर पाळत ठेवण्यांत आली. चोर पकडून देणाराला रोख दोन हजार पौंड आणि रक्कम परत मिळाल्यास पांच टक्के हिस्सा एवढें प्रचंड बक्षीस जाहीर करण्यांत आलें. दरम्यान पोलीस इन्स्पेक्टर डोळ्यांत तेल घालून सर्व प्रवाशांवर नजर ठेवूं लागले. बंदरांवरून व स्टेशनांवरून कडक झडत्या सुरू झाल्या.

शहरांत जिकडे तिकडे हाच चर्चेचा विषय झाला. चोर सांपडेल का ? कसा सांपडेल ? आपण काय करूं शकू ? रिफॉर्म - क्लबांतही चर्चा झाली. कारण क्लबाचे बरेच सभासद बँकेच्या अधिकारमंडळावर होते.

स्टुअर्टनें चक्क सांगितलें, "चोर सांपडण्याची आशा नाहीं. सर्व गोष्टी त्याला अनुकूल दिसतात. तो गडीही पक्का चलाख दिसतो."

राल्फ म्हणाला, "हट्! मला नाहीं वाटत तसं! कितीही हुशार असला तरी लपून लपून लपणार कुठें तो?"

"कां? लपायला जागा थोड्या का आहेत! आपली पृथ्वी चिकार मोठी आहे!"

"एका काळीं होती" फॉगनें हळूच म्हटलें.

"एका काळीं?" स्टुअर्ट कपाळाला आठ्या चढवून म्हणाला. "म्हणजे काय? अन् आतां काय, ती लहान झाली आहे होय?"

"खात्रीनें लहान झाली आहे" राल्फनें मध्येंच म्हटलें. "मि. फॉग म्हणतात तें खोटं नाहीं. शंभर वर्षांपूर्वी जगाभोवतीं प्रदक्षणा करायला जेवढा जेवढा वेळ लागे त्याच्या एक दशांशही आतां लागत नाहीं. म्हणजे त्या दृष्टीनें पृथ्वी लहानच नाहीं का झालेली? त्यामुळेंच या चोराचा पत्ता लागण्याचा संभव या काळांत किती तरी अधिक आहे—"

"पण त्याचबरोबर अन् त्याच कारणामुळें तो पळून जाण्याचा संभवही पूर्वींपेक्षां अधिक आहे."

"पृथ्वी लहान झाली हें सिद्ध करण्याचे राल्फसाहेबांचे मार्ग मोठे अजब आहेत. केवळ पृथ्वीप्रदक्षणा करायला आतां फक्त तीन महिने—"

"ऐंशी दिवस" फिलिअस फॉगनें त्यांना मध्येंच रोखून म्हटलें.

"अच्छा!" जॉन सलिवान नाक मुरडून म्हणाला, "ऐंशी तर ऐंशी! फॉगसाहेबांचे आंकडे कधीं चुकतील हें शक्य नाहीं. हिंदुस्थानांत ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेल्वे नांवाच्या कंपनीनें मुंबई ते थेट अलाहाबाद रेल्वे रस्ता नुकताच सुरू केला ना, तो फॉगनें हिशेबांत धरला. त्यामुळें दहा दिवस कमी होतात खरे. 'मॉर्निंग क्रॉनिकल' नें

जगाच्या प्रवासाची कमींत कमी वेळ दिली आहे. ती वाचूनच दाखवतों तुम्हांला मी—

| | |
|---|---|
| लंडन ते सुएज ( माँ सेनी व ब्रिंडिसी मार्गें ) रेल्वेनें व बोटीनें.................... | ७ दिवस |
| सुएज ते मुंबई, आगबोटीनें | १३ ,, |
| मुंबई ते कलकत्ता, आगगाडीनें | ३ ,, |
| कलकत्ता ते हाँगकाँग, आगबोटीनें | १३ ,, |
| हाँगकाँग ते याकोहामा, आगबोटीनें | ६ ,, |
| याकोहामा ते सान फान्सिस्को, आगबोटीनें | २२ ,, |
| सान फान्सिस्को ते न्यूयॉर्क, आगगाडीनें | ७ ,, |
| न्यूयॉर्क ते लंडन, आगबोटीनें व आगगाडीनें | ९ ,, |
| | एकूण ८० दिवस |

"हं," स्टुअर्ट म्हणाला, "कागदावर ऐशी दिवस लागतात हें खरं आहे. पण यांत खराब हवा, उलटा वारा, वादळ, बोटींचे अपघात, आगगाड्यांचा खोळंबा अशा कितीतरी गोष्टी जमेंत धरलेल्या नाहींत."

"धरल्या आहेत" फिलिअस फॉग म्हणाला.

त्याच्याकडे नाखुषीनें पाहून स्टुअर्टनें म्हटलें, "तात्त्विक दृष्ट्या धरल्या असतील. पण प्रत्यक्ष व्यवहारांत—-"

"व्यवहारांतसुद्धा" फॉग म्हणाला.

"एवढं जोरांत बोलतायू—" स्टुअर्टही जोरांत म्हणाला, "तर प्रत्यक्ष तुम्हीच आणून दाखवा ना ते व्यवहारांत ?."

" तुम्हांला दाखवायचं म्हणजे तुम्ही माझ्याबरोबर यायला पाहिजे. येतां ? "

" माफ करा ! " स्टुअर्ट म्हणाला, " मला दुसरीं कित्येक महत्त्वाचीं कामें आहेत. पण एवढी पैज मारायला माझी तयारी आहे कीं अशा प्रकारचा प्रवास प्रत्यक्षांत अशक्य आहे. जर कोणीं केला तर मी हजार पौंड त्याला देईन ! "

" त्यांत अशक्य कांहींच नाहीं " फॉगनें आपलें तुणतुणें चालू ठेवलें.

" अशक्य नाहीं तर करून दाखवा. "

" ठीक आहे. मी करून दाखवतों ऐंशी दिवसांत जगाचा प्रवास."

" छान. केव्हां निघतांय् बोला. "

" ताबडतोब. पण मी प्रवास करणार तो तुमच्या खर्चानें एवढं वरीक ध्यानांत ठेवा. शिवाय तुम्हीं जशी पैज मारलीत तशी मीही मारायला तयार आहें. मी जर हरलों तर बेरिंगच्या पेढीवर माझे वीस हजार पौंड आहेत ते सगळे तुमचे ! "

" वीस हजार पौंड ! " जॉन सलिवान अंगावर शहारे येऊन ओरडला. " गृहस्था, जरा विचार कर ! जरासा काडीचा अपघात झाला नि इकडचं तिकडे झालं तरी त्या वीस हजार पौंडांवर तुला पाणी सोडावं लागेल. "

" इकडचं तिकडे कांहीं होत नाहीं " फॉग निश्चयानें म्हणाला.

" पण असं बघा, मि. फॉग ! हे ऐंशी दिवस म्हणजे किमानांत किमान मुदत धरलेली आहे."

" असेना ? त्या किमान मुदतीचा काळजीपूर्वक उपयोग केला म्हणजे झालं. "

" हें ववा, राव–" कोणीतरी तेवढ्यांत कंटाळल्यासारखें करून म्हणाले, " ही चेष्टा आतां पुरे. डाव टाका पाहूं."

" ही चेष्टा नाहीं " फिलिअस फॉग म्हणाला, " आपलं सगळं भांडवल इरेला घालून चेष्टा करणं हें इंग्रज माणसाचं काम नाहीं. पुन्हा एकदा सांगतों, ऐंशी दिवसांत पृथ्वीप्रदक्षणा करायला मी तयार आहें. केली नाहीं तर वीस हजार पौंड हरायला तयार आहें. आणखी काय पाहिजे ? बोला, कोण तयार आहे ही पैज मारायला ? "

" आपण तयार आहों " स्टुअर्ट, फॅलेन्टिन, सलिवान, फ्लॅनॅगन आणि राल्फ यांनीं एकमेकांत कुजबुज करून नंतर एकसुरांत घोषणा केली.

" ठीक आहे तर मग " फॉग घड्याळाकडे पाहात म्हणाला. " डोव्हरहून पावणेनऊ वाजतां गाडी सुटते. तिनें निघेन मी. "

" अरे म्हणतोस काय लेका ? " सलिवाननें आश्चर्यानें डोळे वासले. " आजच्या आज ? आत्तांच्या आत्तां ? "

" आत्तांच्या आत्तां कसं ?" फॉगनेंही त्याच्याकडे आश्चर्यानें पाहात विचारलें. " अजून सात वाजताहेत. तब्बल पावणेदोन तास आहेत, आजच रात्रौ निघतों मी–" बोलतां बोलतां त्यानें खिशांतून अल्मानाक ऊर्फ विलायती पंचांग काढलें आणि त्याचीं पानें उलटीत तो म्हणाला, " आज आहे बुधवार, ऑक्टोबरची दोन तारीख. यांत ऐंशी दिवस मिळवायचे म्हणजे शनिवार तारीख एकवीस डिसेंबर रोजीं रात्रीचे पावणे-नऊ वाजेपर्यंत मीं इथें–क्लबाच्या या खोलींत-हजर व्हायला पाहिजे; तसा हजर झालों नाहीं तर माझे वीस हजार पौंड मीं तुम्हांला द्यायचे, असाच ना या पैजेचा अर्थ ?—मंजूर ! मित्रहो, तुम्हांला मीं सांगित-लंच कीं बेरिंगकडे माझे वीस हजार पौंड आहेत. तुम्हांला पाहिजे तर आत्तांच चेक देऊन ठेवतों—अर्थात् ऐंशी दिवसानंतरच्या तारखेचा ! "

आणि गृहस्थानें खरोखर तेथल्या तेथें चेक फाडून त्यांच्या पुढ्यांत टाकला. त्याचे मित्र विस्मयानें त्याच्याकडे पाहात राहिले. त्यांच्या तोंडांतून शब्दही निघेना, एवढे ते हतबुद्ध झाले होते. त्यांच्यापैकीं एक-जण पुटपुटलाही, "हा एक तर हैवान असला पाहिजे किंवा वेडबंबू!"

इतक्यांत घड्याळांत साताचे ठोके पडले.

नंतर थोडी जुजबी बातचीत होऊन आणखी पंचवीस मिनिटांनीं फिलिअस फॉग क्लबच्या इमारतीबाहेर पडला.

तो दिसेनासा होईपर्यंत त्याचे मित्र त्याच्याकडे पाहात उभे होते. नंतर दीर्घ निःश्वास सोडून त्यांनीं खुर्च्यांवर देह टाकले. अँड्रयू स्टुअर्टनें कपाळावर अर्थपूर्ण टिचक्या मारल्या.

## : ४ : प्रयाण

**पासपार्तूनें** नव्या घराची संपूर्ण माहिती करून घेतली, आंघोळ केली, आपलें सामान व्यवस्थित लावलें आणि तो सैंपाकघराकडे वळला. तेवढ्यांत बाहेरची घंटा वाजली.

दरवाजा उघडून पाहातो तों मालक स्वतः पुन्हा हजर!

त्याला फारच आश्चर्य वाटलें. तो जरी या घरांत नवीन होता तरी मालकाच्या संपूर्ण दिनचर्येची त्यानें माहिती करून घेतली होती. त्यामुळें आणखी दोन तास तरी साहेब घरीं येतील अशी त्याची अपेक्षा नव्हती.

फॉगसाहेब आले ते सरळ आपल्या झोपायच्या खोलींत गेले. तिथून त्यांनीं पासपार्तूला हाक मारली. तो धावतच तिकडे गेला.



"पासपार्तू, आपल्याला प्रवासाला जायचंय्. आणखी दहा मिनिटांत निघायला हवं."

"कुठें साहेब?" पासपार्तूनें आश्चर्यानें विचारलें.

"जगाच्या प्रवासाला."

" ज–ज–जगाच्या— "

" होय. जगाच्या. ऐंशी दिवसांत जगाचा प्रवास करून आपण परत येऊं. नव्हे, येणं भाग आहे आपल्याला. अर्थात् आतां एक क्षणही फुकट घालवून उपयोगाचा नाहीं. "

" प–ण साहेब, सामान ? "

" सामान बिमान कांहीं नको आपल्याला. एक गोणपाटाची पिशवी घे साधी. तिच्यांत माझे दोन सदरे घाल अन् पायमोज्यांचे तीन जोड. तुझ्यासाठींही असेच कपडे घे. बाकी जें काय लागेल तें आपण वाटेंत विकत घेऊं शकतों. माझा पावसाळी कोटही घे बरोबर. तसंच एक पांघरूण घे. अन् हें बघ, बुटांचे दोन भक्कम जोड घे तुझ्यासाठीं नि माझ्यासाठीं. अर्थात् आपल्याला फारसं चालावं लागणार नाहींच. पण तेवढे असूं देत. लवकर आटोप हं ! "

पासपार्तू स्वप्नांत असल्यासारखा आंत निघून गेला. मालकानें सांगितलेल्या सर्व जिनसा त्यानें एकत्र केल्या व त्या गोणपाटाच्या पिशवींत भरल्या. अजूनही त्याला हें सगळें स्वप्न वाटत होतें. पण मालकाचा हुकूम म्हणजे वज्रलेप. फॉगसाहेब तयार होऊन बाहेर पडतांच त्यानें पिशवी खांद्यावर टाकली आणि निमूटपणें घराला कुलूप लावून तो पायऱ्या उतरूं लागला.

फॉगसाहेबांनीं ब्रॅडशॉचें ' कॉन्टिनेन्टल रेल्वे गाइड ' बरोबर घेतलें होतें. पायऱ्या उतरतांना त्यांनीं तें नोकराजवळच्या पिशवींत खुपसलें आणि हात झटकून हातमोजे वर ओढीत ते समाधानपूर्वक रस्ता चालूं लागले. त्यांची खात्री होती कीं कमींत कमी जेवढें सामान घ्यायला हवें तेवढें आपण घेतलें आहे. याशिवाय आणखी कशाची जरूर पडली तर खिशांत नोटांचें लठ्ठ पुडकें आहेच आपल्याजवळ. तरी पण शंका फेडून घेण्यासाठीं त्यांनीं नोकराला विचारलें, " सगळं कांहीं ठीक

घेतलंस ना? विसरला नाहींस ना कांहीं?"

"नाहीं साहेब. तुम्हीं सांगितलेलं सगळं घेतलं."

निघण्यापूर्वी घराच्या खिडक्या व बाहेरचा दरवाजा लावून कुलूप ठोकायला ते विसरले नव्हते. सेव्हिल रोच्या नाक्यावर पोचण्यापूर्वी फॉगनें पुन्हा एकदा आपल्या घराकडे शेवटची नजर टाकली होती.

नाक्यावर त्यांना भाड्याची घोडागाडी मिळाली. तींत बसून ते चेअरिंग क्रॉस स्टेशनवर जाऊन हजर झाले. त्या वेळीं आठ वाजून वीस मिनिटें झालीं होतीं. गाडी थांबतांच पासपार्तूनें खालीं उडी मारली. फॉगनीं गाडीचें भाडें चुकतें केलें आणि नोकराला फर्मावलें, "पॅरीसचीं दोन फर्स्टक्लासचीं तिकिटं काढून आण."

पासपार्तू धावतच निघाला.

फिलिअस फॉगही प्लॅटफॉर्मकडे वळणार इतक्यांत रिफॉर्म क्लबांतल्या मित्रांची पंचकडी त्यांना अचानक दिसली.

"अच्छा, मित्रहो! बाय बाय!" त्यानें हात हालवून म्हटलें. "मी निघालों, बरं कां? माझ्याजवळ पासपोर्ट आहेच. मी जिथें जिथें जाईन तिथले अधिकारी पासपोर्टांत खुणा करतील, छाप मारतील. त्यावरून तुम्हांला पुरावा मिळेलच माझ्या प्रवासाचा. हो! नाहीं तर म्हणाल हा थापच मारतोय्!"

फिलिअस फॉग आणि त्याचा नोकर पासपार्तू या द्वयीनें फर्स्टक्लासच्या एका डब्यांत प्रवेश केला त्या वेळीं आठ वाजून चाळीस मिनिटें झालीं होतीं. आणखी पांचच मिनिटांनीं एंजिननें कर्कश शिट्टी दिली आणि गाडीनें मोठ्या थाटांत स्टेशन सोडलें.

## : ५ : सुएज

ज्या जगाची गोल सफर करायला फिलिअस फॉग निघाला होता तें स्वतःही वाटोळें आहे म्हणतात. तें स्वतःभोवतीं आणि दुसऱ्या भोवतींही गरगर फिरत असते. दुसरी एक मौजेची गोष्ट अशी कीं या जगांतल्या माणसाच्या क्रियाही रहाटगाडग्यासारख्या गोल गोल चालू असतात. आणि त्याहून गंमत अशी कीं बहुतेक माणसांच्या क्रिया दुसऱ्या कोणाच्या तरी क्रियांभोवतीं प्रदक्षणा घालीत असतात. जगाचें हें चक्रीपुराण कधीं संपतच नाहीं.

ऑक्टोबरची नऊ तारीख होती. म्हणजे फॉग प्रवासाला निघाला त्याला एक आठवडा लोटला होता. या आठवड्यांत त्यानें काय काय केलें तें पाहाण्यापेक्षां–कारण तें सगळें यंत्राप्रमाणें सुरळीत पार पडलें–आपण दुसऱ्याच कांहीं पात्रांच्या क्रिया जरा पाहूं या. त्यामुळें आपल्याला विरंगुळा तर वाटेलच. पण शिवाय आपल्या कथानकांत याही पात्रांना जागा मिळणार असल्यामुळें आपला फायदाही होईल.

पेनिन्शुलर अँड ओरिएन्टल कंपनीची 'मंगोलिया' ही आगबोट त्या दिवशीं सकाळीं सुएज बंदरांत यायची होती. तिची ठरलेली वेळ अकराची होती आणि नियमितपणाबद्दल कंपनीची ख्याति असल्यामुळें ती वेळ चुकेल हें शक्यच नव्हतें. अकराच्या ठोक्याला बोट बंदरांत येईल अशी खात्री असल्यामुळें साडेदहापासूनच बंदरावर लोकांची वर्दळ सुरू झाली.

या लोकांपैकीं दोन इसमांची ओळख आपल्याला करून घ्यायची आहे. माणसांनीं गजबजलेल्या या धक्क्यावरून नीट नजर टाका. हे जे कुरळ्या केसांचे, निळे काळे सूट घातलेले सिद्दी, तसेच डोक्यावर

विचित्र वेटोळीं घातलेले नि पायघोळ झग्यांतले आरबी दिसतात, त्यांच्याशीं आपल्याला कांहीं करायचें नाहीं. डोक्यावर नाजूक रंगीत छत्र्या घेतलेल्या, गालांवरून पावडरयुक्त घामाचे ओघळ वाहात असलेल्या या गोऱ्या बायकांकडेही लक्ष देऊं नका. तो मजबूत शरीराचा उंच इसम मात्र नीट पाहून घ्या. त्याचा चेहरा चांगला तरतरीत दिसतो. पण त्याची ती क्षणाक्षणाला भुवया उडवण्याची लकब कांहीं तुम्हांला आवडण्यासारखी नाहीं. या इसमाचें नांव फिक्स. 'बँक ऑफ् इंग्लंड'मध्यें जो दरोडा पडला त्याबाबत देशोदेशीं हुशार गुप्त पोलीस रवाना झाले होते म्हणून तुम्हांला सांगितलेंच. त्यांपैकींच ही एक वल्ली आहे. या वल्लीच्या वांट्याला सुएजचा कालवा आला होता. कालव्यांतून येणाऱ्या प्रत्येक जहाजावर तो गिधाडासारखी नजर ठेवी. मग तें जहाज ब्रिंडिसीहून आलेलें गलबत असो किंवा मुंबईहून आलेला तराफा असो. ही नजर फिरवतांना त्याला जर यत्किंचित् शंका आली, कीं अमूक माणूस त्या चोरासारखा दिसतो, तर लगेच हे हेरबहाद्दर आपलें सर्व लक्ष एकवटून त्याचा पाठलाग करीत. जवळ वॉरंट नसल्यामुळें यापेक्षां अधिक त्याला कांहीं करतां येत नसे. पण पकड वॉरंट हातीं पडेपर्यंत अशा संशयित इसमाचा पाठपुरावा करायचा एवढेंच त्याला माहीत होतें.

या डिटेक्टिव्ह महाशयांचें नांव फिक्स असें होतें. तुम्हांला ठाऊक आहेच कीं 'फिक्स' करणें म्हणजे घट्ट, पक्कें करणें. या बहाद्दर शिकाऱ्यानें कोणावरही झडप घातली, कीं तो पक्का अडकला गेला असेंच जणूं त्या नांवाला सुचवायचें होतें !

फिक्सबरोबर दुसरा एक पोक्त जाडजूड गृहस्थ धक्क्यावर येरझारा घालीत होता. हा गृहस्थ म्हणजे दुसरा तिसरा कोणीं नसून ब्रिटिश सरकारचा सुएजमधला प्रतिनिधि किंवा कॉन्सल होता. या दोन बड्या

इंग्रज अधिकाऱ्यांचें एवढें काय बरें हितगुज चाललें होतें ?

हितगुज तसें कांहीं नव्हतें. दोनच दिवसांपूर्वीं फिक्सला लंडनहून तार आली होती. तारेंत संशयित गुन्हेगाराचें जास्त सविस्तर वर्णन दिलें होतें; त्यावरून तो चांगला नीटनेटके कपडे घातलेला प्रतिष्ठित खानदानी गृहस्थ असावा एवढें फिक्सला समजलें. त्याच्या प्रतिभेला चालना मिळायला तेवढी माहिती पुरेशी होती. एवढ्या माहितीवर आपण चोर पकडून नोकरींत वढती तर मिळवूं शकूंच; पण शिवाय बँकेनें जें जंगी बक्षीस जाहीर केलें आहे तेंही आपणच पदरात पाडून घेऊं अशी फिक्सला खात्री होती. अर्थात् मंगोलिया आगबोट येण्याची तो अगदीं आतुरतेनें वाट पाहत होता. दरम्यान इंग्रज प्रतिनिधीला अनेक प्रश्न विचारून त्यानें अगदीं भंडावून सोडलें होतें. ' मंगोलिया खरंच का नेहमीं वेळेवर येते ? अगदीं गॅरंटी देतां तुम्ही ? मुळींच एकही मिनिट कमजास्त व्हायचं नाहीं ? ' वेगवेगळ्या प्रकारांनीं तीच चौकशी त्यानें दहा वेळां तरी केली असेल. कॉन्सलनेंही शांतपणें त्याला तेंच उत्तर दहा प्रकारांनीं दिलें, तरी त्याचें समाधान होईना.

" सांगितलं ना तुम्हांला, मि. फिक्स ?" तो अकराव्यांदा म्हणाला, " मंगोलियाला उशीर होणं शक्य नाहीं. कालच ती पोर्ट सय्यदहून वेळेवर निघाल्याचा संदेश आलेला आहे. "

फिक्सनें मग एकट्यानेंच गर्दींत रपेट करायला सुरवात केली. अजूनही त्याचें समाधान झालेलें नव्हतेंच. त्यानें घड्याळाकडे पाहिलें. साडेदहा वाजून दहा मिनिटें झालीं होतीं. पुन्हा एकदा त्यानें कॉन्सलला गांठलें.

" सुएजला आगबोटीचा मुक्काम किती काळ राहील ? " त्यानें नवीन सुचलेला प्रश्न विचारला.

" चार तास. इथें तिला कोळसा घ्यायचा असतो. सुएजहून

एडनपर्यंत तेराशें दहा मैलांचं अंतर आहे. एडन म्हणजे तांबड्या समुद्राच्या पार दुसऱ्या टोकाशीं. तिथें ती पुन्हा कोळसा घेते."

"अस्सं. अन् मग एडनहून ती थेट मुंबईला जाते, नाहीं का? म्हणजे त्या बदमाषानें जर या बोटीचं तिकीट काढलेलं असेल, तर— तर तो सुएजलाच उतरणार!"

"तें कसं"

"मुंबई ब्रिटिश मुलुखांत येते. आणि ब्रिटिश मुलखांत आपण सुरक्षित राहूं शकत नाहीं याची त्याला खात्री असेलच. तेव्हां डच किंवा फ्रेंच हद्द गांठण्यासाठीं जवळचं ठाणं म्हणून तो सुएजच पसंत करील."

"मला नाहीं वाटत तो असं करीलसं" कॉन्सल मान हालवून म्हणाला. "तो जर आपण समजतों तेवढा हुशार असेल तर लंडनचीच हद्द सोडणार नाहीं. लंडन शहरांत त्याला जितकं सुरक्षित राहतां येईल तितकं दुसरीकडे कुठेंही नाहीं."

आणि एवढेंच बोलून कॉन्सल आपल्या कचेरींत निघून गेला व फिक्ससाहेब पुन्हा एकटेच हिंडूं लागले.

पण त्यांना मग फार वेळ हिंडावें लागलें नाहीं. लवकरच एकदम निरनिराळ्या शिट्ट्यांचे आवाज निघूं लागले. मंगोलियाच्या आगमनाचीच ती जाहिरात होती. थोड्याच वेळानें सुएजच्या कालव्यांत दूरवर मंगोलियाचा भाग दिसूं लागला आणि त्यानें झपाट्यानें प्रचंड आकार धारण केला. मंगोलियासारखीं मोठीं जहाजें धक्क्याला लागत नसत. आगबोट आली आणि तिनें जरा अंतरावरच नांगर टाकला. लगेच धक्क्याजवळ असलेले दहा बारा मचवे सपासप पाणी कापीत तिच्या स्वागताला गेले.

मंगोलियावर बरेच उतारू होते. कांहीं जहाजावरच्या कठड्याला

रेंगून आसपासचा देखावा पाहात राहिले. पण बाकीच्या बहुतेक उतारूंनीं बंदरांत वेळ घालवायचें ठरवून भाड्याच्या होड्या ठरवल्या. फिक्सनें धक्क्यावर उभे राहून प्रत्येक उतारूचें सूक्ष्म निरीक्षण आरंभलें.

त्याची ही टेहेळणी चालू असतांनाच उतारूंपैकीं एकजण गर्दीतून वाट काढीत थेट त्याच्या अगदीं जवळ येऊन उभा राहिला आणि त्यानें विचारलें, " ब्रिटिश कॉन्सलची कचेरी माहीत आहे आपल्याला?"

" आपलं काय काम आहे कॉन्सलकडे ?" फिक्सनें आपली तीव्र नजर त्याच्यावर रोखीत उलट विचारलें.

" आणखी काय काम असणार आहे ? या माझ्या पासपोर्टावर सही हवी आहे त्यांची."

त्यानें पुढें केलेला पासपोर्ट फिक्सनें हातांत घेतला आणि त्यावरून नजर फिरवली. दुसऱ्याच क्षणीं त्याचा हात थरथरला. पासपोर्टांतली सर्व माहिती मग त्यानें लक्षपूर्वक वाचली. स्कॉटलंड यार्डमधून चोराची जी माहिती त्याला कळवण्यांत आली होती तिच्याशीं तंतोतंत जुळणारें तें वर्णन होतें.

" हा तुमचा स्वतःचा पासपोर्ट आहे काय ? " त्यानें त्या इसमाला विचारलें.

" नाहीं. माझ्या साहेबांचा आहे. "

" कुठें आहेत तुझे साहेब ? "

" बोटीवर आहेत. "

" बा ! त्यांना आपली खूण पटवायची असेल तर त्यांना स्वतःला यावं लागेल कचेरींत. "

" इतकं आवश्यक आहे का तें ? "

फिक्सनें त्याला बजावलें, कीं पासपोर्टचा मालक स्वतः आल्या-शिवाय बिलकुल काम व्हायचें नाहीं. तेव्हां कॉन्सलची कचेरी कुठें

आहे हें नीट विचारून घेऊन आणि फिक्सला सलाम करून तो निघून गेला.

इकडे फिक्सनें तातडीनें कॉन्सलची कचेरी गांठली. " कॉन्सल-साहेब," तो घाईघाईनें म्हणाला, " सावज सांपडलं. या मंगोलिया बोटीवरच तो बदमाष आहे याबद्दल शंका राहिलेली नाहीं. "

त्यानें सांगितलेली सर्व हकीकत कॉन्सलनें ऐकून घेतली. मग तो म्हणाला, " तो डाकू कसा दिसतो तें पाहण्याची मला उत्सुकता आहे. पण मि. फिक्स, तुम्ही म्हणतां तें खरं असेल तर मला नाहीं वाटत तो माझ्याकडे येईलसं ! आपल्या येण्याजाण्याचा इतका राजरोस पुरावा मागें ठेवणं हें कांहीं हुशारीचं लक्षण नाहीं ! शिवाय मुंबईला जाणाऱ्याला इथें पासपोर्टवर सही घ्यावीच लागत नाहीं ! "

पण कॉन्सलला जास्त कांहीं बोलायला सवडच मिळाली नाहीं. कारण त्याच वेळीं कोणी दरवाजावर टक टक केलें आणि कॉन्सलची परवानगी मिळतांच दरवाजा उघडून दोन व्यक्ति आंत आल्या. यांतला एक मघाशीं फिक्सजवळ चौकशी करणारा तो नोकर होता. दुसरा त्याचा मालक असावा हें उघड दिसलें. त्यानें खिशांतून आपली डायरी काढली, तिचा पट्टा सोडला आणि आंतून आपला पासपोर्ट काढून तो कॉन्सलच्या हातांत दिला.

कॉन्सलनें पासपोर्ट अगदीं काळजीपूर्वक वाचला. हें वाचन चालू असतांना गुप्तपोलीस फिक्स एका कोपऱ्यांत उभा राहून त्या प्रवाशाची गुप्त पाहणी करीत होता.

पासपोर्ट नीट वाचून झाल्यावर कॉन्सलनें प्रश्न केला, " आपणच फिलिअस फॉग ? "

" होय. "

" हा माणूस कोण ? आपला नोकर का ? "

"होय. तो फ्रेंचमन आहे. त्याचं नांव पासपार्तू."

"तुम्ही थेट लंडनहून आलांत?"

"होय."

"आणि चालला आहांत कुठें?"

"मुंबईला."

"मग.... " कॉन्सल एकेक शब्द सावकाश उच्चारीत विचारतो, "तुम्हांला आतां पासपोर्ट दाखवण्याची जरूर काय होती? मुंबईला जायला सही वगैरे लागत नाहीं हें आपल्याला माहीत नाहीं काय?"

"माहीत आहे" फॉग म्हणाला, "पण मी सुएजला येऊन गेलों याचा पुरावा मला हवा आहे. देतां का तेवढी सही करून?"

"ठीक, ठीक" कॉन्सलनें भुवया आक्रसून म्हटलें आणि मुकाट्यानें पासपोर्टावर सही केली व आपल्या कचेरीचा तारखेसहित शिक्काही त्याच्यावर उमटवला.

मि. फॉग यांनीं जरूर ती फी चुकती केली आणि पासपोर्ट घेतला. मग कंबरेपर्यंत वाकून आभारप्रदर्शन केल्यावर ते मुकाट्यानें निघून गेले. मागोमाग त्यांचा नोकरही गेला.

गुप्तपोलीस कोपऱ्यांतल्या काळोखांतून उजेडांत आला आणि म्हणाला, "हं! तुमचं काय मत आहे?"

"मला तर चांगला सचोटीचा माणूस वाटतो."

"असेल, पण मला जें वर्णन दिलेलें आहे त्याच्याशीं हा शंभर टक्के जुळतो. तेव्हां मला पाळतीवर राहिलंच पाहिजे. माझ्या मनांतून त्या नोकराला गटवायचं आहे. त्याला बरीच माहिती असावी असं वाटतं. अन् तो फ्रेंच माणूस आहे, तेव्हां बोलका असणार हें नक्कीच."

आणि एवढें बोलून कॉन्सलचा निरोप घेऊन फिक्ससाहेब पासपार्तूच्या मार्गावर निघाले.

इकडे मि. फॉग कचेरींतून बाहेर पडतांच तडक धक्क्यावर गेले. आपल्या नोकराला त्यांनीं बऱ्याच महत्त्वाच्या सूचना दिल्या आणि स्वतः एका मचव्यांत बसून परत बोटीवर गेले. त्यांचें कॅबिन खालच्या मजल्यावर होतें. त्यांत प्रवेश केल्याबरोबर त्यांनीं पहिली गोष्ट केली ती ही, कीं आपली टिप्पणवही काढली आणि तींत पुढील गोष्टी नोंदून ठेवल्या :—

लंडनहून निघालों : बुधवार ता. २ ऑक्टोबर; सकाळीं ८॥ वा.

पॅरिसला पोचलों : गुरुवार ता. ३ ऑक्टोबर; सकाळीं ७-२० वा.

पॅरिसहून निघालों : ३ ऑक्टोबर; सकाळीं ८-४० वा.

टय़ुरिनला पोचलों : शुक्रवार; सकाळीं ७॥ वा.

ब्रिंडिसीला : शनिवार; संध्याकाळीं ४ वा.

मंगोलिया बोटीवर चढलों : शनिवार; संध्याकाळीं ५ वा.

सुएजला पोचलों : बुधवार, ९ ऑक्टोबर; सकाळीं ११ वा.

आतांपर्यंत एकंदर तास १५६ = ६॥ दिवस.

ही सर्व नोंद करण्यासाठीं आपल्या टिप्पणवहींत मि. फॉग यांनीं खास कॉलम आंखलेले होते. ऑक्टोबरच्या २ तारखेपासून डिसेंबरच्या २१ तारखेपर्यंत ऐंशी दिवसांचें कोष्टक त्यांत अगोदरच मांडून ठेवलेलें होतें. कोणत्या महिन्यांत कोणत्या आठवड्यांत, कोणत्या तारखेला, किती वाजतां, कुठें पोचायचें आणि तिथून केव्हां आणि कसें निघायचें याचें संपूर्ण वेळापत्रक त्यांत लिहिलेलें होतें. पॅरिस, ब्रिंडिसी, सुएज, मुंबई, कलकत्ता, सिंगापूर, हॉंगकॉंग, याकोहामा, सान फ्रान्सिस्को, न्यूयॉर्क, लिव्हरपूल हे त्याचे मुख्य मुख्य टप्पे होते. वेळापत्रक आधीं आंखलेलें असल्यामुळें प्रत्येक मुक्कामावर फॉगला आपण ठरल्याप्रमाणें वेळेवर पोचलों कीं नाहीं, किंवा आपल्याला ठरल्यापेक्षां उशीर झाला अगर-

आपण फार अगोदर मजल गांठली याचा हिशेब करतां येई. त्याप्रमाणें आतांही त्यानें हिशेब केला आणि त्याला असें आढळलें, कीं आपण अगदीं ठीक वेळेवर सुएजला आलों आहों; आपल्याला उशीरही झालेला नाहीं किंवा आपण फाजील त्वराही केलेली नाहीं.

फॉगनें समाधानाचा सुस्कारा सोडला.

## : ६ : पासपार्तू भानगड करतो

'**मंगोलिया**' बोटीनें ऑक्टोबरच्या दहा तारखेला सुएज बंदर सोडलें, त्या वेळीं तिच्यावरील उतारूंत फिक्स नांवाच्या प्रवाशाची भर पडली होती हें मुद्दाम सांगायला नकोच.

फिक्सनें अधिक वेळ न घालवतां, ठरवल्याप्रमाणें पासपार्तूला गांठलें आणि त्याच्या कल्पनेप्रमाणें तो बडबड्याही निघाला. शिवाय तो खादाडखाऊ असल्यामुळें त्यांची दोस्ती वाढायला चांगलेंच निमित्त मिळालें.

आगबोट वेगानें आपला मार्ग आक्रमीत होती. १३ तारखेला ठरल्या वेळेच्या आधींच त्यांनीं तांबड्या समुद्रांतलें मोचा हें छोटें बंदर मागें टाकलें. तिथल्या जुन्या किल्ल्याच्या पडक्या भिंती, तटावरचीं खजुरीचीं झाडें आणि दूरवर दिसणारे कॉफीचे मळे दिसेनासे झाल्यावर आगबोट हळुहळू रात्रीं बाबेल मांदेबच्या सामुद्रधुनींत शिरली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं एडन बंदर लागलें. तिथें मुक्काम फारसा झाला नाहीं. कोळसा वगैरे भरून घेतल्यावर बोटीनें बंदर सोडलें आणि हिंदी

महासागरांत प्रवेश केला.

आणखी सहा दिवस प्रवास केल्यावर रविवार ता. २० ऑक्टोबर रोजीं मध्यान्हाच्या सुमाराला त्यांना हिंदुस्थानचा किनारा दिसूं लागला. नंतर एका बाजूला मुंबई व साष्टी हीं बेटें तर दुसऱ्या बाजूला ट्रॉम्बे, घारापुरी आणि खांदेरी–उंदेरी बेटें यांतून मोठ्या कौशल्यानें वाट काढीत मंगोलिया मुंबईच्या बंदरांत आली. वेळापत्रकाप्रमाणें ती २२ तारखेला यायची. अर्थात् फिलिअस फॉगला दोन संपूर्ण दिवस हातचे मिळाले.

कलकत्ता मेल रात्रीं आठ वाजतां सुटायची होती. त्याच्या आंत बोरीबंदर स्टेशनवर हजर राहायला पासपार्तूला बजावून फॉगनें त्याला कांहीं किरकोळ खरेदीसाठीं पाठवलें आणि स्वत: नेहमींप्रमाणें पासपोर्ट घेऊन कस्टम कचेरींत गेला.

इकडे फिक्सनें उतरल्याबरोबर पोलीस कमिशनरची गांठ घेतली आणि दरोड्याबद्दलची हकीकत त्याला सांगून, लंडनहून वॉरंट काढण्यांत आलें आहे कीं नाहीं म्हणून चौकशी केली.

वॉरंट आलेलें नव्हतें. फॉग लंडनहून निघाल्यानंतर वॉरंट काढण्यांत आलें होतें. तें अद्याप मुंबईत दाखल होणें अशक्य होतें.

“ तुम्हीं आपल्या जबाबदारीवर नाहीं कां त्याला अटक करूं शकत ? ”

पोलीस कमिशनरनें तसें करायला साफ नकार दिला.

फिक्स खट्टू झाला. पण वॉरंट हातांत पडेपर्यंत थांबण्याखेरीज इलाज नव्हता. दरम्यान ‘ चोरा ’वर पक्की देखरेख ठेवायचें मात्र त्यानें मनाशीं ठरवलें होतें.

“ आपला पासपार्तू आहेच ” तो मनाशीं पुटपुटला.

पण पासपार्तू त्या वेळीं काय करीत होता ?

त्यानें फारच बहार केली. मालकानें सांगितलेली खरेदी पुरी झाल्या-

वर त्यानें पाहिलें तो अजून कितीतरी वेळ शिल्लक होता. तेव्हां जिवाची मुंबई करावी म्हणून तो ट्रॅममध्यें बसून भटकला. मग एका मिरवणुकींत सामील झाला. त्या दिवशीं कसला तरी पारशी सण होता आणि ती पारश्यांचीच मिरवणूक होती. तिच्याबरोबरच एकदोन करीत हे बुवाजी थेट मलबार हिलवर जाऊन पोचले. तिथें बाबुलनाथाच्या देवळाचा सुंदर नक्षीदार कळस पाहून त्यांची कलाशक्ति उसळून आली आणि देवळाचा अंतर्भागही नीट पहावा म्हणून तो सरळ आंत घुसला. या बुवाजींच्या पायांत बूट होते. तो तसाच आंत घुसलेला पाहून मंदि-राच्या पुजाऱ्यांना संताप आला. 'गोरा साहेब झाला म्हणून काय झालं? असली माजोरी कोण सहन करील ?' असें बडबडत त्यांनीं एकदम त्याच्यावर हल्ला केला. त्याचे बूटमोजे हिसकून काढले आणि त्याला यथास्थित बुकललें.

बिचाऱ्या पासपार्तूला हिंदूंच्या चालीरीती माहीत नव्हत्या. नाहींतर तो देवळापासून चार पावलें दूर राहिला असता; किंवा अनवाणी आंत गेला असता. आपल्यावर 'निष्कारण' हल्ला झालेला पाहून खवळून त्यानेंही चार ठोसे लगावले. शेवटीं हार खाऊन तो पळत सुटला.

त्यानें धापा टाकीत बोरीबंदर गांठलें तेव्हां आठला पांच मिनिटें कमी होतीं. त्यानें खरेदी केलेल्या सामानाचें पुडकें तर गहाळ झालें होतेंच पण त्याच्या मोज्यांचा व बुटांचा पत्ता नव्हता. त्याची हॅटही कुठें तरी उडून गेली होती.

भिरभिरत्या नजरेनें त्यानें पाहिलें तों कलकत्ता मेल स्टेशनांत उभी होती आणि फॉगसाहेब एका फर्स्टक्लासच्या डब्यांत शिरत होते.

धावत धावत जाऊन पासपार्तूनें आपल्या साहेबांना घडलेली सगळी हकीकत सांगितली आणि त्यांची क्षमा मागितली.

"पुन्हा असं करूं नकोस" एवढें बोलून मि. फॉग आपल्या

सीटवर बसले आणि पासपार्तूही त्याच डब्यांत त्यांच्याच समोर बसला.

हा सर्व प्रकार गुप्तपोलीस फिक्स यानें अगदीं जवळून पाहिला व ऐकला. त्यानें कलकत्यापर्यंतची सोबत करण्याचें ठरवलें होतें, पण एकाएकीं दुसरीच एक कल्पना त्याच्या डोक्यांत आली.

" बस्स्. आपण इथेंच राहावं हें उत्तम " तो स्वतःशीं म्हणाला. " हिंदुस्थानच्या हद्दींत गुन्हा घडलेला आहे. माझा माणूस कसा पकडायचा तें आतां बरोबर समजलं मला. "

इकडे गाडीनें कर्कश शीळ वाजवून बोरीबंदर सोडलें.

## : ७ : कलकत्त्याच्या वाटेवर

**कलकत्ता** मेलच्या त्याच डब्यांत तिसरा एक प्रवासी होता. त्याचें नांव ब्रिगेडियर जनरल सर फ्रासिन्स क्रोमार्टी. बनारसला आपल्या लष्करी हुद्दयावर रुजू होण्यासाठीं हे गृहस्थ चालले होते. त्यांची आणि फॉगसाहेबांची चांगलीच गट्टी जमली.

हिंदुस्थानांतलीं शहरें आपल्या माहितीचीं आहेतच. तेव्हां या प्रवासाचीं विस्तृत हकीकत कांहीं द्यायला नको. कासाऱ्याचा घाट, नाशिक, भुसावळ करीत करीत गाडी दुसऱ्या दिवशीं साडेबारा वाजतां बऱ्हाणपूरला पोचली. इथें पासपार्तूनें नकली मोतीं जडवलेला एक फक्कड चढाव खरेदी केला, तो पायांत घातल्यावर स्वारी बरींच खुषींत आलेली दिसली.

दुसऱ्या दिवशीं एक गंमत झाली. ब्रिगेडियरनीं पासपार्तूला किती

वाजले म्हणून विचारलें. तो म्हणाला, "तीन. वास्तविक संध्याकाळचे सात वाजले होते. आपण जसजसे पूर्वेला जाऊं तसतसा सूर्य लवकर उगवतो. त्यामुळें दिवस लवकर सुरू होतो. डोक्यावर सूर्य आला कीं बारा वाजले ही कुठेंही झालें तरी घडयाळ लावण्याची ठरलेली पद्धत आहे. तिला धरून घड्याळ लावायचें म्हणजे देशोदेशींच्या वेळांत फरक असायचाच. पासपार्तूचें घडयाळ अजून लंडनचीच वेळ दाखवीत होतें. हें सगळें शास्त्र ब्रिगेडियरनीं त्याला समजावून सांगितलें. त्याला समजलें किंवा नाहीं तें कुणास ठाऊक, पण त्या पठ्यानें आपल्या घड्याळांत फरक करण्याचें साफ नाकारलें एवढें खरें !

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आठ वाजतां दाट जंगलांत गाडी एकाएकीं उभी राहिली. सभोवार बरेच बैठे बंगले व कामगारांच्या राहुट्या होत्या. गार्डनें घोषणा केली, "सर्वांनीं इथें उतरावें."

"म्हणजे काय?" सर फ्रान्सिसनीं कपाळावर आठ्या चढवल्या.

"हें नानकीपूर गांव. याच्यापुढें रेल्वे रस्ता अजून केलेला नाहीं. काम चालू आहे."

"मग वर्तमानपत्रांत छापून आलंय् तें काय?"

"वर्तमानपत्रांबद्दल आम्ही जबाबदार नाहीं, साहेब. अजून मधला पन्नास मैलांचा रस्ता पुरा व्हायचा आहे. कंपनी थेटपर्यंतचीं तिकिटं देते खरी; पण मधला हा पन्नास मैलांचा प्रवास उतारूंनीं आपापल्या जबाबदारीवर करायचा हें गृहीत धरलेलं असतं."

बाकीच्या बहुतेक उतारूंनीं तें गृहीत धरलेलें होतेंच. कारण उतरल्याबरोबर ज्यानें त्यानें गाडी, घोडा असें कांहीं ना कांहीं वाहन मिळवून स्वतःची सोय पाहिली होती. आमच्या या त्रयीनें जेव्हां जवळच्या खेड्यांत चौकशी केली तेव्हां त्यांना असें आढळलें कीं आपल्या वांट्याला गाडी–घोडा तर राहोच, पण पालखी–मेणा, तट्टू,

रेडा, गाढव किंवा बैलसुद्धा उरलेला नाहीं. करायचा कसा अलाहाबाद-पर्यंतचा प्रवास!

फिलिअस फॉग कच खाणारा गडी नव्हता. तो म्हणाला, "मी पायीं जातों."

तें ऐकल्याबरोबर पासपार्तूच्या अंगावर शहारे आले. त्यानें केविलवाण्या दृष्टीनें आपल्या पायांतल्या सुंदर चढावांकडे पाहिलें. मग त्यानें नव्या दमानें गांवांत चौकशी केली आणि मालकाला येऊन सांगितलें कीं गांवांत एक हत्ती मिळण्यासारखा आहे.

"कुठें आहे? चल, चल."

एका दरिद्री झोपडींत या हत्तीचा मालक राहात होता आणि स्वतः हत्ती बाहेर एका झाडाखालीं बांधलेला होता.

फॉगनें लगेच त्याची भाड्यानें मागणी केली. पण हत्तीवाला हत्ती द्यायला मुळींच तयार होईना. भाड्याची रक्कम पांच पौंडांपासून चाळीस पौंडांपर्यंत वाढवली, तरी त्याचा हट्ट आपला कायमच.


त्याच्या त्या मूर्ख हेक्याकडे दुर्लक्ष करून यत्किंचित् न चिडतां किंवा चेहऱ्यावर कसलाही विकार न दाखवतां फिलिअस फॉग म्हणाला, "हत्ती विकत देतोस? तुला एक हजार पौंड म्हणजे दहा हजार रुपये देईन."

पण तरीही तो लेकाचा तयार होईना! त्या धूर्त माणसानें या बुवाजींची नड बरोबर जोखली असावी. आपल्या मालकाच्या आचरटपणामुळें बिचारा पासपार्तू मात्र अगदीं स्तंभित झाला होता.

सर फ्रॅन्सिसनींही फॉगला एकीकडे नेलें आणि म्हटलें, "तुम्ही काय करतां आहां हें?"

"कांहीं नाहीं" फॉग म्हणाला, "मला एवढंच माहीत आहे कीं वीस हजार पौंडांची पैज जिंकायला ही रक्कम कांहीं भारी नाहीं."

त्यानें बाराशें, चौदाशें, सोळाशें असा क्रमाक्रमानें आंकडा वाढवीत शेवटीं दोन हजारांना नेऊन भिडवला. काय असेल तें असो, हत्तीवाल्यानेंही मग आपला हट्ट सोडला; आणि फॉगनें दिलेले दोन हजार पौंड अर्थात् वीस हजार रुपयांच्या नोटा कुडत्याच्या खिशांत घालीत हत्ती त्यांच्या स्वाधीन केला.



पासपार्तू चक्क बोंबा मारीत म्हणाला, "दोन हजार पौंडांचा हत्ती ! मेलों ग आई ! ठार झालों !"

हत्ती घेतला, आतां एखादा वाटाड्या हवा होता. तो मिळायला

विशेष अडचण पडली नाही. एका चुणचुणीत पारशाला मोठें बक्षीस देऊं केल्यावर तो यायला तयार झाला.

लगेच हत्तीचा साजशृंगार करण्यांत आला. वाटाड्यानें हत्तीच्या पाठीवर गादी, अंबारी वगैरेंची सर्व व्यवस्था नीट केली. सर फ्रान्सिस क्रोमार्टीनाही फॉगनें एक सीट देऊं केली आणि त्यांनीं आनंदानें तिचा स्वीकार केला. मग तिघेही प्रवासी अंबारींत चढून बसले. पासपार्तूला दोघांच्यामध्यें जरा अवघडून बसावें लागलें. पारशी वाटाड्या हत्तीच्या मानेवर म्हणजे माहुताच्या जागीं बसला आणि सुमारें नऊ वाजतां गजराजांनीं प्रवासाला सुरवात केली.

## : ८ : आणखी एक भानगड

**विंध्याद्रीच्या** अरण्यांतून हत्ती डुलत डुलत चालला. त्याचा वेग कांहीं वाईट नव्हता. संध्याकाळपर्यंत त्यानें पंचवीस मैलांची मजल मारली; आणि हा प्रवास मोठा मौजेचाही झाला. पासपार्तूला खूपच धक्के बसले. पण त्यानें आपल्या साहेबांच्या सांगण्यावरून खबरदारी घेतली होती—ती म्हणजे तोंड अगदीं मिटून घेतलें होतें. त्याच्या बडबड्या स्वभावाला ही गोष्ट जड गेली खरी, पण त्यामुळें ओठांवर दांत आपटून तोंड रक्तबंबाळ व्हायचें तरी वांचलें. कधीं कधीं धक्क्यामुळें घसरून तो पुढें आपटायचा, तर कधीं कधीं त्याची शेपटाच्या बाजूला घसरगुंडी व्हायची. पण त्याच्या विनोदी स्वभावामुळें त्याला याचीही गंमत वाटली. मधून मधून तो पिशवींतून खडीसाखर

काढून हत्तीला द्यायचा आणि हत्ती वाकड्या सोंडेनें ती उचलून गट्टम् करायचा. तसें करतांना त्या चलाख प्राण्याचा वेग मंदावत असेल म्हणाल तर तसें मुळींच नाहीं. अगदीं सहजगत्या चालतां चालतां तो हें करी.

रात्रीचा प्रवास धोक्याचा असल्यामुळें सूर्यास्तानंतर त्यांनीं एका पठारावर मुक्काम केला. आणि सकाळीं सहा वाजतां उठून पुन्हा वाटचालीला सुरवात केली. त्यांच्या वाटाड्याच्या मनांतून संध्याकाळपर्यंत अलाहाबाद गांठायचें होतें. तसें करतां आलें असतें तर फिलिअस फॉगच्या राखीव अठ्ठेचाळीस तासांपैकीं फारच थोडे तास खर्च झाले असते.

पण तसें होणार नव्हतें. चारच्या सुमाराला एक भलतीच अडचण उपस्थित झाली.

सुरळीत चाललेला हत्ती एकाएकीं अस्वस्थ झाला आणि अकस्मात् एका जागीं उभा राहिला. तो हालेचना.

"काय झालं बुवा ?" सर फ्रान्सिस उद्गारले.

"कांहीं कल्पना नाहीं" असें म्हणून वाटाड्यानें खालीं उडी मारली. तो जरा पुढें जाऊन कानोसा घेऊन आला.

"सती येते आहे" त्यानें वर्दी दिली.

सती म्हणजे काय हें तुम्हांआम्हांला माहीत आहे. पण या पाश्चात्य मंडळींना तें सर्वच कोडें असल्यामुळें वाटाड्याला सर्व खुलासेवार सांगावें लागलें. त्या काळीं सतीची चाल आपल्याकडे बंद झालेली नव्हती. नवरा मेल्यावर त्याच्या विधवा स्त्रीनें चितेवर उडी घेऊन स्वत:ही मरण पत्करणें म्हणजे सती. ही चाल क्रूरपणाची असली तरी आपल्याकडच्या बऱ्याच स्त्रिया ती स्वेच्छेनें पत्करीत. नवऱ्याबद्दलचें प्रेम व्यक्त करण्याचा तो एक मार्ग होता. पण हा मार्ग केव्हांही अतिरेकाचा, हट्टी आणि

मूर्खपणाचाच म्हटला पाहिजे. कोणाही स्त्रीला जबरदस्तीनें कोणी सती जायला सांगत नसे हें खरें असलें, तरी एकदा ही चाल रूढ झाली म्हणजे बऱ्याच बायकांच्या मनावर दडपण येत असेल; आणि त्या थोड्या फार भीतीनें देखील सती जायला तयार होत असतील. पण निग्रहानें पतिप्रेमामुळें मरण कवटाळणाऱ्या बायकांची कींव वाटली तरी त्यांचा उद्देश लक्षांत घेऊन या पद्धतीची उठल्या सुटल्या टर उडवणेंही बरोबर नाहीं.

हें सर्व त्या पारशानें बरोबरच्या मंडळींना समजावून सांगितलें. तेवढ्यांत सतीची मिरवणूक जवळ आलीच.

युरोपियन लोकांना चमत्कारिक वाटावी अशीच ती मिरवणूक होती.

पहिल्यानें तासे, तुताऱ्या, शंख, भेरी वाजवणारे वाजंत्री आले. मग अंगाला भस्म व गंध फासलेले व डोक्याला जरीचे रुमाल गुंडाळलेले उपाध्ये आले. तोंडानें ते सारखे कसले तरी मंत्र बडबडत होते. मागोमाग कालीमातेची पालखी आली. गळ्यांत रुंडमाला घातलेली आणि पायाखालीं राक्षसाला तुडवणारी ती चार हातांची मूर्ति पाहून पासपार्तू तर घाबरूनच गेला. पालखीच्या मागें एक तरुण स्त्री चालली होती—किंवा तिला दोघां पुजाऱ्यांनीं दोन बाजूंनीं धरून चालवलें होतें म्हटलें तरी चालेल. तिच्या मागोमाग चौघांनीं खांद्यावर घेतलेली एक तिरडी येत होती. तिरडीपुढें एकजण मडकें धरून चालला होता आणि मडक्यांतून निघणाऱ्या उग्र दर्पानें वातावरण भरून जात होतें.

तिरडीवर बांधलेलें प्रेत श्रीमंती कपड्यांत गुंडाळलेलें असलें तरी म्हाताऱ्या माणसाचें होतें.

सर फ्रान्सिस आश्चर्यानें म्हणाले, "सती जाणाऱ्या स्त्रिया आपखुशीनें

जीवदान देतात हें खरं असलं, तरी असल्या म्हाताऱ्यासाठीं या पोरीनें जीव द्यायला निघावं हें किती वाईट, नाहीं ?"

पार्शी वाटाड्या बारीक नजरेनें सगळा प्रकार पाहात होता. त्यानें शेवटीं सांगितलें, "साहेब, हा आपखुषीचा प्रकार नाहीं. ही आजची सती म्हणजे जुल्मजबरदस्ती आहे."

"तें कसं काय ?"

"या मुलीची हकीकत आसपासच्या गांवात सर्वांना माहीत झालेली आहे. जगांत चांगल्याबरोबर वाईट लोकही असतात. सतीच्या चालीचा गैरफायदा घेणारे दुष्ट कांहीं कमी नाहींत. केवळ पैशासाठीं मुलीचं लग्न त्या म्हाताऱ्याशीं लावण्यांत आलं. आतां तिचा पैसा मिळवण्यासाठीं तिला जाळून हे लोक मोकळे होणार आहेत. ती स्वतः सती जायला मुळींच तयार नव्हती."

"मग ती धडपड कां नाहीं करीत मुळींच ?"

"उपयोग काय धडपडीचा ? शिवाय तिला भांग पाजलेली आहे. त्यामुळें ती शुद्धीवर देखील नाहीं."

"तिला सती केव्हां देणार आहेत ?"

"उद्यां सूर्योदयाच्या वेळीं. इथून दोन मैलांवर एक देऊळ आहे तिथें नदीच्या कांठांवर."

फिलिअस फॉगनें एक अमूल्य मिनिट विचार करण्यांत घालवलें. मग तो सर फ्रान्सिस क्रोमार्टीकडे वळून म्हणाला, "ब्रिगेडियर-साहेब, या पोरीला वांचवूं या आपण ?"

"म्हणतां काय, मि. फॉग ?"

"त्यांत काय झालं ? अजून बारा तास माझ्या शिल्कींत आहेत. मग हें सत्कृत्य केलेलं काय वाईट ?"

सर फ्रान्सिस आवेगभरानें म्हणाले, " मि. फॉग, तुमचं हृदय अगदीं योग्य जागेवर दिसतं. "

फॉग घड्याळाकडे पाहात म्हणाला, " होय. कारण मला सध्या भरपूर वेळ आहे. "

•

## : ९ : अरण्यांत काय घडलें?

वेळ पुरेसा असल्यामुळेंच फिलिअस फॉग तें विकतचें श्राद्ध घ्यायला तयार झाला.

लगेच त्यानें आपल्या मित्रांबरोबर कांहीं मनसुबे केले आणि ती प्रेतयात्रा निघून गेल्यावर थोड्याच वेळानें ही मंडळी पुन्हा हत्तीवर बसून त्याच दिशेनें जाऊं लागली.

अर्ध्या तासांत त्यांनीं तें देऊळ गांठलें. देवळाभोवतीं दाट झाडी होती. त्यामुळें तिथें काय चाललें आहे तें त्यांना नीट दिसेना. तेव्हां रात्र पडेपर्यंत त्यांनीं वाट पाहिली.

काळोख होतांच त्यांनीं बघितलें तों मशाली घेतलेल्या सशस्त्र लोकांनीं देवळाला गराडा घातलेला. देवळांत पुजाऱ्यांचा कांहींतरी मंत्रघोष चालू होता आणि नदीकांठावर चिता रचलेली होती. पहाटेपर्यंत मंत्रपठण चालून सूर्य उगवतांक्षणीं चितेला भडाग्नि देण्याचा त्यांचा विचार होता. त्याच वेळीं तो सतीचा यज्ञही पार पडणार होता. देवळाच्या अंतर्भागांत कुठल्या तरी कोपऱ्यांत ती

पोरगी रडत बसली असावी. तिचा या बाहेरच्या मंडळींना कुठून पत्ता लागणार?

पण बाहेर दिसणाऱ्या या एकूण एक गोष्टी पासपार्तूनें चोरून पाहिल्या. आपल्या साथीदारांना सोडून तो एकटाच एका उंच वृक्षाच्या शेंड्यावर चढला होता आणि त्याच्या दाट पर्णराजींतून किलकिल्या दृष्टीनें खालचा प्रकार पाहात होता.

पाहतां पाहतां त्याच्या डोक्यांत एक अजब कल्पना आली. ती त्याला इतकी आवडली कीं त्यानें आपल्याशींच एक टाळी वाजवली. लगेच पारंब्यांना धरून लोंबकळत तो हलकेच खालीं उतरला.

हळुहळू रात्र सरत आली. पूर्वदिशेला तांबुस छटा दिसूं लागल्या. मंत्रोच्चारांना दुप्पट जोर आला. त्यांत आणखी वाजंत्रीची भर पडली. पुजाऱ्यांची ये जा सुरू झाली. जवळपासच्या गांवांतले लोक नेहमीं-प्रमाणें जमा झाले. सूर्य उगवायच्या जरा आधीं हा सगळा मेळावा मिरवत मिरवत नदीकांठावर गेला. बरोबर तिरडी होतीच. ती मोठ्या सन्मानपूर्वक चितेवर ठेवण्यांत आली. त्याच तिरडीवर सतीला जबर-दस्तीनें निजवण्यांत आलें. मग उपाध्येबुवांनीं विधिपूर्वक अग्नि दिला.

चिता धडधडून पेटली. पण त्याच क्षणीं दुसरा एक चमत्कार झाला. जमलेले लोक डोळे चोळून पाहातच राहिले. ते डोळे चोळीत होते, कारण चितेचा धूर त्यांच्या डोळ्यांत गेला होता म्हणून नव्हे! एक अगदींच अनपेक्षित प्रकार घडला होता. प्रेत उठून बसलें होतें!

बसलें तरी कुठलें? त्यानें ताडदिशीं चितेबाहेर उडीच मारली. आणि ती देखील एकट्यानें नाहीं. त्या तरुण मुलीला खांद्यावर टाकून तिच्यासह प्रेत बाहेर पडलें!

हा अद्भुत चमत्कार पाहिल्याबरोबर सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें यांत नवल काय? सर्व मंडळी इतकी घाबरून गेली कीं त्यांना काय करावें तें सुचेना. जमिनीला खिळल्यासारखे सर्वजण उभे राहिले. बोबडी वळल्यामुळें कोणाच्या तोंडून शब्दसुद्धा फुटेना.

फिलिअस फॉग आणि सर फ्रान्सिस क्रोमार्टी एका बाजूला उभे राहून हा प्रकार पाहात होते. त्यांनाही याचा कांहीं उलगडा होईना. तें जिवंत प्रेत जेव्हां त्या मुलीसह त्यांच्याच दिशेनें धांवत आलें तेव्हां तर त्यांच्या गोंधळांत आणखीच भर पडली.

"एक क्षणभरही थांबून उपयोग नाहीं. चला—पळ काढा!...." तें भूत आपल्या खांद्यावरचें ओझें उतरवून म्हणालें.

तो पासपार्तू होता! त्यानें रचलेला व्यूह जेव्हां या मंडळींच्या लक्षांत आला, तेव्हां त्यांच्या विस्मयाला पारावार राहिला नाहीं.

पण आतां जास्त वेळ न घालवतां तिघेही परत हत्तीवर स्वार झाले. त्या बेशुद्ध मुलीलाही त्यांनीं संभाळून वर घेतलें आणि हत्ती पिटाळला!

इकडे त्यांचें हें कारस्थान लवकरच पुजाऱ्यांच्या लक्षांत आलें. दूर कुठें तरी पडलेलें 'खरें प्रेत' त्यांना सांपडलें आणि झालेला प्रकार भुताटकीचा नसून या 'बदमाष' माणसांची ती कारवाई होती हें त्यांनीं ओळखलें. ताबडतोब त्यांनीं यांचा पाठलाग सुरू केला.

पण त्यांना हत्तीला गांठतां आलें नाहीं. त्या चतुर प्राण्याला एकंदर परिस्थिति कळली होती कीं काय कुणास ठाऊक! पण तो आतां दुप्पट जोरानें धावत होता एवढें खरें. लवकरच पुजारी मंडळीनें कंटाळून त्यांचा नाद सोडला आणि आपल्या दिग्विजयी हत्तीनें तें दाट अरण्य मोठ्या सफाईनें ओलांडून दहा वाजायच्या

सुमाराला अलाहाबाद गांठलें.

इथून कलकत्त्यापर्यंत रेल्वेनें जायला चोवीस तास लागणार होते. दुसऱ्या दिवशीं म्हणजे २५ ऑक्टोबर रोजीं कलकत्त्याहून हाँगकाँगकडे जाणारी आगबोट सुटणार होती. तेवढी वेळेवर गांठणें हें फिलिअस फॉगचें आतां उद्दिष्ट होतें.

## : १० : फिक्सची प्रतिज्ञा

**आवडा** हें त्या तरुण मुलीचें नांव. ती अजून बेशुद्धच होती. पण अलाहाबादच्या वेटिंग रूममध्यें ती शुद्धीवर आली. तिला सगळी हकीकत कळल्यावर तिनें या मंडळींचे फार आभार मानले. तिला जगांत नात्यागोत्याचें कोणीच नव्हतें. तेव्हां सध्या तरी आपल्या उपकारकर्त्यांबरोबर यात्रा करण्याचें तिनें पसंत केलें.

अलाहाबादला फिलिअस फॉगनें पारशी वाटाड्याला निरोप दिला. ठरवलेली रक्कम त्यानें त्याच्या हातावर ठेवली; एक पैसाही जास्त दिला नाहीं, हें जेव्हां पासपार्तूनें पाहिलें तेव्हां त्याला आश्चर्य वाटलें. आपल्या धन्याचा उदार स्वभाव त्याला माहीत होता आणि या माणसानें तर फॉगच्या लहरीसाठीं सर्व संकटांत स्वतःही बिनतक्रार भाग घेतलेला होता.

पण लवकरच पासपार्तूची शंका फिटली. कारण मि. फॉग यांनीं त्या वाटाड्याला बक्षिसी म्हणून तो सबंध हत्तीच देऊन टाकला !

दुसऱ्या दिवशीं बारा वाजतां आपले यात्रेकरू बनारसला पोचले. इथें ब्रिगेडियरसाहेबांचें मोहरें गळलें; कारण त्यांची लष्करी छावणी तिथून जवळच होती. जातांना त्यांनीं फॉगला बजावलें, "डोकं जरा यापेक्षां कमीच वापरून प्रवास केलात तरी चालेल. ईश्वर तुमचं भलं करो!"

सकाळीं सात वाजतां गाडी कलकत्याला पोचली. हाँगकाँगची आगबोट दुपारीं बारा वाजतां सुटणार असल्यामुळें फॉग मंडळीच्या वांट्याला आतां पांच तास उरले होते. आजची तारीख २५ ऑक्टोबर. वेळापत्रकाप्रमाणें फॉग कलकत्त्याला योग्य दिवशीं पोचला होता. दोन दिवस हातचे मिळालेले 'सती प्रकरणा' नें खाल्ले होते, पण त्याची त्याला एवढी फिकीर नव्हती.

पण आतां एक नवीनच संकट त्यांना सामोरें आलें. कलकत्ता स्टेशनच्या बाहेर हे प्रवासी पडतात न पडतात तोंच एका पोलीस अधिकाऱ्यानें येऊन त्यांना हटकलें.

"आपण मि. फिलिअस फॉग काय?"

"होय."

"आणि हा इसम आपला नोकर ना?"

"होय."

"माझ्याबरोबर चला, साहेब."

फॉगनें आश्चर्यानें विचारलें, "अन् या बाई?"

"त्याही आल्या तरी हरकत नाहीं."

दोन घोड्यांची एक गाडी तयार होती. तींत बसवून या मंडळींना वीस मिनिटांत पोलीस ठाण्यावर नेण्यांत आलें. त्यांना एका बांकावर बसायला सांगून पोलीस अधिकारी म्हणाला, "न्यायमूर्ति ओबादियांच्या पुढें तुमचा खटला साडेआठ वाजतां चालेल!"

हा सगळाच प्रकार बुचकळ्यांत टाकणारा होता. पासपार्तू हताशपणें म्हणाला,

" आणि बारा वाजतां बोट सुटणार ! संपलंच म्हणायचं ! "

फॉगसाहेब शांतपणें म्हणाले, " बाराच्या आंत आपण बोटीवर चढूं. "

बरोबर साडेआठ वाजतां जमादारानें त्यांना पलीकडच्या मोठ्या खोलींत नेलें. तिथें कोर्ट बसलेलें होतें. कोर्टांत हिंदी तसेच युरोपियन लोकही हजर होते. मॅजिस्ट्रेटच्या समोर एक बांक होता. त्यावरच फॉग, पासपार्तू व आवडा बसलीं.

न्यायमूर्ति ओबादिया ही एक लठ्ठ गुटगुटीत मूर्ति होती. खुंटीवरचा केसांचा टोप काढून या मूर्तीनें आपल्या डोक्यावर ठेवला आणि गुरगुर केली, " केस नंबर एक ! "

कोर्टाचा कारकून ओरडला, " फिलिअस फॉग—फिलिअस फॉग कोण आहे ? "

" हजीर ! " मि. फॉग उभे राहून म्हणाले.

" पासपार्तू ? "

" तो पण हजीर ! " नोकरानेंही उभें राहून उत्तर दिलें.

मॅजिस्ट्रेटसाहेब म्हणाले, " कैदी हो ! गेले दोन दिवस पोलीस तुमच्या पाळतीवर आहेत—"

" पण आमच्यावर आरोप तरी काय आहे ? " पासपार्तूनें विचारलें.

" कळेल " असें म्हणून कोर्टानें हुकूम करतांच एक दरवाजा उघडला आणि तीन भटजी येऊन ताठ उभे राहिले.

कारकुनानें त्यांची फिर्याद वाचून दाखवली. मुंबई येथील बाबुलनाथाच्या देवळांत भ्रष्टाकार केल्याचा त्यांचा आरोप होता; आणि याचा पुरावा म्हणून एक बुटांचा जोडही कोर्टांत हजर करण्यांत आला होता.

ते बूट पाहिल्याबरोबर पासपार्तू ओरडला " माझेच आहेत ते बूट !— द्या, द्या इकडे ! "

एवढी कबुली एका आरोपींनें दिल्यावर आणखी काय पाहिजे ? कोर्टानें झटपट खटल्याचा निकाल लावला.

" आरोपींना गुन्हा कबूल आहे ? "

फॉग थंडपणें म्हणाला, " कबूल. "

कोर्ट गंभीरपणें बोलूं लागलें, " ज्या अर्थी हिंदुस्थानांत कायद्यानें प्रस्थापित झालेल्या ब्रिटिश सरकारनें येथील रहिवाशांच्या धर्मांचें संरक्षण करण्याची हमी दिलेली आहे आणि ज्या अर्थी आरोपी पासपार्तूनें मुंबई-तील मलबार हिलवरच्या हिंदू मंदिरांत बूट घालून जाऊन भ्रष्टाकार केला हें सिद्ध झालें आहे, त्या अर्थी सदर आरोपी पासपार्तू याला कायद्याप्रमाणें पंधरा दिवसांची साधी कैद आणि तीन हजार रुपये दंड अशी शिक्षा करण्यांत येत आहे. आरोपी नंबर दोन फिलिअस फॉग यानें स्वतः भ्रष्टाकार केला नसला तरी आपल्या नोकराच्या कृत्या-बद्दल तो जबाबदार असल्यामुळें त्याला आठ दिवसांची साधी कैद आणि दीड हजार रुपये दंड अशी शिक्षा करण्यांत येत आहे.... केस नंबर दोन ! "

पण फिलिअस फॉग मध्येंच उभा राहून म्हणाला, " युवर ऑनर, मला जामीन द्यायचा आहे. "

" कायद्याप्रमाणें तुम्हांला तसा हक्क आहे " कोर्टानें कबूल केलें.

हें ऐकल्याबरोबर कोर्टांत हजर असलेल्या प्रेक्षकांपैकीं एकाच्या मस्तकांत तिडीक निघाली. हा प्रेक्षक म्हणजे गुप्तपोलीस महाशय फिक्स. या सगळ्या खटल्याच्या मुळाशीं फिक्सच होता एवढा कयास तुम्ही केलेला असेलच. कुठून तरी पकड-वॉरंट हातीं पडेपर्यंत आपली शिकार रोखून ठेवण्यासाठीं त्यानें रचलेला हा डाव होता. पण आतां जामि-

नाची भाषा निघाल्यावर त्याला पुन्हां अस्वस्थ वाटूं लागलें.

सुदैवानें हे आरोपी परदेशी असल्यामुळें कोर्टानें जामिनाची रक्कम जबरदस्त मागितली. ती म्हणजे प्रत्येकीं दहा हजार रुपये! तो आंकडा ऐकून फिक्सला जरा हायसें वाटतें न वाटतें तों फिलिअस फॉगनें आपलें पाकीट काढलें आणि वीस हजार रुपयांच्या नोटांचीं बंडलें कारकुनाच्या हातांत दिलीं.

कोर्टानें सांगितलें, "शिक्षा भोगून झाल्यावर तुम्हांला ही रक्कम परत मिळेल. दरम्यान तुम्हांला तूर्त जामिनावर मोकळें सोडलें आहे."

मि. फॉग यांनीं लगेच एक घोडागाडी ठरवली आणि पासपार्तू व आवडा यांना घेऊन ते बंदरावर गेले हाँगकाँगकडे जाणारी 'रंगून' बोट अर्धा मैल अंतरावर उभी होती. ती सुटायला अजून एक तास होता; पण मि. फॉग यांनीं एक क्षणही न दवडतां एक मचवा ठरवला आणि आगबोट गांठली.

इकडे गुप्त पोलीस फिक्सचा चडफडाट सुरू झाला. "काय पाजी बेदरकार माणूस आहे!" तो पुटपुटला. "वीस हजार रुपये म्हणजे दोन हजार पौंड पाहतां पाहतां टाकलेन्! हा असेच पैसे उधळीत चालला तर लवकरच दरोड्याची सर्व रक्कम खर्चून बसेल.... पण बच्चंजी! याद राख! जगाच्या अंतापर्यंत मी तुझी पाठ आतां सोडीत नाहीं!"

फिलिअस फॉगनें आतांपर्यंत खरोखरच पांच हजार पौंडांपेक्षांही जास्त खर्च केलेला होता. लंडनहून आणलेल्या रकमेला झपाट्यानें गळती लागली होती.

## : ११ : बिचारा पासपार्तू !

**लंडनहून** पकड-वॉरंट आलें कीं तें तातडीनें हाँगकाँगच्या पत्त्यावर पाठवण्याबद्दल फिक्सनें कलकत्त्याच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आणि 'रंगून' बोटीवर पाय ठेवून पुनश्च पाठलाग सुरू केला.

हाँगकाँग हें त्याचें शेवटचें आशास्थान होतें. कारण एकदा हाँगकाँग सोडलें कीं आगबोट चीन–जपानसारख्या परक्या देशांत शिरणार होती. त्या ठिकाणीं ब्रिटिश वॉरंटाचा कांहीं उपयोग झाला नसता.

वाटेंत कोळसा घेण्यासाठीं आगबोट सिंगापूरला थांबली. तेव्हां फिक्सनें बंदरांत उतरून तडकाफडकीं एक विद्युत्संदेश हाँगकाँगला धाडला आणि आपण येत असल्याची वर्दी तिथल्या पोलिसांना दिली. फॉग आणि मंडळींनींही सिंगापूर पाहण्यांत दोन तास घालवले.

पुढच्या प्रवासांत मात्र त्यांना वादळी हवेनें त्रास दिला. पांच सहा दिवस सतत उलटे वारे वाहात होते; त्यामुळें बोटीचा वेग मंदावून ती ५ नोव्हेंबरऐवजीं ६ नोव्हेंबरला पहाटे पांच वाजतां कँटन नदीच्या मुखाशीं पोचली आणि मग नदीच्या खडकाळ पात्रांतून वाट काढीत तिनें दुपारीं हाँगकाँगचें व्हिक्टोरिया बंदर गांठलें.

फिलिअस फॉगचें वेळापत्रक यामुळें ढासळलें ! याकोहामाकडे जाणारी 'कॅथे' आगबोट ५ तारखेलाच निघायची होती !

तरी पण त्यानें 'रंगून'च्या कप्तानाकडे चौकशी केली. तेव्हां त्याला उत्तर मिळालें, "कॅथे आगबोट उद्यां सकाळीं भरतीच्या वेळेला निघणार आहे."

"ओहो !" मि. फॉग एकदम उद्गारले. पासपार्तूनें तर मनांतल्या

मनांत कप्तानाला मिठीच मारली. फिक्स तिथें असतां तर त्यानें कदाचित् कप्तानाची मान मुरगळली असती.

" कालच ना जायची होती कॅथे ? " फॉगनें पुन्हा विचारलें.

"होय. पण तिची कांहीं डागडुजी करायची होती, त्यामुळें राहिली."

फॉगनें त्याचे मन:पूर्वक आभार मानले. आतां उद्यापर्यंतचे सोळा तास त्याच्या वांट्याला होते. ते आवडासाठीं खर्च करायचे असें त्यानें ठरवलें. हॅंगकॅंगमध्यें तिचे कोणी नातेवाईक व्यापाराच्या निमित्तानें राहात असल्याचें तिनें सांगितलें होतें. फॉगसाहेबांनीं एक पालखी करून तिला तिथल्या क्लब हॉटेलमध्यें नेलें. तिथें दोन खोल्या भाड्यानें घेतल्या; आणि पासपार्तूला आवडाच्या सोबतीसाठीं मागें ठेवून स्वत: शहरभर हिंडून त्या व्यापाऱ्यांचा शोध करण्याचा प्रयत्न केला. त्यांत शेवटीं असें निष्पन्न झालें कीं आवडाच्या त्या आप्तमंडळींनीं दोन वर्षांपूर्वींच चीन सोडलें आणि त्यांचा मुख्य व्यापार हॉलंडशीं असल्यामुळें तिथें झालेल्या ओळखीपाळखीच्या आधारावर त्यांनीं आतां हॉलंडमध्येंच कायमची वस्ती केली आहे.

ही माहिती त्यांनीं आवडाला दिल्यावर तिनें हळूच विचारलें, " मग मीं आतां काय करावं, साहेब ? "

" काय करावं तें उघडच आहे. आमच्याबरोबर युरोपला चलावं."

" पण—पण—तुम्हांला जो त्रास—"

" त्रास बीस मुळींच नाहीं. पासपार्तू, जा, उद्यां निघणाऱ्या 'कॅथे' बोटीवर आपल्यासाठीं तीन कॅबिनं राखून ठेव. तिकिटं काढलींच आहेत."


पासपार्तू आनंदानें या कामगिरीवर निघाला. आवडाबाई जाणार हें कळल्यावर त्याला थोडेसें वाईट वाटलें होतें. आतांपर्यंतच्या प्रवासांत

ती फारच मायेनें त्याच्याशीं वागली होती; त्यामुळें तिच्याबद्दल त्याला बराच आदर वाटायला लागला होता.

तो बंदरावर गेला तेव्हां त्याची आणि फिक्सची गांठ पडली. यापूर्वी 'रंगून'वर देखील त्याला भेटून फिक्सनें त्याच्याशीं लघळपणा केला होताच. 'जेथें जाऊं तेथें सांगाती' राहणाऱ्या या अवलिया-बद्दल पासपार्तूलाही आतां जरा कुतूहल वाटायला लागलें होतें हें खोटें नाहीं. फिक्सला जेव्हां आतां कळलें कीं या मंडळींचा मुक्काम उद्यांच हाँगकाँगहून हालणार, तेव्हां त्याला धक्काच बसला! कारण पकड-वॉरंट अजूनही आलेलें नव्हतें. तेव्हां एक जबरदस्त साहस करण्याचा त्यानें बेत केला. तें म्हणजे पासपार्तूला सर्व खऱ्या गोष्टी सांगून त्याला आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न करणें! आपला मालक गुन्हेगार आहे एवढें कळल्यावर प्रामाणिक पासपार्तू त्याच्याविरुद्ध आपल्याला मदत करील आणि आपण त्याचें प्रयाण रोखूं शकूं असें फिक्सला वाटत होतें.

पासपार्तूच्या खांद्यावर हात ठेवून तो मोठ्या प्रेमानें म्हणाला, "तिकिटं काढाल, राव. अगोदर थोडं पेय तर पिऊं या."

पासपार्तू आनंदानें कबूल झाला आणि बंदरापासून जवळच असलेल्या एका पानगृहांत ते दोघे शिरले. या ठिकाणीं नुसतींच सरबतें व दारू मिळत नसत. लांब लांब चिलमींमधून अफू व गुलाबाचा अर्क घातलेला तंबाखू ओढीत अनेक 'अफिमे' इथें खुर्च्यांवर पेंगत पडले होते. चीन हें अफूच्या व्यसनाचें आगर आहे आणि अशीं किती तरी पानगृहें चीन व हाँगकाँगमध्यें सांपडतात. चिलमींच्या विषारी धुरानें सबंध दालन भरून गेलें होतें. एखादा बहाद्दर खूप झिंगून खुर्चीतून खालीं पडला कीं तिथले नोकर त्याला उचलून आंतल्या पलंगावर नेऊन टाकीत. असे कितीतरी अफिमे आंत पडलेले होते.



या दोघांना अर्थात् तसलें कांहीं नको होतें. त्यांनीं साध्या नरम दारूचे ग्लास मागवले.

पेयपान चालू असतांना फिक्स एकदम म्हणाला, "तुम्हीं उद्यां

इथून जाऊं नये हें उत्तम!”

“म्हणजे?” पासपार्तू ग्लास आपटून म्हणाला.

“पासपार्तू, दोस्त! तुला सगळं सांगायला हरकत नाहीं. मी कोण आहे असं तुला वाटतं?” असें म्हणून फिक्सनें खिशातून आपली डायरी काढली आणि स्वतःचें अधिकारपत्र पासपार्तूला दाखवलें.

दा. क्र.

“तु–तु–तुम्ही गुप्त पोलीस आहां?”

“होय. आणि तुझा धनी फॉग हा महाइँबीस–गुन्हेगार आहे–”

फिक्सनें त्याच्या गुन्ह्याबद्दलचा संपूर्ण इतिहास पासपार्तूला सांगितला आणि म्हटलें, “बोल, अशा माणसाची चाकरी करून तुला काय मिळणार? त्याची पैज वगैरे जें तूं म्हणतोस त्या सर्व थापा आहेत. पंचावन्न हजार पौंड हातोहात लांबवणारा तो एक डाकू आहे. येतां जातां हजारांच्या नोटा उधळतोय् यावरूनच दिसतंय्. त्याच्या बापाचाच माल कीं नाहीं!”

बिचाऱ्या पापभीरू पासपार्तूला हें भयंकर वर्तमान ऐकून धक्काच बसला. पहिल्यानें त्याला खरेंच वाटलें नाहीं. इतका शूर, धाडसी, उदार माणूस गुन्हेगार असेल? आपला जीव धोक्यांत घालून आवडाला संकटांतून सोडवणारा आपला मालक चोर असेल? छट्! हें सुतराम् शक्य नाहीं.

पण फिक्सनें त्याच्या ‘अधिकृत’ वर्णनाचे जे एकेक पुरावे दिले त्यांनीं पासपार्तू निरुत्तर झाला. त्याला कांहीं बोलतांच येईना. बराच वेळ तो चिंताक्रांत झाला होता. पण शेवटीं मनाचा कांहीं निश्चय करून त्यानें उत्तर दिलें, “महाराज, तुम्ही हें जें सांगतांहां तें खरं असेल किंवा खोटं असेल. पण कांहीं झालं तरी मी त्यांच्या नोकरींत आहें. मी निमकहराम होणार नाहीं. मी त्यांना दगा देणार नाहीं. मग

काय होईल तें होवो!"

फिक्सनें एकंदर रागरंग ओळखला. आपली इथें डाळ शिजायची नाहीं हें त्यानें ताडलें. तेव्हां तो एकदम म्हणतो, "ठीक आहे! दोस्त, झालं गेलं विसरून जा! आपण इथें थोडंसं पेयपान करूं नि जाऊं. तुम्हांला चिलीम ओढून पाहायचीय् का इथली? जरा गंमत म्हणून पाहा ना? जास्त नाहीं, एकच!"

याही बाबतींत आपल्या मित्राला नाहीं म्हणणें बिचाऱ्या पासपार्तूला जड गेलें. तेव्हां तो त्याच्या आग्रहासाठीं म्हणून चिलीम ओढायला बसला.

"चढली बिढली नाहीं म्हणजे झालं!" तो म्लानपणें हसून म्हणाला, "बोट एक वाजतां सुटते. तोंपर्यंत गेलं पाहिजे मला."

फिक्सही हसला. त्यानें स्वतःसाठीं पण एक चिलीम मागवली. पण ती ओढल्याचें त्यानें नुसतें ढोंगच केलें. पासपार्तूच्या चिलमींत मात्र कडक अमली पदार्थ टाकण्याची तरतूद त्यानें केली होती. त्याचा लवकरच परिणाम झाला आणि पासपार्तूसाहेब हां हां म्हणतां बेहोष होऊन पऱ्यांच्या राज्यांत गेले.

## : १२ : शांघाय

**पासपार्तूवर** अफूचा अंमल चढत असतांना इकडे फॉग आणि आवडा काय करीत होतीं?

आवडानें युरोपपर्यंत येण्याचें एकदा कबूल केल्यावर तिला

कपड्यांची व इतर नेहमीं लागणाऱ्या जिनसांची खरेदी करणें आवश्यक होतें. फॉगप्रमाणें नुसती गोणपाटाची पिशवी घेऊन तिचें चाललें नसतें. तेव्हां फॉग तिला घेऊन बाजारांत गेला. संध्याकाळपर्यंत खरेदी आटपून तीं दोघें परत हॉटेलांत आलीं. त्यांनीं जेवण उरकलें आणि मग अगदीं विलायती रिवाजाप्रमाणें फॉगशीं हस्तांदोलन करून ती झोपायला गेली.

इकडे फॉगसाहेबांनीं 'टाइम्स' आणि 'इलस्ट्रेटेड लंडन न्यूज' या वृत्तपत्रांचें वाचन पुरें केलें आणि तेही आपल्या खोलींत झोपायला गेले. पासपार्तू अजून परतलेला नाहीं हें त्यांच्या लक्षांत होतें, पण आगबोट उद्यां सुटणार अशी त्यांची कल्पना असल्यानें त्यांनीं त्याची पर्वा केली नाहीं.

पण दुसऱ्या दिवशीं सकाळींदेखील पासपार्तू आला नाहीं. तेव्हां बोटीची वेळ होतांच हॉटेलचें बिल चुकतें करून एक मेणा ठरवून ते आवडासह बंदरावर गेले. तिथें त्यांना बातमी लागली कीं 'कॅथे' ची दुरुस्ती पुरी झाल्यामुळें ती कालच निघून गेली.

आगबोटही चुकली आणि नोकराचाही पत्ता नाहीं हें कळल्यावर त्यांची दुहेरी निराशा झाली. पण त्यांनीं चेहऱ्यावर कांहीं विकार दर्शवला नाहीं. ते उलट आवडाला म्हणाले, "प्रवासांत असं चालायचंच !"

त्यांच्या शेजारींच एक अनोळखी इसम उभा होता. तो आतां पुढें होऊन म्हणाला, "आपण 'रंगून' बोटीवर होतां, नाहीं ?"

"होय" फॉग म्हणाला. "पण आपली माझी—"

"शिवाय आपल्याबरोबर एक नोकरही होता. तो दिसत नाहीं ?"

"तोच तर आम्हांला काळजी लागली आहे" आवडा मध्येंच

म्हणाली. "कालपासून त्याचा पत्ता नाहीं. शिवाय बोट पण चुकली !"

"च् च्"! फिक्स उद्गारला. तो फिक्स होता हें तुम्हीं ओळखलेंच असेल. "मलाही 'कॅथे' वर जायचं होतं. आतां काय करणार ?"

"कॅथे नसली तरी दुसरी एखादी बोट मिळेल आपल्याला" फॉग म्हणाला. आणि लगेच तपासालाही निघाला.

पण बंदरांतलें कोणतेंही जहाज त्यांना मिळण्यासारखें नव्हतें. कांहीं जहाजांवर माल चढवणें चाललें होतें, तर कांहींवरचा माल खालीं उतरवण्यांत येत होता. नाहीं म्हणायला कँटन नदीच्या पैलतीरावर एखादें गलबत कदाचित् मिळालें असतें.

फॉग एक होडी ठरवून पलीकडे गेला. तिथें एका पायलट बोटीच्या मालकाशीं त्यानें बोलणें सुरू केलें.

पायलट बोट म्हणजे वाटाडी नौका. मोठीं जहाजें बंदराजवळ आलीं कीं त्यांना मार्गदर्शन करणें एवढेंच त्यांचें काम असतें. खोल समुद्रांत या नौका शिरत नाहींत.

पण पिशवी जरा खुली केली कीं अशीं कामें होऊं शकतात ही फॉगची कल्पना. तो म्हणाला, "मला चौदा तारखेच्या आंत याकोहामाला पोचायचं आहे. तूं एवढी कामगिरी करशील तर रोजीं शंभर पौंड या दरानें मी भाडं देईन. शिवाय काम फत्ते झाल्यावर दोनशें पौंड बक्षीस देईन."

त्या छोट्या कप्तानाच्या तोंडाला पाणी सुटलें. पण ही कामगिरी अशक्यप्राय होती. तो मान हलवून म्हणाला, "साहेब, माझी बोट अवघी वीस टनांची आहे. माझा नि तुमचेही साऱ्यांचे जीव धोक्यांत घालून भर समुद्रांतला हा सोळाशें पन्नास मैलांचा प्रवास—"

"फक्त सोळाशें !" फॉग म्हणाला.

" समजा ! सोळाशें. पण एवढा धोका पत्करून आपण निघालों तरी ठरल्या मुदतींत याकोहामा गांठणं शक्य नाहीं. त्यापेक्षां—"

" त्यापेक्षां काय ? "

" जपानच्या दक्षिण किनाऱ्यावरचं नागासाकी बंदर फक्त अकराशें मैल दूर आहे, आणि त्याहीपेक्षां चीनच्या समुद्रकांठावरचं शांघाय तर फक्त आठशें मैलांवर आहे. तिथें आपण गेलों तर ? "

" मला याकोहामाला जायचं आहे. नागासाकी नि शांघाय कितीही जवळ असलीं तरी करायचीं काय ? "

" माहीत आहे साहेब—" तो हुशार खलाशी म्हणतो, " पण आपण याकोहामाला जी आगबोट पकडणार ती तिथून निघत नाहीं. ती निघते शांघायहून. आणि मग नागासाकी हें पहिलं बंदर घेऊन नंतरच याकोहामाला जाते. शांघायला जाणं जास्त सोपं आहे. कारण आपल्याला खोल समुद्रांत शिरायला नको. "

" आगबोट शांघायहून किती तारखेला निघते ? "

" अकरा तारखेला. "

" तुला नक्की ठाऊक आहे ? "

" नक्की. आपण चौकशी करा ना, साहेब. आपल्यापुढें चार दिवस आहेत. ताशीं आठ मैल वेगानें गेलों तरी आपण शांघायला वेळेवर पोचूं शकतों. "

" छान ! मग तूं केव्हां निघूं शकशील ? "

" आणखी एक तासांत. "

" हे घे तुला हातखर्चाला दोनशें पौंड " फॉग पाकीट उघडीत म्हणाला.

आवडाला हें कळलें, तेव्हां तिला काळजी वाटली ती फक्त पासपार्तूबद्दल. पण फॉग म्हणाला, " त्याच्यासाठीं मला शक्य तें

सगळं मी करीन. "

फिक्सला हें कळलें तेव्हां पुन्हा त्याची गडबड उडून गेली. त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट एवढीच कीं फॉगनें त्याला "आपणही बोटीवर येऊं शकतां" असें उदारपणें सुचवलें. त्यानें अर्थातच तें निमंत्रण निर्लज्जपणें स्वीकारलें !

वाटाडी नौका मोठी सुरेख आणि वेगवती होती. कप्तान आणि त्याचे चार खलाशी यांनीं बोटीवर स्वच्छता आणि टापटीप झक्क ठेवली होती. त्यामुळें आमच्या प्रवाशांना खराखुरा आराम वाटला. आपल्या कामांतही ते खलाशी वाकबगार होते. दुसऱ्या दिवशीं उजाडायच्या आंतच त्यांनीं शंभर मैल अंतर तोडलें. ही प्रगति समाधानकारक होती. पण चिनी समुद्र हा मोठा घातकी समुद्र आहे. केव्हां त्याचें पाणी खवळेल त्याचा नेम नसतो. आणखी चोवीस तास गेल्यावर या मंडळींना त्याचें प्रत्यंतर आलें. वारा जोराचा वाहूं लागला आणि एकाएकी पावसालाही सुरुवात झाली. दिवसभर वादळाला जोर चढत होता आणि रात्रीं तर लाटांनीं पर्वतप्राय स्वरूप धारण केलें.

बिचारा इमानी कप्तान चिंताग्रस्त झाला आणि म्हणाला, " मला वाटतं, आतां एखाद्या बंदराला नेऊन भिडवावं जहाज. "

" मलाही तसंच वाटतं " फॉग म्हणाला.

" कोणत्या बंदराकडे नेऊं ? "

" शांघाय " फॉगनें थंडपणें उत्तर दिलें.

अधिक न बोलतां कप्ताननें नेटानें उत्तरेकडे जहाज चालवलें.

दुसऱ्या दिवशीं वादळ ओसरलें. दुपारीं बारा वाजतां किनारा दिसूं लागला. पण अजूनही याकोहामा शंभर मैल दूर होतें; आणि तिथें संध्याकाळपर्यंत पोचणें जरूरीचें होतें.

अक्षरश: घाम गाळून त्या खलाशांनीं चिकाटीनें नौका पुढें रेटली. पण दुर्दैवानें त्यांनीं शांघाय गांठण्यापूर्वी आगबोटीनें शांघाय बंदर सोडलें. तिचा पार्श्वभाग अजून स्पष्ट दिसत होता. तिच्या बंबांतून निघालेला काळ्या धुराचा लोटही जणूं कांहीं त्यांना चिडवायला त्यांच्याच दिशेनें येत होता.

मि. फॉग उठून उभे राहिले.

" हें पाहा, कप्तान ! तुमचा बावटा ताबडतोब खालीं उतरवा आणि धोक्याचा संदेश द्या. "

कप्तानानें निमूटपणें तसें केलें. वाटाडी नौकेवर एक छोटीशी तोफ होती. फिलिअस फॉगनें हुकूम देतांच तिला बत्ती लावण्यांत आली.

" धुड्डुम्–दर्रर्र— "

१३८०२
२१८।५२

# : १३ : पासपार्तूची कसरत

बेशुद्धावस्थेंत पासपार्तूला सोडून फिक्स निघून गेल्यावर पानगृहां तल्या नोकरांनीं नेहमींच्या पद्धतीप्रमाणें या अफिम्याची वाट लावली. पासपार्तूला झिंगलेल्या स्थितींत आंतल्या पलंगावर टाकण्यांत आलें.

तीन तासांनीं तो धडपडत उठला. अजूनही अफूची धुंदी उतरलेली नव्हती. पण अर्धवट स्मृति जागृत झाल्यामुळें 'कॅर्थे–कॅर्थे' असें ओरडत तो उठला आणि भिंतीला चाचपडत बाहेर पडला. तसाच अडखळत अडखळत तो धक्क्यावर गेला. 'कॅर्थे' आगबोट निघण्याच्या तयारींत उभी होती. तिचा जिना अजून काढलेला नव्हता. पासपार्तू

जिन्यावरून ठेचाळत बोटीवर आला आणि त्यानें डेकवर धाडदिशीं आंग टाकलें.

बोटीवरच्या खलाशांना हा प्रसंग नवीन नव्हता. कितीतरी झिंगलेल्या अफिम्यांशीं त्यांची दररोज गांठ पडे. त्यांनीं मुकाट्यानें त्याला उचलून एका कॅबिनमध्यें नेऊन टाकलें

संध्याकाळीं साडेसहा वाजतां 'कॅथे' नें हॉंगकॉंग बंदर सोडलें. पासपार्तू दुसऱ्या दिवशीं सकाळीं शुद्धीवर आला आणि त्यानें तातडीनें फॉग व आवडा यांची चौकशी केली. तीं दोघें या बोटीवर आलेलीं नाहींत हें कळतांच त्याच्या मस्तकावर वज्राघातच झाला. मग त्याला आठवलें कीं बोटीची वेळ बदलल्याचेंसुद्धा आपण मालकाला कळवलें नव्हतें. अर्थात् ते अजून क्लब हॉटेलमध्यें स्वस्थ आराम करीत असतील. खरी गोष्ट कळल्यावर ते आपल्याला शिव्यांची लाखोली वाहतील. अर्थात् मनांतल्या मनांत ! फॉगसाहेब बाह्यतः अगदीं शांत राहातील याबद्दल त्याची खात्री होती.

हा सगळा आपला फजितवाडा त्या फिक्सनें घडवून आणला. मालकाबद्दल कांहीं वेळ निष्कारण आपलें मत कलुषित झालें. पासपार्तू फिक्सवर दांत ओठ चावूं लागला. पण त्याचा काय उपयोग ? आतां पुढें काय करायचें तें ठरवलें पाहिजे.

पासपार्तूजवळ एक पैसाही नव्हता. सुदैवानें त्याच्या तिकिटाचे पैसे अगोदरच भरलेले होते आणि आगबोटीवर पांचसहा दिवस त्याला विचार करण्यांत घालवतां येणार होते.

१३ तारखेला सकाळीं आगबोट याकोहामा बंदरांत शिरली. पासपार्तू बंदरावर उतरला आणि गांवांत भटकूं लागला. त्याला एक विचार सुचला होता. तो म्हणजे तिथल्या फ्रेंच किंवा ब्रिटिश कॉन्सलला भेटून आपली सर्व हकीकत सांगावी. आणि त्याची मदत मागावी. पण

आपल्या मूर्खपणाचें गाऱ्हाणें गायला तो जरा कचरत होता. तेव्हां तसें करण्याऐवजीं दुसऱ्या कांहीं तरी मार्गानें पैसे मिळवता येतात कां तें पाहावें असें त्याला वाटलें.

इतक्यांत एक मनुष्य काठीला लावलेला मोठा फलक घेऊन जात असलेला त्याला दिसला. फलकावरची इंग्रजी जाहिरात पासपार्तूनें वाचली आणि त्याला एकदम हर्षाच्या उकळ्या फुटल्या. एका लहानशा जपानी कसरत–कंपनीची ती जाहिरात होती. निरनिराळे व्यायाम, हातचलाखीचे खेळ, जादू, जंतरमंतर वगैरे करमणुकीचे प्रकार ही मंडळी करून दाखवी. जाहिरातींत लिहिलें होतें कीं हा शेवटचा खेळ करून मंडळी अमेरिकेला जाणार !

अमेरिका !

पासपार्तूचें लक्ष त्या शब्दानें वेधलें. तो लगेच त्या माणसाच्या मागोमाग मंडळीच्या मुक्कामावर गेला आणि त्यानें मॅनेजरची गांठ घेतली. मॅनेजर मि. बॅटलकार नांवाचा अमेरिकन होता.

“ तुला नोकरी पाहिजे ? ” मॅनेजर म्हणाला, “ तूं कोण आहेस ? फ्रेंच ना ? मग तुला वेडींवाकडीं तोंडं करतां येत असतीलच ! ”

आपल्या राष्ट्राला दिलेला हा टोमणा ऐकून पासपार्तू लालबुंद झाला. पण तो एवढेंच म्हणाला, “ येतात. पण अमेरिकन लोकांइतकीं नाहीं येत ! ”

“ ठीक, ठीक. पण तुला मी विदूषकाची नोकरी द्यायला तयार आहें. ”

आपल्या प्रतिष्ठितपणावर हा घाला आहे असें पासपार्तूला वाटल्याशिवाय राहिलें नाहीं. पण आपली नड ओळखून तो विदूषक व्हायला तयार झाला.

त्या दिवशींचा कार्यक्रम बरोबर तीन वाजतां सुरू झाला. प्रेक्षकांची

तोबा गर्दी उडाली होती. थिएटर गच्च भरलें होतें. ज्या खेळांत पास-पार्तूला काम दिलें होतें तो ‘ माणसांचा पिरामिड ’ सर्वांत शेवटचा खेळ होता. या पिरामिडमधलीं माणसें ‘ लांबनाक्ये ’ म्हणून प्रसिद्ध होतीं. मध्ययुगीन जपानी माणसांचा पोशाख त्यांनीं केला होता आणि आपलें वैशिष्ट्य म्हणून प्रत्येकानें आपलें खूप लांब नाक धारण केलें होतें. हें नाक अर्थात् खोटें, लाकडाचें केलेलें होतें. खूपच लांब नाकें होतीं हीं. कोणाचें पांच फूट तर कोणाचें दहा फूट लांब नाक होतें.

या लांबनाक्यांपैकीं कांहींजण रंगभूमीवर पाठ टेकून आडवे झाले आणि त्यांनीं आपल्या नाकांचीं टोकें वर केलीं. या माणसांतला एक आयत्या वेळीं सोडून गेल्यामुळेंच पासपार्तूला त्याच्या जागीं घेतलें होतें. पासपार्तू चांगला मजबूत बांध्याचा आणि तरतरीत माणूस होता आणि हें काम तो नक्की चांगलें करील असें मॅनेजरला वाटत होतें. या खालच्या मंडळींच्या अंगावर दुसरे लांबनाक्ये चढले आणि त्यांच्या अंगावर आणखी एक तिसरी टोळी विराजमान झाली. अशा रीतीनें चार मजले तयार झाल्यावर सर्वांत वरच्या खेळाडूंचीं नाकें थेट छताला जाऊन भिडलीं आणि मानवी पिरामिड तयार झाला. खूपच कौशल्याचें तें काम होतें यांत शंका नाहीं.

पिरामिड पूर्ण होतांच थिएटरभर टाळ्यांचा नुसता कडकडाट झाला. पण त्याच कडकडाटांत इकडे पिरामिडही कडकड आवाज करीत कोलमडला. . .

चूक आपल्या पासपार्तूचीच होती आणि आपण चूक केली याची जाणीव वाटण्याइतकें त्याचें चित्तही ठिकाणावर नव्हतें.

तें चित्त प्रेक्षकांपैकीं दोघां व्यक्तींकडे गेलें होतें.

वरून धडाधड माणसें कोसळत असतांना त्यांना बाजूला सारीत तो झपाट्यानें प्रेक्षकवर्गांत आला आणि ओरडला, “ साहेब, साहेब ! ”

" कोण ? पासपार्तू ? "

" होय मीच, साहेब, मीच ! तुमच्या पायांचा नोकर ! मला क्षमा करा, साहेब. "

फिलिअस फॉग त्याचा हात धरून म्हणाला, " चल, चल लवकर. बोट सुटायची वेळ झाली ! "

फॉग, आवडा आणि पासपार्तू धावतच निघाले. अमेरिकेकडे जाणारी आगबोट अगदीं निघण्याच्या बेतांत होती; ती त्यांनीं शेवटच्या क्षणाला पकडली. 'लांबनाक्ये मंडळी' चा मॅनेजर संतापून हातपाय आपटीत त्यांच्या मागें आला होता; त्याच्या हातांत फॉगनें घाईघाईनें बऱ्याचशा नोटा कोंबल्या.

आगबोट साडेसहा वाजतां याकोहामाहून सान फ्रान्सिस्कोकडे निघाली.

## : १४ : पुन्हा फिक्स !

**याकोहामांत** फिलिअस फॉगनें आपल्या नोकराला पुन्हा गांठलें, यावरून त्या वाटाड्या नौकेनें आपलें काम फत्ते केलें हें स्पष्ट झालेंच आहे. तेव्हां मध्यंतरींचा वृत्तांत तुम्ही कल्पनेनें जुळवून घेऊं शकतां.

पासपार्तूच्या तोंडून त्याची सगळी हकीकत ऐकून घेतल्यावर फॉग त्याला रागावला नाहीं. कांहीं न बोलतां त्यानें नवे कपडे आणण्यासाठीं त्याला पैसे दिले.

याकोहामाहून सान फ्रान्सिस्कोकडे जाणारी आगबोट पॅसिफिक

मेल कंपनीची होती. तिचें नांव जनरल ग्रँट. तिचा वेग चांगला होता आणि ती पॅसिफिक महासागर एकवीस दिवसांत ओलांडील अशी अपेक्षा होती.

याकोहामा सोडल्याला नऊ दिवस झाले आणि फिलिअस फॉगच्या लक्षांत आलें कीं आपण निम्मी पृथ्वीप्रदक्षणा पुरी केली आहे. पृथ्वीच्या गोलाचे एकंदर रेखांश ३६०. त्यांतला १८० वा रेखांश आगबोटीनें नोव्हेंबरच्या २३ तारखेला ओलांडला. या निम्या अंतरासाठीं फॉगचे बावन्न दिवस खर्च झाले. आणि आतां त्याच्या वांट्याला फक्त अठ्ठावीस दिवस शिल्लक राहिले होते ही गोष्ट खरी. पण आतां यापुढचा त्याचा प्रवास सरळ आणि निर्वेध होता. त्याच्या मार्गांत अडथळे उभे करणारा तो फिक्स—

पण थांबा ! फिक्सनें अजून त्याची पाठ सोडलेली नव्हती. हाँगकाँगला गेलेलें पकड-वॉरंट याकोहामाच्या ब्रिटिश वकिलातीकडे पाठवण्यांत आलें होतें. तें फिक्सला मिळालें. पण त्याचा आतां उपयोग नव्हता. कारण याकोहामांत ब्रिटिशांचा अंमल नव्हता. जपानी अधिकाऱ्यांना भेटून दुसरे कांहीं उपाय योजण्यालाही वेळ नव्हता. तेव्हां फिक्स चडफडत 'जनरल ग्रँट' बोटीवर चढला. फॉगच्या मागोमाग पुन्हा थेट इंग्लंड-पर्यंत जाणें त्याला आतां भागच होतें.

बोटीवर शक्य तों छपून राहाण्याचें त्यानें ठरवलें होतें. पण पासपार्तूनें त्याला पाहिलेंच. तत्क्षणीं त्यानें चित्त्यासारखी उडी मारून फिक्सचें नरडें पकडलें, त्याला खालीं पाडलें आणि यथास्थित बुकलून काढलें. आसपासच्या उतारूंची फुकटांत करमणूक झाली.

"झाल्ं तुझं समाधान?" फिक्स आपले कपडे झटकीत उठून म्हणाला. "मला तुझ्याशीं कांहीं बोलायचं आहे."

"खड्ड्यांत गेलास तूं!"

"तुझ्या मालकाबद्दलच आहे तें."

फिक्सचा हा कोडगेपणा पाहून पासपार्तू इतका सर्द झाला कीं मुकाट्यानें त्याच्याबरोबर त्याच्या जवळच्या बांकावर बसून त्यानें फिक्सकडे प्रश्नार्थक मुद्रेनें पाहिलें.



फिक्स

"तूं मला मारलेंस, त्याबद्दल मला कांहीं म्हणायचं नाहीं. मला तुला एवढंच सांगायचं आहे कीं यापुढें मी तुला मदतच करीन. त्रास देणार नाहीं."

"म्हणजे आमचे साहेब साव आहेत एवढं पटलं म्हणायचं तुला?"

"मुळींच नाहीं! उलट माझी खात्री झाली आहे कीं तो पक्का चोर आहे! पण मी आतां इंग्लंडला पोचेपर्यंत त्याच्यावर वॉरंट बजावूं शकत नाहीं. त्यामुळें तो जितक्या लवकर इंग्लंडला पोचेल तेवढं मला बरंच. अर्थात् यापुढें मी तुमच्या प्रवासांत अडचणी आणणार नाहीं. उलट तुम्हांला मदतच करीन."

पासपार्तू त्याच्याकडे डोळे ताणून पाहात राहिला.

'जनरल ग्रँट' नें आपला प्रवास बिनबोभाट आणि वेळेवर पुरा केला. डिसेंबरच्या ३ तारखेला तिनें सान फ्रॅन्सिस्कोच्या गोल्डन गेटमधून प्रवेश केला.

फिलिअस फॉगनें उतरल्याबरोबर न्यूयॉर्ककडे जाणाऱ्या आगगाडीची चौकशी केली. ती संध्याकाळीं सहा वाजतां सुटणार होती. म्हणजे सबंध दिवस मोकळा होता. फॉगनें पहिल्यानें आपल्या पासपोर्टवर सह्या घेण्याचा विधि उरकला, नंतर बाजारांत हिंडून स्वतःसाठीं व आवडा-साठीं कांहीं खरेदी केली. पासपार्तूनें दोन तीन बंदुका व पिस्तुलें

विकत घेतलीं. "वाटेंत रेड इंडियन लोक पुष्कळदा आगगाडीवर हल्ला करतात. तेव्हां हत्यारं असलेलीं बरीं" असा त्यानें खुलासा केला.

परत धक्क्यावर येतात तों येरझारा घालीत असलेल्या फिक्सनें त्यांना पाहिलें.

"ओहो! आपण याच बोटीनें आलांत कीं काय?"

"अन् आपणसुद्धा याच?"

"हो ना! कसा योगायोग आहे, नाहीं? आतां अमेरिकेंत कांहीं स्थळं वगैरे बघायला जाणार असलां तर मीदेखील तुमच्याच बरोबर येईन, बरं का?"

"अवश्य अवश्य!" फिलिअस फॉगनें उत्तर दिलें.

# : १५ : अमेरिकेंतले अनेक विक्रम

**अमेरिका** म्हणजे प्रचंड देश आहे. या देशाचें पश्चिम किनाऱ्यावरचें बंदर म्हणजे सान फ्रान्सिस्को आणि पूर्व किनाऱ्यावरचें बंदर न्यूयॉर्क. हीं दोन्हीं मोठीं शहरें अखंड रेल्वेनें जोडलेलीं असून तिची पूर्वपश्चिम लांबी ३७८६ मैल आहे. पहिल्यानें 'सेंट्रल पॅसिफिक' नांवाची रेल्वे सान फ्रान्सिस्कोपासून ऑगडेनपर्यंत पोचवते. ऑगडेन हें युटा संस्थानांत खाऱ्या तलावाच्या पूर्वेकडे चाळीस मैलांवर आहे. तिथून पुढें ओमाहापर्यंत 'यूनियन पॅसिफिक' या रेल्वेनें जावें लागतें. ओमाहा हें नेब्रास्का संस्थानांत मिसुरी नदीच्या काठांवर आहे. ओमाहाहून पुढें न्यूयॉर्कशीं जोडणाऱ्या रेल्वेच्या पांच शाखा आहेत. हें एकूण अंतर

तोडायला पूर्वी सहा सहा महिने लागत असत. अलिकडे आगगाडीनें फक्त सात दिवसांत हा प्रवास पार पडे.

आणि फॉगला सात दिवसांत हा प्रवास उरकणें भागच होतें. तरच त्याला न्यूयॉर्कहून अकरा तारखेला निघणारी आगबोट पकडतां आली असती.

वेळापत्रकाप्रमाणें हें जमण्यासारखें होतें; पण गाड्या नेहमींच वेळापत्रकाप्रमाणें वागत असें नाहीं. कारण ओमाहा आणि सिएरा नेव्हाडाच्या दरम्यान जी प्रचंड वुरणें होतीं त्यांत रानटी हिंस्र प्राणी तर असतच, पण शिवाय रेड इंडियन लोकांच्या टोळ्या दडून बसलेल्या असत.

तीन दिवस आणि तीन रात्री प्रवास केल्यानंतर, म्हणजे १३८२ मैलांचें अंतर काटल्यानंतर आपल्या या प्रवाशांनाही लुटारूंनीं गांठलें. एकाएकीं पिस्तुलाचे बार आणि उतारूंच्या किंकाळ्या यांचा हलकल्लोळ माजला. आगगाडी सावकाश चाललेली आहे असें पाहून गवताआड लपलेल्या रेड इंडियनांनीं अकस्मात् छापा घातला होता. ते एंजिनाच्या पायफळ्यांवर चढले आणि आंत शिरून त्यांनीं ड्रायव्हर व भट्टी-वाल्याच्या मुसक्या बांधल्या आणि एंजिन आपल्या ताब्यांत घेतलें. नंतर त्या एकांत जागीं गाडी उभी करून ती मनसोक्त लुटण्याचा त्यांचा बेत होता. पण त्यांना एंजिनांतल्या यंत्रांची भानगड समजेना. त्यांच्यां-तल्या एका शिष्टानें कांहीं चक्रें मागेंपुढें केलीं. त्याचा परिणाम उलट गाडी जास्तच वेगानें धावण्यांत झाला.

फिक्स आणि फॉग यांच्या लक्षांत एकंदर प्रकार येतांच ते पिस्तुलें व बंदुका घेऊन पुढच्या डब्याकडे धावले. आगगाडीच्या पुढच्या डब्यापासून तों मागच्या डब्यापर्यंत हिंडतां यावें म्हणून नवीन पद्धतीचा बोळ केलेला होता. त्यामुळें यांना अगदीं थेट

पुढच्या डब्यापर्यंत जाऊन आपल्या उतारू सोबत्यांना धीर देतां आला. कांहीं लुटारू डब्यांतूनही चढले होते आणि त्यांची उतारूंशीं मारामारी चालली होती. फॉग आणि फिक्स यांची सशस्त्र कुमक येतांच त्यांचा निकाल लागला आणि एंजिनांत चढलेले लुटारूही मग डब्यांकडे फिरकूं शकले नाहींत.

दरम्यान एंजिन जवळ जवळ शंभर मैल वेगानें धावत सुटलें होतें. वाटेंत प्लाट नदीवर फोर्ट किअर्नी हें किल्लेबंद स्टेशन लागणार होतें. तिथें अमेरिकन शिबंदी होती. पण त्या ठिकाणीं आगगाडी थांबणार असेल तर ना? जर तिथें न थांबतां गाडी सरळ पुढें गेली असती तर पुढचें स्टेशन येईपर्यंत रेड इंडियनांनीं गाडीचा पूर्ण कबजा घेतला असता आणि मग उतारूंचे हाल कुत्रा खाता ना!

पण फोर्ट किअर्नीला गाडी थांबणार कशी? कोणती युक्ति करून गाडी उभी राहील असें करायचें?....थांबा! अशा वेळीं आमच्या पासपार्तूचें जर डोकें चाललें नाहीं तर त्याचा काय उपयोग?

पासपार्तूनें काय केलें, माहीत आहे? कोणालाही न कळवतां तो आगगाडीच्या पुढच्या डब्याच्या दारांतून बाहेर ओळकंबला आणि त्यानें मोठ्या सफाईनें डब्याच्या कट्ट्यावर पाय टेकले. नंतर एका हातानें डब्याची बाहेरची बाजू घट्ट पकडून तो फार जपून खालीं वाकला आणि एंजिन व पुढचा डबा यांना जोडणाऱ्या ज्या सांखळ्या होत्या त्या त्यानें सोडवल्या. लगेच एंजिन आणखीच झपाट्यानें निघून गेलें आणि आगगाडी मागें राहिली!

इतका वेळ गाडी भयंकर वेगानें आलेली असल्यामुळें ती एकदम थांबणें अर्थात् शक्य नव्हतें. एंजिन सुटलें तरी आगगाडी बराच वेळ

वेगानें चालली होती. तिचा वेग अर्थात् आतां कमी कमी होत गेला आणि फोर्ट किअर्नी स्टेशनापासून अलीकडेच गाडी उभी राहिली.

स्टेशनजवळच्या किल्ल्यांतल्या संत्र्यांनीं एकटेंच धावत असलेलें एंजिन पाहिलें होतें आणि नंतर धापा टाकीत येत असलेली बिन-एंजिनाची आगगाडी पाहिली होती. ते अर्थातच बंदुका घेऊन धावले. गार्डीतल्या उतारूंची गणती करण्यांत आली तेव्हां तिघेजण कमी भरले. या तिघांतच पासपार्तूही बेपत्ता झाला होता.

काय झालें त्या तिघांचें? मारामारींत ते ठार झाले काय? कीं, गाडीचा वेग मंदावला त्या वेळीं जे रेड इंडियन जीव घेऊन पळाले त्यांनीं या लोकांना कैद करून नेलें होतें?

समाधानाची गोष्ट एवढीच होती कीं बाकीच्या उतारूंपैकीं कोणा-लाही जिवावरची जखम झालेली नव्हती. त्यांच्या किरकोळ जखमा बांधायला किल्ल्यांतले डॉक्टर वगैरे तयार होतेच.

पासपार्तू पुन्हा बेपत्ता झाल्याचें कळतांच आवडाच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. आणि फॉग—

फिलिअस फॉग आपले हात छातीशीं एकांत एक अडकवून क्षण-भरच ताठ उभा राहिला. त्याचा प्रत्येक क्षण मोलाचा होता. पण एक कांहींतरी निर्णय घेणें आणि तोही एका क्षणांत घेणें त्याला अगत्याचें होतें.

पासपार्तूचें काय झालें, त्या दुसऱ्या दोघां प्रवाशांचें काय झालें याची पर्वा न करतां पुढचा प्रवास चालू ठेवावा, कीं त्या तिघांचा शोध आधीं लावावा आणि—आणि तेवढ्यासाठीं वेळप्रसंगीं पैजेवर पाणी सोडावें?

दुसऱ्याच क्षणीं फॉग तिथल्या लष्करी प्रमुखाला म्हणाला, "कॅप्टन-साहेब, पासपार्तू मेलेला असो जिवंत, असो, मी त्याचा शोध लावणार!"

कॅप्टननें हें ऐकल्याबरोबर तीस सैनिकांचें एक पथकच त्याच्या मदतीला दिलें.

फिलिअस फॉग ही छोटी फौज घेऊन रात्रीच्या काळोखांत मोहिमेवर गेला—

आणि तांबडे फुटायच्या आंत शत्रूच्या ताब्यांतल्या तिघांही कैद्यांना सोडवून घेऊन तो सुखरूप परत आला! त्या वेळीं थंडीचा कडाका पडला होता आणि जिकडे तिकडे बर्फच बर्फ दिसत होतें.

आल्याबरोबर लोकांच्या जयजयकाराकडे दुर्लक्ष करून फॉगनें आगगाडीची चौकशी केली. तेव्हां त्याला कळलें कीं मोकाट सुटलेल्या त्या एंजिनचा ड्रायव्हर आणि भट्टीवाला हे पुढें शुद्धीवर आले. समोरच्या यंत्रांशीं घालमेल करीत असलेले ते बेरड लुटारू त्यांना दिसतांच मागून त्यांच्यावर हल्ला करून त्यांनीं त्यांना एंजिनाबाहेर भिरकावून दिलें आणि एंजिन फोर्ट किअर्नी स्टेशनकडे माघारें आणलें. त्यानंतर तें त्याच आगगाडीला जोडून—

"म्हणजे गाडी गेली म्हणतां कीं काय?" पासपार्तूनें मध्येंच विचारलें.

"गेली, ताबडतोब गेली! उगाच उतारूंचा खोळंबा कशाला करायचा?"

"खरं आहे तें!" पासपार्तू कपाळावर हात मारून उद्गारला. पुन्हा एकदा आपल्याच लवालावीमुळें असा घोटाळा व्हावा याचें त्याला अतिशय वाईट वाटलें.

फिलिअस फॉग मात्र निर्विकार चेहरा करून उभा होता. यानंतरची गाडी संध्याकाळशिवाय नाहीं ही माहिती त्याला नुकतीच कळली होती आणि आपलें वेळापत्रक यामुळें वीस तासांनीं फिसकटलें आहे याची पूर्ण जाणीव त्याला होती.

फॉगला मदत करायला वचनबद्ध झालेला फिक्स आतां त्याच्या-जवळ गेला आणि म्हणाला, "एक मार्ग सांगूं?"

"बोला."

"आपल्याला घसर–नौका मिळूं शकेल. तिनें आपण ओमाहाला जाऊं. ओमाहाहून न्यूयॉर्कपर्यंत वाटेल तेवढ्या आगगाड्या आहेत."

घसर–नौका ही वाफेनेंच चालणारी नौका असते. पण ती पाण्याऐवजीं बर्फावरून चालूं शकते. पाणी थिजून त्याचें बर्फ झालें कीं साऱ्या आगबोटी त्यांत रुतून बसतात; पण या घसर–नौका त्यावरून घसरत जाऊं शकतात.

फॉगनें ही योजना तत्क्षणीं मंजूर केली; आणि तिथल्या तिथें एक घसर–नौका ठरवून तींत ही सर्व मंडळी चढली. ही विचित्र होडी बर्फावरून चाळीस मैल वेगानें जाऊं शके! ओमाहापर्यंतचें अंतर दोनशें मैलांचें होतें, तें तिनें खरोखरच पांच तासांत तोडलें. फॉगनें नौकेच्या मालकाला भरपूर इनाम दिलें आणि स्टेशनांत तयारच असलेल्या आगगाडीचीं तिकिटें काढलीं. पुढें शिकागोपर्यंतचा त्यांचा प्रवास सुरळीत पार पडला. शिकागोला गाडी बदलायची होती. त्याप्रमाणें त्यांनीं नवीन 'पिट्सबर्ग शिकागो लाइन' च्या आगगाडींत पाऊल टेवलें.

यापुढचें अंतर नऊशें मैलांचें होतें. तें दीड दिवसांत तोडून दुसऱ्या दिवशीं रात्रीं गाडी न्यूयॉर्कला पोचणार होती. ती वेळेवर पोचली तरच त्यांना इंग्लंडकडे जाणारी आगबोट गांठतां येणार होती.

पण आगगाडी न्यूयॉर्क स्टेशनांत शिरली त्या वेळीं रात्रीचे सव्वा अकरा वाजले होते. आणि 'क्युनार्ड लाइन' ची 'चायना' नांवाची ती आगबोट पाऊण तासापूर्वींच लिव्हरपूलकडे रवाना झाली होती!

# : १६ : 'हेन्रिएटा' खरी 'आगबोट' ठरली !

या आघाताला उत्तर म्हणून फिलिअस फॉगनें रात्रीं न्यूयॉर्कच्या हॉटेलांत गाढ झोप घेतली; आणि दुसऱ्या दिवशीं उजाडतांक्षणीं तो उठून बंदरावर गेला. हडसन नदीच्या मुखावरचें न्यूयॉर्क हें जगांतलें एक अव्वल दर्जाचें बंदर आहे. तें नेहमींच तऱ्हेतऱ्हेच्या बोटींनीं गजबजलेलें असतें. आजही धक्क्याजवळ कितीतरी गलबतें होतीं. पण आज उद्यां प्रवासाला निघेल असें त्यांत एकही नव्हतें. नाहीं म्हणायला बंदरापासून जरा दूर एक लहानशी आगबोट उभी होती. तिच्या बंबांतून धूर निघत होता. यावरून ती कदाचित् निघण्याच्या तयारींत असेल असें वाटून फॉग एका होडींतून त्या बोटीजवळ गेला आणि वर चढून त्यानें तडक कप्तानाची गांठ घेतली.

"मला नि माझ्या तीन सोबत्यांना लिव्हरपूलला जायचंय्. पोचवाल ?"

"लिव्हरपूलला ?" कप्तान मान हलवून म्हणाला. "मी बोर्डोला चाललों आहे."

बोर्डो हें फ्रान्समधील एक बंदर.

फॉग पुन्हा म्हणाला, "मी तुम्हांला भरपूर पैसे देतों."

"छट् ! त्याचा कांहीं उपयोग नाहीं."

"मी सबंध आगबोट भाड्यानें घेतों."

"अं हं : !"

"विकत घेतों."

"छट् !"

हें उत्तर ऐकून फॉगच्या मुद्रेवर जरी एकही रेषा उमटली नाहीं,

तरी प्रसंग अतिशय बाका होता. आतांपर्यंत पैशानें कामें झालीं होतीं. इथें पैशाचें स्वागत 'छट्कारा'नें होत होतें.

विचार करतां करतां फॉगला एक कल्पना सुचली.

" अच्छा !" तो म्हणाला. "बोर्डाला तरी न्याल तुम्ही आह्मांला?"

"छट्! प्रत्येकाचं दोनशें डॉलर भाडं दिलंत तरी नेणार नाहीं.

" मी हजार डॉलर देईन."

"प्रत्येकाचे?"

"प्रत्येकाचे."

"आणि तुम्ही चौघं आहांत म्हणतां?"

"होय. आम्ही चौघं आहोंत."

कप्तानानें डोकें खाजवलें. 'आपल्या मार्गांत यत्किंचित् बदल न करतां बोट न्यायची. कसलाहीं त्रास नाहीं. फक्त या चार माणसांचें वजन घ्यायचें! मग सुखासुखीं मिळणारे हे चार हजार डॉलर कां दवडा?' असा विचार करून तो शेवटीं म्हणाला, "मी नऊ वाजतां निघणार आहे. तोंपर्यंत तुम्ही तयार राहा."

फॉग आणि मंडळी पावणेनऊ वाजतांच तयार झाली आणि फिक्ससकट 'हेन्रिएटा' बोटीवर चढली. आगबोटीनें नवाला न्यूयॉर्क सोडलें.

'हेन्रिएटा' भर समुद्रांत येतांच फॉगनें आपल्या कारवायांना सुरुवात केली. कप्तान आणि त्याचे खलाशी यांचे संबंध फारसे चांगले नाहींत एवढी माहिती त्याला मिळाली होती. लगेच आपलें पाकीट उघडून त्यानें नोटांची खैरात केली आणि सर्व खलाशांना आपल्या बाजूला मथवून घेतलें.

दुसऱ्या दिवशीं बारा वाजतां कोणीतरी 'हेन्रिएटा' च्या शिडीवर

चढून दुर्बिणींतून चारही दिशांची पाहणी करीत होतें. ही जबाबदारी वास्तविक कप्तानाची असते; पण आत्तांचा मनुष्य कॅप्टन स्पीडी नव्हता. तो फिलिअस फॉग होता.

कॅप्टन स्पीडी विचारा त्याच्या कॅबिनमध्यें कोंडला गेला असून कॅबिनला कुलूप ठोकलेलें होतें. आपल्याच बोटीवर कैदी म्हणून बसायचें कप्तानाच्या नशिबीं आलें होतें.

मि. फॉग आतां जहाजाचे कर्णधार बनले होते आणि ज्या पद्धतीनें ते खलाशांना हुकूम देत होते तीवरून ते या क्षेत्रांत चांगलेच तरबेज असावेत असें दिसत होतें. आवडा आणि पासपार्तू तर त्यांचें कौशल्य पाहून थक्क झालीं.

अर्थात् 'हेन्रिएटा'ची दिशा थोडी बदलून तिला बोर्डोऐवजीं लिव्हरपूलकडे नेतां यावें आणि तेंही मन मानेल तशा वेगानें, म्हणूनच केवळ ही अप्रिय गोष्ट फॉगसाहेबांना करावी लागली हें उघड आहे.

डिसेंबरची १६ तारीख उजाडली. म्हणजे लंडन सोडल्याला पाऊणशें दिवस झाले. अॅटलांटिक महासागर अर्धा ओलांडला गेला. समुद्राचा उरलेला प्रवास तितका अडचणीचा नव्हता. यशाची जवळ जवळ खात्री होती.

इतक्यांत त्याच दिवशीं बोटीच्या मुख्य एंजिनियरानें फॉगसाहेबांना खबर दिली कीं कोळसा संपत आला आहे.

"ठीक आहे. मी त्याबद्दल विचार करतों. दरम्यान तुम्ही काटकसर करूं नका. असेल तें सगळें सर्पण वापरा आणि वेग कायम ठेवा."

दोन दिवसांनीं मुख्य एंजिनियर म्हणाला, "आतां एक दिवसापुरतंही सर्पण नाहीं.

"ठीक आहे. जितके तास सर्पण पुरेल तितके तर चालवा. मी बघतों."

त्या दिवशीं दुपारीं बारा वाजतां मि. फॉग यांनीं पासपार्तुला सांगितलें, " कॅप्टन स्पीडीला सोडवून आण. "

पासपार्तूनें मुकाट्यानें कॅबिन उघडून कप्तानाला धरून डेकवर आणलें. तो हातपाय आपटीत व शिव्या हासडीत आला आणि किंचाळला, " पाजी ! हरामखोर ! बोल, तूं कुठें आणलं आहेस मला ? "

" लिव्हरपूलपासून सातशें सत्तर मैलांवर !" फॉगनें शांतपणें उत्तर दिलें.

" बदमाष ! डाकू ! "

" हें बघा महाराज, मीं तुम्हांला या गोष्टी बोलण्यासाठीं डेकवर आणलेलं नाहीं. मला ' हेन्रिएटा ' हवी आहे. "

" मी देणार नाहीं. "

" देणार नाहीं ? पण मग दुसऱ्याची आगबोट मी जाळूं कशी ? मला तर सर्पण हवं आहे. "

' जाळूं कशी ? पाजी माणसा ! पन्नास हजार डॉलर किंमतीची, बोट तूं जाळणार ! " स्पीडी किंचाळला.

" मी तुम्हांला साठ हजार डॉलर देतों " फिलिअस फॉग म्हणाला आणि त्यानें पाकीट काढलें.

या गोष्टीचा मात्र कॅप्टन स्पीडीवर भलताच परिणाम झाला. त्यानें ते साठ हजार डॉलर घेतले; इतकेंच नाहीं, तर तो आपला सर्व राग विसरून अगदीं नरमाईनें बोलायला लागला.

' हेन्रिएटा ' तसें म्हटलें तर वीस वर्षांची जुनी बोट होती. तिला एवढी किंमत येणें म्हणजे चांगलाच सौदा होता.

" एक मात्र अट आहे " तो धूर्त माणूस तेवढ्यांत म्हणतो. " बोटीचीं यंत्रं वगैरे लोखंडी माल शिल्लक राहील तो मला परत दिला पाहिजे. "

फॉग म्हणाला, " कबूल ! "

ही खरेदी पुरी होतांच बोटीची मोडतोड सुरू झाली. पहिल्यानें कॅबिनें फोडून त्यांच्या फळ्या जाळण्यांत आल्या. नंतर दरवाजे बाकें, खुर्च्या, टेबलें, डोलकाठ्या, शिडें हीं अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडलीं. पुढें डेकचे लाकडी कठडे करवतीनें कापून भट्टींत फेकण्यांत आले. खलाशांनीं मारे जोरजोरांत हा विध्वंस चालवला होता आणि त्यांना पासपार्तू उत्साहानें मदत करीत होता.

अडीच दिवस त्यांना हें सर्पण पुरलें.

डिसेंबरच्या २० तारखेला रात्रीं एक वाजतां हें छिन्नभिन्न जहाज आयर्लंडच्या क्वीन्सटाऊन बंदरांत शिरलें. तिथें फॉगनें कॅप्टन स्पीडीशीं हस्तांदोलन केलें आणि आपल्या मंडळीसह त्याचा निरोप घेतला. कॅप्टन स्पीडी संतुष्ट चित्तानें ' हेरिएटा ' च्या सांगाड्यावर उभा राहून हात हलवीत होता. कारण त्या नुसत्या सांगाड्याची किंमत त्याला तीस हजार डॉलर आली असती !

क्वीन्सटाऊन ते डब्लिन हा आगगाडीचा प्रवास उजाडेपर्यंत आटोपला. डब्लिनला आगबोट तयार होती, तिच्यांत बसून मंडळी लिव्हरपूलकडे निघाली आणि डिसेंबरच्या २१ तारखेला सकाळीं पावणे-बारा वाजतां त्यांनीं इंग्लंडच्या भूमीवर पाय ठेवले.

आतां लिव्हरपूल ते लंडन हा प्रवास फक्त सहा तासांचा होता. पण तो सुरू होण्यापूर्वीच फिक्सनें फिलिअस फॉगच्या खांद्यावर हात ठेवला आणि त्याला वॉरंट दाखवून म्हटलें, " माफ करा ! तुम्हांला राणी सरकारच्या हुकमानें अटक करण्यांत येत आहे. "

# : १७ :    हाही प्रसंग नाजूकच!

फिलिअस फॉग कैदी बनला. लंडनला रवानगी करण्यापूर्वी लिव्हरपूलच्या ठाण्यावर त्याला रात्रभर डांबण्यांत आलें.

इंग्लंडला वेळेवर परतूनही थोडक्यासाठीं पैज हरण्याचा प्रसंग त्याच्यावर आला होता; भोळा सज्जन पासपार्तू याबद्दल स्वत:ला दोष देत होता आणि आपलें लोढणें नसतें तर ही मंडळी केव्हांच घरीं जाऊन बसलीं असती असें वाटून आवडाही साश्रु नयनांनीं स्वत:ला दोषी ठरवीत होती. खुद्द फॉगच्या चेहऱ्यावर मात्र क्रोधाचें किंवा वैतागाचें चिन्हही नव्हतें.

रात्रीं एकाचा ठोका पडला तेव्हां कोठडींत फॉगनें आपल्या घड्याळाकडे पाहिलें. ठाण्यावरच्या घड्याळापेक्षां तें दोन मिनिटें पुढेंच होतें.

दोन वाजले. फॉगला वाटलें, अजूनही आपली जर सुटका होईल तर आपण एखादी एक्सप्रेस पकडूं शकूं आणि मग आपल्याला लंडनला पोचून रिफॉर्म क्लबांत वेळेवर हजर होतां येईल.

दोन वाजून तेहतीस मिनिटांनीं कोठडीचें दार उघडलें. फॉगनें पाहिलें तर आवडा, पासपार्तू आणि फिक्स आंत येत होतीं.

फिक्स धावतच त्याच्याजवळ आला आणि चाचरत अडखळत म्हणाला, " महाराज, मला माफ कराल का? मी भयंकर मोठी चूक केली! खरा चोर तीन दिवसांपूर्वींच पकडला गेला आहे! पण मी तरी काय करूं? तुमचं इतकं साम्य ...."

फिलिअस फॉगला मोकळें करण्यांत आलें. तो सरळ फिक्सकडे गेला. त्यानें फिक्सच्या चेहऱ्याकडे रोखून बघितलें आणि आतांपर्यंत

कधीं केली नसेल अशी विलक्षण हालचाल केली. त्या गुप्तपोलीस महाशयाच्या जबड्यावर एक जबरदस्त गुद्दा लगावून त्यानें त्याला खालीं पाडलें.



नंतर सर्वांनीं तडकाफडकीं स्टेशन गांठलें. तिथें त्यांना कळलें, कीं एक्सप्रेस जाऊन पस्तीस मिनिटें झालीं.

आत्तां २-४० झालेले होते. मि. फॉग यांनीं स्टेशनमास्तरला

भेटून खास आगगाडी देण्याबद्दल विनंती केली. एक चांगलें वेगवान् एंजिन मिळवलें, ड्रायव्हरचीही छनूछन् दाखवून खूप खुषामत केली आणि तीन वाजतां खास गाडींतून लंडनकडे प्रयाण केलें.

त्यांना आतां फक्त साडेपांच तास बाकी होते. रस्ता निर्वेध असता तर तेवढ्या वेळांत लंडनला पोंचणें अशक्य नव्हतेंही. पण वाटेंत अडथळे आलेच आणि गाडी शेवटीं लंडनला पोचली तेव्हां सर्व घड्याळें ८–५० ही वेळ दर्शवीत होतीं.

म्हणजे सबंध पृथ्वीची प्रदक्षिणा करून हा गडी यशस्वी रीत्या परत आला –पण लंडनला पांच मिनिटें उशिरां पोचला होता.

'सेव्हिल रो' मधल्या नागरिकांना कोणीं सांगितलें असतें, कीं मि. फॉग परत आले आहेत, तर त्यांना तें खरेंही वाटलें नसतें. कारण त्यांच्या घराच्या खिडक्या व दारें लावलेलींच होतीं. मि. फॉग बिलकुल आवाज न करतां मुकाट्यानें घरांत शिरले होते. आवडासाठीं दोन खोल्या राखून ठेवायला त्यांनीं पासपार्तूला सांगितलें होतें. 'मला जरूरीचं काम असल्यामुळें मी जेवायला येणार नाहीं; तुम्हीच जेऊन घ्या' असेंही त्यांनीं सांगून पाठवलें होतें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं साडेसात वाजतां मि. फॉग हे आवडाला भेटायला गेले. एक खुर्ची ओढून ते तिच्या समोरच बसले. पांच मिनिटें त्यांच्या तोंडांतून शब्दही निघाला नाहीं. त्यांचा चेहरा निर्विकार आणि शांत होता. मग आवडाच्या मुखाकडे पाहून ते म्हणाले, "बाईसाहेब, क्षमा करा. तुम्हीं कायमचं संकटमुक्त व्हावं नि तुम्हांला सुखानें राहतां यावं म्हणून मी तुम्हांला इंग्लंडला आग्रहानें घेऊन आलों. मी त्या वेळीं श्रीमंत होतों आणि इथें आल्यावर तुमच्यासाठीं पैशाची तरतूद करून देण्याचा माझा विचार होता. पण आज माझी सगळी संपत्ति धुळीला मिळाली आहे. आत्तां–आत्तां माझ्याजवळ जे थोडेसे पैसे शिल्लक

असतील तेच मी तुम्हांला देऊन टाकीन. "

" आणि तुमची स्वतःची काय सोय ? "

" माझी सोय मी पाहून घेईन " फॉग थंडपणें उत्तरला.

" तुमचे कोणी मित्र वगैरे–"

" मला कोणी मित्र नाहींत. "

" मग नातेवाईक ? "

" नातेवाईकही कोणी नाहींत. "

" मि. फॉग, तुम्हांला असं नाहीं का वाटत, कीं हा एकटेपणा फार घातक आहे? दुःखांत, दारिद्र्यांत कुणाची तरी सोबत असावी असं नाहीं तुम्हांला वाटत ? मि. फॉग, तुम्हांला मित्र नाहींत आणि आप्तही नाहींत. तीं–तीं दोन्हीं नातीं तुम्ही माझ्याकडे सोंपवणार नाहीं का ? पत्नी म्हणून माझा तुम्ही स्वीकार कराल का ? "

ती बोलतां बोलतां उठली होती आणि तिनें आपला सुकुमार हात पुढें केला होता. फिलिअस फॉगही उठला. त्यानें तो हात हळूच धरून त्यावर आपले ओठ टेकले. त्याच्या नेत्रांत कधीं नव्हेशी कोमल छटा दिसत होती. आपलें आयुष्य कवडीमोल होण्याची वेळ आलेली असतांना ही तरुणी आपल्याजवळ लग्नाची भाषा काढते ! फिलिअस फॉग अगदीं थक्क होऊन गेला.

त्यानें आपले डोळे क्षणभरच मिटून घेतले. जणूं कांहीं तिचें रूप त्याला बघवतच नव्हतें. मग पुन्हा डोळे उघडून तो म्हणाला, "आवडा, माझं तुझ्यावर प्रेम आहे नि मी तुला कधींही अंतर देणार नाहीं. "

मि. फॉग यांनीं मग घंटा वाजवून पासपार्तुला बोलावलें. तो आला त्या वेळींही साहेबांच्या हातांत आवडाचा हात होता. त्यानें सर्व प्रकार ताडला आणि त्या बिचाऱ्या प्रेमळ मनाच्या नोकराला आनंदाचें भरतें आलें.

मि. फॉग म्हणाले, " पासपार्तू, रेव्हरंड सॅम्युएल विल्सनना विचारून येतोस का? माझ्या मनांतून उद्यां सोमवारचा मुहूर्त धरायचा आहे."

पासपार्तू पळतच निघाला.

## : १८ : अखेर

शनिवार तारीख २१ डिसेंबर रोजीं संध्याकाळीं रिफॉर्म क्लबांत आपल्या पांच मित्रांची बैठक बसली होती. सर्वांचें लक्ष घड्याळाकडे लागलें होतें.

येईल का फिलिअस फॉग? छे! शक्यच नाहीं. तो कसचा येतो! त्याला लंडन सोडून आज ऐंशी दिवस झाले. त्याच्याकडून चिठ्ठी नाहीं, चपाटी नाहीं, तार नाहीं, निरोप नाहीं! खरेंच, काय झालें असेल फॉगचें? तो नुसताच एक माथेफिरू प्रवासी ठरला एवढें बरें झालें! नाहीं तर त्याच्यावर भलतेंच बालंट आलें होतें. म्हणे बँकेंतला तो भयंकर दरोडा त्यानेंच घातला! शेवटीं तीन दिवसांपूर्वीं खरा दरोडेखोर सांपडला हें बरें झालें. बाकी आपला दोस्त चोर असेल हें आपल्याला कधींच खरें वाटलें नव्हतें म्हणा!

घड्याळांत ८-२५ झाले तेव्हां अँड्र्यू स्टुअर्ट उभा राहिला आणि त्यानें एक छोटें भाषण केलें—

"मित्रहो! मि. फिलिअस फॉग यांनीं आपल्याबरोबर मारलेली पैजेची मुदत आणखी वीस मिनिटांनीं संपेल. न्यूयॉर्कहून ज्या बोटीनें

ते येऊं शकले असते ती 'चायना' बोट कालच लिव्हरपूल बंदरांत आली हें आपल्याला माहीत आहे. 'शिपिंग गॅझेट' चा हा अंक पाहा. त्यांत काल उतरलेल्या प्रवाशांचीं नांवं दिलीं आहेत. पण त्यांत फिलिअस फॉग हें नांव नाहीं—"

आणखी कांहीं मिनिटें गेलीं. ८-४० झाले.

"आतां फक्त पांच मिनिटं राहिलीं" स्टुअर्ट म्हणाला आणि त्यानें पत्ते पिसायला सुरुवात केली.

पण त्यांनीं डाव मांडला तरी कोणाचेंही खेळण्याकडे लक्ष नव्हतें.

"आठ वाजून त्रेचाळीस मिनिटं" फ्लॅनॅगन पत्ते काढून वॉल्टर राल्फकडे देत म्हणाला.

"आठ वाजून चव्वेचाळीस मिनिटं" जॉन सलिवान घोगऱ्या आवाजांत बोलला.

आणि मग सेकंदांमागून सेकंदें मागें पडत गेलीं तरी फिलिअस फॉग आला नाहीं. ........ तो कसचा येतो!

पासपार्तू आपल्या कामगिरीवर मोठ्या आनंदानें निघाला होता. पण रेव्हरंड विल्सन घरीं नसल्यामुळें त्याला वीस मिनिटें वाट पाहात बसावें लागलें. शेवटीं ८-३५ ला तो पाद्रीबुवांच्या घरून परत निघाला. पण तो कशा स्थितींत?

जवळ जवळ उडतच तो रस्त्यांतून 'चालला' होता. त्याची टोपी जागेवर नव्हती, केस विस्कटलेले होते आणि वाटेंत येणारीं माणसें तो धडाधड बाजूला सारीत होता.

तीन मिनिटांत त्यानें सेव्हिल रो रस्ता गांठला. आणि धापा टाकीत फॉगसाहेबांच्या खोलींत प्रवेश केला. पहिल्यानें त्याच्या तोंडून शब्दच फुटेना.

"काय रे, काय झालं?" मि. फॉगनीं विचारलें.

"साहेब...." तो अडखळत बोलला, "उद्यां रविवार आहे साहेब."

"उद्यां सोमवार आहे."

"नाहीं. उद्यां रविवार आहे. आज शनिवार आहे."

"आज़ शनिवार? अशक्य!"

"होय साहेब!" पासपार्तू ओरडला. "आपण काय चूक केली कुणास ठाऊक. पण आपल्याला ज्या वेळीं इथें आपण आलें असं वाटलं त्याच्या तेवीस तास अगोदर आपण पोचलों होतों! पण साहेब, आतां वेळ घालवूं नका. अजून पावणेनवाला सहासात मिनिटं आहेत. उठा....उठा!"

फिलिअस फॉग उठला आणि विद्युद्वेगानें बाहेर पळाला. त्यानें एका गाडीवानाला शंभर पौंड कबूल केले आणि रिफॉर्म क्लबाच्या दिशेनें भरधाव गाडी सोडली.

एकंदर रहस्याचा त्याला आतां उलगडा झाला होता. आपण पूर्व दिशेला प्रवास करीत होतों. म्हणजे सूर्याकडे चाललों होतों. पूर्वेकडे सूर्य अगोदर उगवतो, दिवस आधीं सुरू होतो. म्हणजे आपण जसजसे पूर्वेला गेलों तसतशीं प्रत्येक रेखांशागणिक आपल्या एकेका दिवसांतली चार चार मिनिटें कमी झालीं. पृथ्वीजे रेखांश तीनशें साठ आहेत. प्रत्येक रेखांशाचीं चार मिनिटें म्हणजे तीनशें साठ रेखांशाचे चोवीस तास झाले. म्हणजे आपला एक संबंध दिवस कमी झाला. पूर्वेकडे प्रवास करतांना सूर्य क्षितिजावरून वर येत असलेला आपण ऐंशी वेळां पाहिला. लंडनमध्यें बसलेल्या आपल्या मित्रांनीं तो फक्त एकुणऐंशी वेळां पाहिला. अर्थात् आपण आपली पृथ्वीप्रदक्षिणा फक्त ७९ दिवसांत पुरी केली. तारखेंतला बदल

आपल्या लक्षांत आला नाहीं; पण वास्तविक आपण शनिवार ता. २१ डिसेंबर रोजीं लंडनला पोचण्याऐवजीं ता. २० डिसेंबर रोजींच पोचलों. आपण स्वतःला मोठे गणिती नि हिशेबी समजतों, पण ही घोडचूक आपल्या लक्षांत आली नाहीं !

फिलिअस फॉगच्या मनांतून हे सर्व विचार झपाट्यानें चालले होते, त्याच वेळीं ती घोडागाडी झपाट्यानें रिफॉर्म क्लबकडे निघाली होती. वाटेंत एक दोन मामुली अपघात घडवून ती आपल्या इच्छित स्थळीं पोचली, त्या वेळीं ८ वाजून ४४ मिनिटें व कांहीं सेकंदें झालीं होतीं.

त्याचे पांचही मित्र आतां एक एक सेकंद मोजीत बसले होते—

" त्रेपन्न— चोपन्न— पंचावन्न— "

एकाएकीं बाहेर कांहींतरी गडबड झाली म्हणून हे सभासद उठले आणि खिडकीबाहेर गेले—

" छपन— सत्तावन— "

क्लबाचा दरवाजा धाडदिशीं उघडला गेला.

" अठ्ठावन— "

सर्वांच्या माना तिकडे वळल्या.

" एकुणसाठ— "

घड्याळांत साठ सेकंदें पुरीं होऊन पावणेनऊ वाजतात तों दरवाजांतून धीरगंभीर घोषणा झाली—

" मित्रहो, हा मी आलों आहें— फिलिअस फॉग. "



## : १ : काांहीं भौगोलिक टिपणें

लंडन : पृथ्वीवरचें हें सर्वांत मोठें शहर, एक सर्वांत जुनें शहर म्हणूनही प्रसिद्ध आहे. ब्रिटिश साम्राज्याची राजधानी म्हणून लंडनला विशेष महत्त्व आलें.

टेम्स नदीच्या मुखाशीं दलदलींत दोन हजार वर्षांपूर्वी हें शहर वसलें. रोमन लोकांनीं शहराभोवतीं दगडी कोट बांधला, त्याच्या सर्व वेशी आतां नामशेष झाल्या आहेत. आल्डगेट, न्यूगेट, मूरगेट, लडगेट, अशीं नांवेंच त्या वेशींचें स्मरण करून देतात.

अनेक दृष्टींनीं इंग्रजांना हें राष्ट्रीय अभिमानाचें केंद्र वाटतें. वेस्टमिन्स्टर ॲबे, पार्लमेंट ( गेल्या महायुद्धांत हें उध्वस्त झालें; त्याची आतां दुरुस्ती केली आहे ), बकिंगहॅम पॅलेस राजवाडा, सेंट पॉलचें कॅथीड्रल ( १६६६ च्या भीषण आगींत पाहिलें मंदिर जळालें तेव्हां त्याच ठिकाणीं हें नवीन भव्य मंदिर बांधण्यांत आलें ), टॉवर ऑफ् लंडन ( या बुरुजावर अनेकांचा शिरच्छेद झाला ) यांसारख्या प्रेक्षणीय व प्रसिद्ध इमारती तर तिथें आहेतच; पण शिवाय शेक्सपीयर, डिकन्स, जॉन्सन अशा बड्या बड्या साहित्यिकांनीं लंडन शहर अजरामर केलें आहे. लंडन-मधला ब्रिटिश म्यूझियम प्रख्यात आहे. सर्व जगांतली समृद्ध लायब्ररी

या म्युझियममध्यें असून तिथें ४० लक्ष पुस्तकें आहेत. ब्लिंगृन गार्डन्स आणि सेव्हिल रो हीं लंडनच्या उत्तर भागांतल्या रस्त्यांचीं नांवें आहेत.

**वर्तमानपत्रें** : इंग्लंडमधलें सर्वांत जुनें दैनिक म्हणजे **डेली कूरान्ट** ( १७०२ ), आणि प्रसिद्ध वर्तमानपत्र **टाइम्स** ( १७८८ ), **डेली न्यूज** हें वर्तमानपत्र १८४६ सालीं सुरू झालें. त्याचा संपादक चार्लस् डिकन्स. साप्ताहिकांत **मँचेस्टर गार्डियन** हें उदारमतवादी पत्र विशेष गाजलेलें आहे. **मॉर्निंग पोस्ट** हें 'टोरी' किंवा हूजूर पक्षाचें दैनिक आहे.

**टेलिफोन** : बेल या संशोधकानें पहिला टेलिफोन १८७६ सालीं तयार केला.

**रिफॉर्म क्लब** : विधिमंडळाच्या निवडपद्धतींत सुधारणा घडवून आणावी म्हणून ही संस्था कांहीं पुढाऱ्यांनीं स्थापन केली होती.

**बँक ऑफ् इंग्लंड** : ही व्यापारी उलाढाली करणारी जगांतली एक सर्वांत मोठी पेढी आहे. या बँकेबद्दल इंग्रज लोकांना एवढा विश्वास वाटतो कीं सुरक्षितपणाची हमी देतांना 'as safe as the Bank of England' असें म्हणण्याचा इंग्रजींत प्रघात पडला आहे. पुष्कळांची समजूत आहे त्याप्रमाणें ही बँक राष्ट्रीय मालकीची मात्र नाहीं.

**ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेल्वे** ( G. I. P. ) : हें भव्य नांव धारण करणारी हिंदुस्थानांतली मोठी रेल्वे कंपनी १८५३ सालीं स्थापन झाली; आणि नुकतेंच १९५१ सालीं दुसऱ्या कांहीं किरकोळ कंपन्या तिच्यांत समाविष्ट करून तिला आतां वेस्टर्न रेल्वे नांव दिलेलें आहे.

**बेरिंग** : 'बेरिंग ब्रदर्स' हीदेखील एक प्रसिद्ध बँक असून तिचा व्यवहार जगभर चालतो.

**ब्रॅडशॉचें कॉन्टिनेन्टल गाईड** : जार्ज ब्रॅडशॉनें पहिल्यानें इंग्लंडमधील रेल्वे मार्गांचें एक गाईड काढलें. तें चांगलें लोकप्रिय झाल्यावर १८४७ सालीं युरोपांत आगबोटीनें व आगगाडीनें प्रवास करणाऱ्यांसाठीं त्यानें एक विस्तृत गाईड प्रसिद्ध केलें. त्यामुळें एवढी मोठी नड दूर झाली कीं पुढें पुढें कोणी प्रवासाला निघाला म्हणजे आपल्या कपड्यांबरोबर एक 'ब्रॅडशॉ'ही घ्यायला चुकत नसे.

**चेअरिंग क्रॉस :** हें लंडन शहराचें बोरीबंदर.

**आगबोट :** मोठ्या आगबोटींची पहिली कंपनी पहिल्यानें अमेरिकेंत स्थापन झाली. नंतर १२ वर्षांनीं इंग्लंडांत १८१९ सालीं न्यूयॉर्क ते लिव्हरपूल प्रवास आगबोटीनें प्रथम केला. १८२५ सालीं तर इंग्लंड–हिंदुस्थान प्रवास केल्याबद्दल एका कप्तानाला बक्षीस देण्यांत आलें.

पहिली मोठी ब्रिटिश आगबोट 'दि ग्रेट ब्रिटन'. १८४५ सालीं हिनें अमेरिकेचा प्रवास १४ दिवसांत पुरा केला.

**पेनिन्शुलर अँड ओरिएन्टल ऊर्फ पी अँड ओ :** ही ब्रिटिश मालकीची आगबोट कंपनी १८४० सालीं स्थापन झाली. भूमध्यसमुद्रांतून अलेक्झांड्रियापर्यंत टपाल व उतारू नेण्याचें काम ही कंपनी करीत असे. पुढें सुएज कालवा खोदला गेल्यानंतर तिनें हिंदुस्थानशींही दळणवळण सुरू केलें.

**माँ सेनी :** फ्रान्स व इटली यांच्या सरहद्दीवर आल्प्स पर्वताची एक रांग आहे. तिच्यांतल्या एका उंच डोंगरावर माँ सेनी इथें ७॥ मैल लांबीचा बोगदा खणण्याचें काम या वेळीं ( १८७० ) नुकतेंच पुरें झालेलें होतें.

**ट्यूरिन :** हें उत्तर इटलींत पो नदीच्या कांठावर आणि माँ सेनीच्या बोगद्यापासून ५० मैलांवर एक शहर आहे.

**स्कॉटलंड यार्ड :** लंडनच्या गुप्तपोलीस कचेरीला दिलेलें नांव.

**पकडवॉरंट :** गुन्हेगाराचा शोध करण्याचें काम पोलिसाचें आहे. पण कोणताही पोलीस अधिकारी मॅजिस्ट्रेटच्या हुकमाशिवाय एखाद्या नागरिकाला अटक करूं शकत नाहीं. या हुकमालाच 'वॉरंट' म्हणतात.

**पॅरिस :** फ्रान्सची राजधानी व जगांतलें तिसऱ्या नंबरचें शहर. सेन नदीच्या दोन्ही तीरांवर बसलेल्या पॅरिसची रंगेलपणाबद्दल ख्याति आहे. जन्माला यावें आणि पॅरिस पाहावें असें म्हणतात. नोत्र दाम हें इतिहासप्रसिद्ध मंदिर, लूव्ह्र नांवाचा म्यूझियम आणि ९८४ फूट उंचीचा पोलादी एफील टॉवर हीं पॅरिस शहराचीं भूषणें होत. पॅरिसचे लोक इतके ऐषआरामी व शांततेचे भोक्ते आहेत कीं आपलें सुंदर शहर

उध्वस्त होऊं नये म्हणून गेल्या महायुद्धांत त्यांनीं तें ' खुलें शहर ' म्हणून जाहीर केलें आणि अशा रीतीनें हिटलरपुढें लोटांगण घालून आपल्या राजधानीचा बचाव केला. याच पॅरिसच्या रक्षणासाठीं जोन ऑफ आर्क ब्रिटिशांविरुद्ध प्राणपणानें लढली होती !

**हाव्र** : हें सेन नदीच्या मुखाजवळचें एक फ्रेंच बंदर आहे.

**ब्रिंडिसी** : एड्रियाटिक समुद्राच्या किनाऱ्यावरचें इटलींतलें एक बंदर.

**पासपोर्ट** : परदेशांत प्रवास करण्यासाठीं आपलें सरकार जो परवाना देतें त्याला ' पासपोर्ट ' म्हणतात. ज्या ज्या परकीय देशांत आपण जाऊं तिथल्या बंदर–अधिकाऱ्याची सही या पासपोर्टावर घ्यावी लागते; त्या सहीला ' व्हिसा ' म्हणतात.

**कॉन्सल** : परदेशांत राहाणाऱ्या आपल्या रहिवाशांच्या हितसंबंधावर देखरेख ठेवण्यासाठीं एखादे सरकार जो अधिकारी नेमतें त्याला ' कॉन्सल ' म्हणण्याची पद्धत आहे. हा कॉन्सल आपल्या लोकांना लागेल ती सल्लामसलत व कायद्याची मदत मिळवून देतो. त्याला राजकीय अधिकार मात्र मुळींच नसतात. म्हणजे परराष्ट्रीय वकील किंवा ' अॅम्बॅसॅडर 'पेक्षां त्याचा दर्जा खालचा असतो.

व्यापारी कंपन्यांना मार्गदर्शन करण्याचें कामही ठिकठिकाणचे ब्रिटिश कॉन्सल करीत असतात. ' कॉन्सल ' हा किताब रोमन अमदानीपासूनचा आहे. प्रजासत्ताक रोमच्या सर्वोच्च न्यायाधिकाऱ्याला कॉन्सल म्हणत असत.

**सुएजचा कालवा** : भूमध्य समुद्र आणि तांबडा समुद्र यांना जोडणारा हा कालवा खोदण्याची कल्पना फर्दिनान्द द लेसेप्स या फ्रेन्च एंजिनियराच्या डोक्यांत आली. जवळ अवळ अडीच हजार वर्षांपूर्वी एका ईजिप्ती राजानें असा प्रयत्न केला होता, पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. १,२०,००० लोकांचे जीव मात्र बळी पडले ! लेसेप्सला देखील आपली कल्पना सरकारच्या व लोकांच्या गळीं उतरवतांना नाकीं नऊ आले. शेवटीं त्याला परवानगी मिळाली; आणि सुएज कॅनाल कंपनी स्थापन होऊन २५ एप्रिल १८५९ रोजीं पहिली कुदळ मारण्यांत

आली. कालव्याचें काम पुरें व्हायला १० वर्षे लागलीं आणि १ कोटी ९० लक्ष पौंड खर्च आला. हा कालवा खोदण्यापूर्वी युरोपहून हिंदुस्थान-कडे यायचें म्हणजे बोटींतून सबंध आफ्रिका खंडाला वळसा घालावा गेला. कालव्यामुळें एकूण ५५०० मैल अंतर तोडल्यासारखें झालें!

हा कालवा फ्रेंच व ईजिप्ती सरकारांच्या परवानगीनें खोदला गेला असला तरी त्याच्या चालकवर्गांत ब्रिटिश व डच प्रतिनिधिसुद्धा आहेत आणि १८८८ सालीं कॉन्स्टॅन्टिनोपल इथें एक परिषद भरून हा कालवा कोणत्याही एका राष्ट्राच्या मालकीचा न राहतां युद्धकाळांत-देखील तो सर्वांना खुला ठेवावा असा ठराव करण्यांत आला.

कालव्याची लांबी शंभर मैल असून त्यांतून दरसाल ७–८ हजार बोटींची येजा होते. कालव्याच्या एका कांठावर सुएज हें बंदर असून दुसऱ्या कांठावर पोर्ट सय्यद हें बंदर वसलेलें आहे. सुएजच्या कालव्यानेंच या बंदराला जन्म दिला आणि आज जगांतलें सर्वांत मोठें कोळसा घेण्याचें ठिकाण म्हणूनच केवळ तें प्रसिद्ध आहे. पोर्ट सय्यदला लेसेप्सचा एक १७४ फूट उंचीचा पुतळा उभारलेला आहे.

एडन : तांबडा समुद्र हिंदी महासागराला मिळतो त्या ठिकाणीं हें मोक्याचें बंदर आहे. एडन हें जगांतलें अत्यंत रुक्ष शहर म्हणायला हरकत नाहीं. पाण्याचा भयंकर दुष्काळ; म्हणून इथून सात मैलांवर अरबांनीं एकंदर १३ तलाव बांधले. त्याच तलावांत आणखी सुधारणा करून ब्रिटिशांनीं एडनला नळ आणले आहेत.

मुंबई : १५३४ सालीं मुंबई नांवाचें एक दरिद्री खेडें पोर्तु-गीजांनीं सुलतानबहादुराकडून मिळवलें. १६६१ त दुसऱ्या चार्लसचें पोर्तुगीज राजकन्येशीं लग्न झालें, त्या वेळीं हुंड्यादाखल हें बेट ब्रिटिश राजाला मिळालें आणि नंतरच मालाची वखार, मालधक्का व आगबोटीचें बंदर आणि गिरण्याचें केंद्र अशी चढत्या क्रमानें मुंबईची प्रतिष्ठा वाढत चालली. आज हिंदुस्थानांतलें सर्वांत मोठें, सर्वांत स्वच्छ व सर्वांत सुंदर महानगर म्हणून मुंबई प्रसिद्ध आहे.

सती : सतीची चाल १८२९ सालीं धुइलियम् बेंटिंक गव्हर्नर-जनरल असतांना कायद्यानें बंद करण्यांत आली; तरी तुरळक 'सती'चे

प्रकार चालूच होते.

सतीच्या मिरवणुकीचें मूळ वर्णन आपल्याला क्रूर व अतिरिक्त वाटेल. अनुवाद करतांना थोडा फरक करून घेतला आहे.

**बनारस अर्थात् काशी :** हिंदूंच्या या सर्वांत पवित्र नगरींत गंगा नदीचा ३ मैल लांबीचा किनारा म्हणजे लहानमोठ्या मंदिरांचें संमेलन आहे. एकंदर १५०० तरी देवळें असतील. बनारसचा दुसरा विशेष म्हणजे तेथील हिंदू विद्यापीठ.

**बऱ्हाणपूर :** मध्यप्रदेशांतलें तापी नदीच्या कांठचें मोठें इतिहास-प्रसिद्ध शहर. १८६० सालीं इंग्रजांनीं हें मराठ्यांकडून जिंकून घेतलें.

**नरसिंगपूर :** कापसाच्या व्यापाराची मोठी पेठ.

**कलकत्ता :** इंग्रजी राज्याचा पाया कलकत्त्यांत घातला गेला. इतिहासांत अंधारकोठडी आणि फाळणीनंतरचे दंगे यामुळें कलकत्त्याचें नांव राहील. पण अर्थात् फार मोठा व्यापार, शैक्षणिक चळवळी आणि सुंदर इमारती यामुळें कलकत्त्यानें भरतखंडांत सर्वांत गौरवाचें स्थान मिळवलें आहे यांत शंका नाहीं.

**सिंगापूर :** दक्षिण मलायांतलें बेट—बंदर सिंगापूर म्हणजे जगांतलें एक मोठें आरमारी ठाणें आणि ब्रिटिशांची आशियांतली मौल्यवान ठेव होती. गेल्या महायुद्धांत जपान्यांनीं सिंगापुरचें पाणी तोडून ब्रिटि-शांना शरण आणलें.

**हॉंगकॉंग :** चीनच्या आग्नेय किनाऱ्यावरील कौलुन आणि किनाऱ्या-लगतचें किल्लेबंद बेट हॉंगकॉंग या सर्वांना मिळून हॉंगकॉंग प्रांत असें नांव आहे. दूरपूर्वेकडे आपली व्यापारी व राजकीय हुकमत ठेवण्यासाठीं सिंगापूरइतकाच हॉंगकॉंगचाही अमेरिकनांनीं व ब्रिटिशांनीं उपयोग केलेला आहे. एका काळीं कॅलिफोर्नियांतल्या सोन्याच्या खाणींत काम करण्यांसाठीं हॉंगकॉंगहून वेठीचे मजूर पाठवले जात. या 'गुलामांच्या व्यापारा'वर बरेच गोरे लोक गब्बर झाले. अफूच्या चोरट्या व्यापारा-साठींही हॉंगकॉंग प्रसिद्ध आहे.

**याकोहामा :** जपानच्या आग्नेय किनाऱ्यावरचें बंदर. जपानची नाजूक व भव्य राजधानी **टोकियो**—भूकंप व बॉंब यांनीं हिचा अनेकदा

नाश केलेला आहे – गांठण्यासाठीं इथूनच आगगाडीनें जावें लागतें.

**नागासाकी :** अमेरिकेनें महायुद्धांत आपला दुसरा ॲटम बॉंब या नागासाकी बंदरावर टाकला !

**अफू :** चिलमींत अफू घालून ओढण्याचें हें व्यसन चीनच्या लोकांत १७ व्या शतकापासून बसलें आहे. चिनी राज्यकर्त्यांनीं अफूचे दुष्परिणाम ओळखून अफूच्या लागवडीला बंदी केली होती. पण त्याचा परिणाम असा झाला कीं परदेशांतून लोक चोरून अफू आणूं लागले. ही चोरटी आयात थांबवण्यासाठीं अफूवरचें नियंत्रण उठवावें असा ब्रिटिशांनीं आग्रह धरला. अफूवरून चिनी व युरोपियन – विशेषतः ब्रिटिश यांच्यांत तीन वेळां युद्ध झालें. १९०६ सालीं चीन व ब्रिटिश हिंदुस्थान यांच्यांत करार होऊन चीननें अफूचें व्यसन पूर्णपणें बंद करावें व औषधापुरती अफू हिंदुस्थानांतून मागवावी असें ठरलें !

**कसरत कंपनी :** या कंपनीचें वर्णन करतांना व्हर्नच्या डोळ्यांपुढें बार्नमचा सुप्रसिद्ध 'ग्रेटेस्ट शो ऑन् दि अर्थ' होता. आपल्या सर्कशीला इतकें गर्विष्ठ नांव देणारा अमेरिकन पी. टी. बार्नम् ही एक विलक्षण वल्ली होती. त्याच्या 'सर्कशी'त दोन फूट उंचीचा एक बुटका, अमेरिकन अध्यक्षांची एक सेवानिवृत्त दाई, जेनी लिंड नांवाची प्रख्यात इंग्रज नटी असे अनेक नमुने असत. खिशांत दमडी नसतांना या गृहस्थानें एक अमेरिकन म्यूझियम उधारीवर घेतला आणि एका वर्षांत पैशाची फेड केली. अत्यंत बेदरकार प्रसिद्धिपटु म्हणून त्याची ख्याति होती. त्यानें लाखों डॉलर मिळवले व घालवले.

**सान फ्रान्सिस्को :** कॅलिफोर्नियाच्या पश्चिम किनाऱ्यावरचें मोठें बंदर. सान फ्रान्सिस्को डोंगराळ भागांत असून शहरांत मोठमोठे सुंदर बगीचे आहेत. चार वेळां या शहराची भूकंपानें धूळदाण केली. १९०६ सालीं भूकंपानंतर लगेच भयंकर आग लागली. तींत हजारों इमारती भस्मसात् झाल्या. ५० कोटी रुपयांचें नुकसान झालें. अलीकडे झंझावातानें असेंच 'फ्रिस्को'चें नुकसान झालें होतें.

**गोल्डन गेट :** सान फ्रान्सिस्कोच्या आखातांत शिरतांना जी निरुंद पण सुप्रकाशित खाडी लागते तिला 'गोल्डन गेट' हें नांव आहे.

सेंट्रल पॅसिफिक : अमेरिकेंत पूर्वपश्चिम रेल्वे शाखा वेगवेगळ्या कंपन्यांकडे असत. आतां सान फ्रान्सिस्कोपासून न्यूयॉर्कपर्यंत एकच अखंड रेल्वे प्रवास करतां येतो. फिलिअस फॉगनें अमेरिकेला भेट दिली त्यानंतर दोनतीन वर्षांतच 'यूनियन पॅसिफिक' या नांवाखालीं ही व्यवस्था अमलांत आली.

न्यूयॉर्क : एक कोटी ( फॉगच्या काळीं १० लक्ष ) वस्तीचें हें प्रचंड शहर हडसन नदीच्या अनेक मुखांजवळ मिळून वसलें आहे. त्याची लांबीरुंदी ३७६५ चौरस मैल असून शहराचे पांच परगणे आहेत. मुंबई-प्रमाणेंच न्यूयॉर्कदेखील बेटांचें शहर आहे आणि हीं बेटें एकमेकांना जोडणारे एकंदर २५ मैल लांबीचे पोलादी पूल (यांतच ६ कोटी डॉलर खर्चून बांधलेला ब्रुकलिन ब्रिज येतो) म्हणजे न्यूयॉर्क नगरीचीं भूषणें आहेत.

न्यूयॉर्क बंदरांत शिरतांनाच १५१ फूट उंचीच्या 'स्वातंत्र्यदेवी' पुतळ्याचें दर्शन होतें. हा पुतळा एवढा प्रचंड आहे कीं त्याच्या डोक्यावर ४० माणसें बसूं शकतील!

न्यूयॉर्कचें सगळेंच अवाढव्य. 'एंपायर स्टेट' सारख्या शंभर मजली गगनभेदी इमारती तिथें आहेत आणि त्या इमारतींत वाल्डॉर्फ ॲस्टोरियासारखीं जगांतलीं सर्वांत बादशाही हॉटेलेंही आहेत. एकंदर ३७५ म्युनिसिपालिट्या न्यूयॉर्क शहराचें काम पाहातात.

डब्लिन : हें आतां स्वतंत्र आयर्लंड ऊर्फ आयरचें मुख्य शहर आहे. आयर्लंडच्या उत्तर भागांतला जो छोटा प्रदेश अद्याप ब्रिटिश हुकमतीखालीं आहे त्याची राजधानी बेलफास्ट.

## : २ : काहीं प्रश्न

फिलिअस फॉगच्या पृथ्वीप्रदक्षिणेची ही अजब कथा वाचल्यावर कांहीं प्रश्न साहजिकच मनांत उभे राहातात. त्यांचीं उत्तरें देण्याचा ज्यानें त्यानें

विचार करावा.

( १ ) प्रवासापरी प्रवास आणि गोष्टीपरी गोष्ट — खरोखरच ही एक असामान्य कादंबरी आहे ! गोष्ट सांगतां सांगतां यात्रा घडवणारीं अशीं आणखी कांहीं पुस्तकें असतील का मराठींत किंवा इंग्रजींत ?

( २ ) मॅगेलन, मार्को पोलो, कोलंबस यांचे प्रवास असेच चटकदार असतील का ?

( ३ ) सिंदबादच्या सफरीही पुन्हा वाचल्या पाहिजेत. त्यांतली माहिती सर्वस्वीं खरी नसली तरी तिला थोडा फार सत्याचा आधार असेल, नाहीं ?

( ४ ) पण काय हो ? ही सगळी धडपड फिलिअस फॉगनें कशासाठीं केली ? केवळ पैज जिंकण्यासाठीं ?— कारण तसें म्हणाल, तर इतके देश तो हिंडला पण त्यांतलें एक तरी स्थळ पाहायला त्याला वेळ मिळाला का? त्याचा आदर्श म्हणजे घड्याळ !

प्रवास करण्याची ही तऱ्हा बरोबर आहे का ?

( ५ ) पण फॉगला दोष देण्यांत काय अर्थ ? एकाच ध्येयानें तो झपाटलेला होता, नाहीं का ? खरोखर तें ध्येय गांठण्यासाठीं त्यानें जी धडपड केली तिचें कौतुकच करायला नको का ! काय विलक्षण स्वभावाचा माणूस होता तो ! त्याचें एक स्वभावचित्रच रेखाटलें पाहिजे.

( ६ ) फॉगला 'यंत्रासारखा माणूस' असें म्हटलें आहे, तें सर्वस्वीं खरें आहे कां ?

( ७ ) आणि खरेंच, फॉगचें चित्र रेखाटतांना आपल्या पासपार्तूला विसरून मुळींच चालायचें नाहीं. कारण नोकरामुळेंच तर मालकाला उठाव मिळाला आहे म्हणे !

पण याचा काय बरें अर्थ ?

( ८ ) इतकीं अचाट साहसें फॉगनें केलीं, त्यांत सर्वांत मोठें साहस कोणतें बरें ? मोठा विचार करण्यासारखाच हा प्रश्न आहे !

( ९ ) फिलिअस फॉगनें आपल्या या 'सूरसपाट्यां'त बराचसा काळ हिंदुस्थानांत घालवला. इथल्या स्थळांचें त्यानें केलेलें वर्णन बरोबर आहे ना !

सेंट्रल पॅसिफिक : अमेरिकेंत पूर्वपश्चिम रेल्वे शाखा वेगवेगळ्या कंपन्यांकडे असत. आतां सान फ्रान्सिस्कोपासून न्यूयॉर्कपर्यंत एकच अखंड रेल्वे प्रवास करतां येतो. फिलिअस फॉगनें अमेरिकेला भेट दिली त्यानंतर दोनतीन वर्षांतच 'यूनियन पॅसिफिक' या नांवाखालीं ही व्यवस्था अमलांत आली.

न्यूयॉर्क : एक कोटी (फॉगच्या काळीं १० लक्ष) वस्तीचें हें प्रचंड शहर हडसन नदीच्या अनेक मुखांजवळ मिळून वसलें आहे. त्याची लांबीरुंदी ३७६५ चौरस मैल असून शहराचे पांच परगणे आहेत. मुंबई-प्रमाणेंच न्यूयॉर्कदेखील बेटांचें शहर आहे आणि हीं बेटें एकमेकांना जोडणारे एकंदर २५ मैल लांबीचे पोलादी पूल (यांतच ६ कोटी डॉलर खर्चून बांधलेला ब्रुकलिन ब्रिज येतो) म्हणजे न्यूयॉर्क नगरीचीं भूषणें आहेत.

न्यूयॉर्क बंदरांत शिरतांनाच १५१ फूट उंचीच्या 'स्वातंत्र्यदेवी' पुतळ्याचें दर्शन होतें. हा पुतळा एवढा प्रचंड आहे कीं त्याच्या डोक्यावर ४० माणसें बसूं शकतील!

न्यूयॉर्कचें सगळेंच अवाढव्य. 'एंपायर स्टेट' सारख्या शंभर मजली गगनभेदी इमारती तिथें आहेत आणि त्या इमारतींत वाल्डॉर्फ ॲस्टोरियासारखीं जगांतलीं सर्वांत बादशाही हॉटेलेंही आहेत. एकंदर ३७५ म्युनिसिपालिट्या न्यूयॉर्क शहराचें काम पाहातात.

डब्लिन : हें आतां स्वतंत्र आयर्लंड ऊर्फ आयरचे मुख्य शहर आहे. आयर्लंडच्या उत्तर भागांतला जो छोटा प्रदेश अद्याप ब्रिटिश हुकमतीखालीं आहे त्याची राजधानी बेलफास्ट.

## : २ : कांहीं प्रश्न

फिलिअस फॉगच्या पृथ्वीप्रदक्षिणेची ही अजब कथा वाचल्यावर कांहीं प्रश्न साहजिकच मनांत उभे राहातात. त्यांचीं उत्तरें देण्याचा ज्यानें त्यानें

विचार करावा.

( १ ) प्रवासापरी प्रवास आणि गोष्टीपरी गोष्ट – खरोखरच ही एक असामान्य कादंबरी आहे ! गोष्ट सांगतां सांगतां यात्रा घडवणारीं अशीं आणखी कांहीं पुस्तकें असतील का मराठींत किंवा इंग्रजींत ?

( २ ) मॅगेलन, मार्को पोलो, कोलंबस यांचे प्रवास असेच चटकदार असतील का ?

( ३ ) सिंदबादच्या सफरीही पुन्हा वाचल्या पाहिजेत. त्यांतली माहिती सर्वस्वीं खरी नसली तरी तिला थोडा फार सत्याचा आधार असेल, नाहीं ?

( ४ ) पण काय हो ? ही सगळी धडपड फिलिअस फॉगनें कशासाठीं केली ? केवळ पैज जिंकण्यासाठीं ?— कारण तसें म्हणाल, तर इतके देश तो हिंडला पण त्यांतलें एक तरी स्थळ पाहायला त्याला वेळ मिळाला का? त्याचा आदर्श म्हणजे घड्याळ !

प्रवास करण्याची ही तऱ्हा बरोबर आहे का ?

( ५ ) पण फॉगला दोष देण्यांत काय अर्थ ? एकाच ध्येयानें तो झपाटलेला होता, नाहीं का ? खरोखर तें ध्येय गांठण्यासाठीं त्यानें जी धडपड केली तिचें कौतुकच करायला नको का ! काय विलक्षण स्वभावाचा माणूस होता तो ! त्याचें एक स्वभावचित्रच रेखाटलें पाहिजे.

( ६ ) फॉगला ' यंत्रासारखा माणूस ' असें म्हटलें आहे, तें सर्वस्वीं खरें आहे कां ?

( ७ ) आणि खरेंच, फॉगचें चित्र रेखाटतांना आपल्या पासपार्तूला विसरून मुळींच चालायचें नाहीं. कारण नोकरामुळेंच तर मालकाला उठाव मिळाला आहे म्हणे !

पण याचा काय बरें अर्थ ?

( ८ ) इतकीं अचाट साहसें फॉगनें केलीं, त्यांत सर्वांत मोठें साहस कोणतें बरें ? मोठा विचार करण्यासारखाच हा प्रश्न आहे !

( ९ ) फिलिअस फॉगनें आपल्या या ' सुरसपाट्यां'त बराचसा काळ हिंदुस्थानांत घालवला. इथल्या स्थळांचें त्यानें केलेलें वर्णन बरोबर आहे ना ?

प्रकार चालूच होते.

सतीच्या मिरवणुकीचें मूळ वर्णन आपल्याला क्रूर व अतिरिक्त वाटेल. अनुवाद करतांना थोडा फरक करून घेतला आहे.

**बनारस अर्थात् काशी :** हिंदूंच्या या सर्वांत पवित्र नगरींत गंगा नदीचा ३ मैल लांबीचा किनारा म्हणजे लहानमोठ्या मंदिरांचें संमेलन आहे. एकंदर १५०० तरी देवळें असतील. बनारसचा दुसरा विशेष म्हणजे तेथील हिंदू विद्यापीठ.

**बऱ्हाणपूर :** मध्यप्रदेशांतलें तापी नदीच्या कांठचें मोठें इतिहास-प्रसिद्ध शहर. १८६० सालीं इंग्रजांनीं हें मराठ्यांकडून जिंकून घेतलें.

**नरसिंगपूर :** कापसाच्या व्यापाराची मोठी पेठ.

**कलकत्ता :** इंग्रजी राज्याचा पाया कलकत्त्यांत घातला गेला. इतिहासांत अंधारकोठडी आणि फाळणीनंतरचे दंगे यामुळें कलकत्त्याचें नांव राहील. पण अर्थात् फार मोठा व्यापार, शैक्षणिक चळवळी आणि सुंदर इमारती यामुळें कलकत्त्यानें भरतखंडांत सर्वांत गौरवाचें स्थान मिळवलें आहे यांत शंका नाहीं.

**सिंगापूर :** दक्षिण मलायांतलें बेट—बंदर सिंगापूर म्हणजे जगांतलें एक मोठें आरमारी ठाणें आणि ब्रिटिशांची आशियांतली मौल्यवान ठेव होती. गेल्या महायुद्धांत जपान्यांनीं सिंगापुरचें पाणी तोडून ब्रिटिशांना शरण आणलें.

**हाँगकाँग :** चीनच्या आग्नेय किनाऱ्यावरील कौलुन आणि किनाऱ्यालगतचें किल्लेबंद बेट हाँगकाँग या सर्वांना मिळून हाँगकाँग प्रांत असें नांव आहे. दूरपूर्वेकडे आपली व्यापारी व राजकीय हुकमत ठेवण्यासाठीं सिंगापूरइतकाच हाँगकाँगचाही अमेरिकनांनीं व ब्रिटिशांनीं उपयोग केलेला आहे. एका काळीं कॅलिफोर्नियांतल्या सोन्याच्या खाणींत काम करण्यांसाठीं हाँगकाँगहून वेठीचे मजूर पाठवले जात. या 'गुलामांच्या व्यापारा'वर बरेच गोरे लोक गब्बर झाले. अफूच्या चोरट्या व्यापारासाठींही हाँगकाँग प्रसिद्ध आहे.

**याकोहामा :** जपानच्या आग्नेय किनाऱ्यावरचें बंदर. जपानची नाजूक व भव्य राजधानी **टोकियो**—भूकंप व बॉंब यांनीं हिचा अनेकदा

नाश केलेला आहे – गांठण्यासाठीं इथूनच आगगाडीनें जावें लागते.

**नागासाकी :** अमेरिकेनें महायुद्धांत आपला दुसरा ॲटम बॉंब या नागासाकी बंदरावर टाकला !

**अफू :** चिलमींत अफू घालून ओढण्याचें हें व्यसन चीनच्या लोकांडीं १७ व्या शतकापासून बसलें आहे. चिनी राज्यकर्त्यांनीं अफूचे दुष्परिणाम ओळखून अफूच्या लागवडीला बंदी केली होती. पण त्याचा परिणाम असा झाला कीं परदेशांतून लोक चोरून अफू आणूं लागले. ही चोरटी आयात थांबवण्यासाठीं अफूवरचें नियंत्रण उठवावें असा ब्रिटिशांनीं आग्रह धरला. अफूवरून चिनी व युरोपियन – विशेषतः ब्रिटिश यांच्यांत तीन वेळां युद्ध झालें. १९०६ सालीं चीन व ब्रिटिश हिंदुस्थान यांच्यांत करार होऊन चीननें अफूचें व्यसन पूर्णपणें बंद करावें व औषधा-पुरती अफू हिंदुस्थानांतून मागवावी असें ठरलें !

**कसरत कंपनी :** या कंपनीचें वर्णन करतांना व्हर्नच्या डोळ्यां-पुढें बार्नमचा सुप्रसिद्ध 'ग्रेटेस्ट शो ऑन् दि अर्थ' होता. आपल्या सर्कशीला इतकें गर्विष्ठ नांव देणारा अमेरिकन पी. टी. बार्नम् ही एक विलक्षण वल्ली होती. त्याच्या 'सर्कशी'त दोन फूट उंचीचा एक बुटका, अमेरिकन अध्यक्षांची एक सेवानिवृत्त दाई, जेनी लिंड नांवाची प्रख्यात इंग्रज नटी असे अनेक नमुने असत. खिशांत दमडी नसतांना या गृहस्थानें एक अमेरिकन म्यूझियम उधारीवर घेतला आणि एका वर्षांत पैशाची फेड केली. अत्यंत बेदरकार प्रसिद्धिपटु म्हणून त्याची ख्याति होती. त्यानें लाखों डॉलर मिळवले व घालवले.

**सान फ्रान्सिस्को :** कॅलिफोर्नियाच्या पश्चिम किनाऱ्यावरचें मोठें बंदर. सान फ्रास्सिस्को डोंगराळ भागांत असून शहरांत मोठमोठे सुंदर बगीचे आहेत. चार वेळां या शहराची भूंकपानें धूळदाण केली. १९०६ सालीं भूकंपानंतर लगेच भयंकर आग लागली. तींत हजारों इमारती भस्मसात् झाल्या. ५० कोटी रुपयांचें नुकसान झालें. अलीकडे झंझावातानें असेंच 'फ्रिस्को'चें नुकसान झालें होतें.

**गोल्डन गेट :** सान फ्रान्स्कोच्या आखातांत शिरतांना जी निरुंद पण सुप्रकाशित खाडी लागते तिला 'गोल्डन गेट' हें नांव आहे.

सेंट्रल पॅसिफिक : अमेरिकेंत पूर्वपश्चिम रेल्वे शाखा वेगवेगळ्या कंपन्यांकडे असत. आतां सान फ्रान्सिस्कोपासून न्यूयॉर्कपर्यंत एकच अखंड रेल्वे प्रवास करतां येतो. फिलिअस फॉगनें अमेरिकेला भेट दिली त्यानंतर दोनतीन वर्षांतच 'यूनियन पॅसिफिक' या नांवाखालीं ही व्यवस्था अमलांत आली.

न्यूयॉर्क : एक कोटी ( फॉगच्या काळीं १० लक्ष ) वस्तीचें हें प्रचंड शहर हडसन नदीच्या अनेक मुखांजवळ मिळून वसलें आहे. त्याची लांबीरुंदी ३७६५ चौरस मैल असून शहराचे पांच परगणे आहेत. मुंबई-प्रमाणेंच न्यूयॉर्कदेखील बेटांचें शहर आहे आणि हीं बेटें एकमेकांना जोडणारे एकंदर २५ मैल लांबीचे पोलादी पूल (यांतच ६ कोटी डॉलर खर्चून बांधलेला ब्रुकलिन ब्रिज येतो) म्हणजे न्यूयॉर्क नगरीचीं भूषणें आहेत.

न्यूयॉर्क बंदरांत शिरतांनाच १५१ फूट उंचीच्या 'स्वातंत्र्यदेवी' पुतळ्याचें दर्शन होतें. हा पुतळा एवढा प्रचंड आहे कीं त्याच्या डोक्यावर ४० माणसें बसूं शकतील!

न्यूयॉर्कचें सगळेंच अवाढव्य. 'एंपायर स्टेट' सारख्या शंभर मजली गगनभेदी इमारती तिथें आहेत आणि त्या इमारतींत वाल्डॉर्फ ॲस्टोरियासारखीं जगांतलीं सर्वांत बादशाही हॉटेलेंही आहेत. एकंदर ३७५ म्युनिसिपालिट्या न्यूयॉर्क शहराचें काम पाहातात.

डब्लिन : हें आतां स्वतंत्र आयर्लंड ऊर्फ आयरचें मुख्य शहर आहे. आयर्लंडच्या उत्तर भागांतला जो छोटा प्रदेश अद्याप ब्रिटिश हुकमतीखालीं आहे त्याची राजधानी बेलफास्ट.

## : २ : कांहीं प्रश्न

फिलिअस फॉगच्या पृथ्वीप्रदक्षिणेची ही अजब कथा वाचल्यावर कांहीं प्रश्न साहजिकच मनांत उभे राहातात. त्यांचीं उत्तरें देण्याचा ज्यानें त्यानें

विचार करावा.

( १ ) प्रवासापरी प्रवास आणि गोष्टीपरी गोष्ट — खरोखरच ही एक असामान्य कादंबरी आहे ! गोष्ट सांगतां सांगतां यात्रा घडवणारीं अशीं आणखी कांहीं पुस्तकें असतील का मराठींत किंवा इंग्रजींत ?

( २ ) मॅगेलन, मार्को पोलो, कोलंबस यांचे प्रवास असेच चटकदार असतील का ?

( ३ ) सिंदबादच्या सफरीही पुन्हा वाचल्या पाहिजेत. त्यांतली माहिती सर्वस्वीं खरी नसली तरी तिला थोडा फार सत्याचा आधार असेल, नाहीं ?

( ४ ) पण काय हो ? ही सगळी धडपड फिलिअस फॉगनें कशासाठीं केली ? केवळ पैज जिंकण्यासाठीं ?— कारण तसें म्हणाल, तर इतके देश तो हिंडला पण त्यांतलें एक तरी स्थळ पाहायला त्याला वेळ मिळाला का? त्याचा आदर्श म्हणजे घड्याळ !

प्रवास करण्याची ही तऱ्हा बरोबर आहे का ?

( ५ ) पण फॉगला दोष देण्यांत काय अर्थ ? एकाच ध्येयानें तो झपाटलेला होता, नाहीं का ? खरोखर तें ध्येय गांठण्यासाठीं त्यानें जी धडपड केली तिचें कौतुकच करायला नको का ? काय विलक्षण स्वभावाचा माणूस होता तो ! त्याचें एक स्वभावचित्रच रेखाटलें पाहिजे.

( ६ ) फॉगला 'यंत्रासारखा माणूस' असें म्हटलें आहे, तें सर्वस्वीं खरें आहे कां ?

( ७ ) आणि खरेंच, फॉगचें चित्र रेखाटतांना आपल्या पासपार्तूला विसरून मुळींच चालायचें नाहीं. कारण नोकरामुळेंच तर मालकाला उठाव मिळाला आहे म्हणे !

पण याचा काय बरें अर्थ ?

( ८ ) इतकीं अचाट साहसें फॉगनें केलीं, त्यांत सर्वांत मोठें साहस कोणतें बरें ? मोठा विचार करण्यासारखाच हा प्रश्न आहे !

( ९ ) फिलिअस फॉगनें आपल्या या 'सूरसपाट्यां'त बराचसा काळ हिंदुस्थानांत घालवला. इथल्या स्थळांचें त्यानें केलेलें वर्णन बरोबर आहे ना ?

सेंट्रल पॅसिफिक : अमेरिकेंत पूर्वपश्चिम रेल्वे शाखा वेगवेगळ्या कंपन्यांकडे असत. आतां सान फ्रान्सिस्कोपासून न्यूयॉर्कपर्यंत एकत्र अखंड रेल्वे प्रवास करतां येतो. फिलिअस फॉगनें अमेरिकेला भेट दिली त्यानंतर दोनतीन वर्षांतच 'यूनियन पॅसिफिक' या नांवाखालीं ही व्यवस्था अमलांत आली.

न्यूयॉर्क : एक कोटी ( फॉगच्या काळीं १० लक्ष ) वस्तीचें हें प्रचंड शहर हडसन नदीच्या अनेक मुखांजवळ मिळून वसलें आहे. त्याची लांबीरुंदी ३७६५ चौरस मैल असून शहराचे पांच परगणे आहेत. मुंबई-प्रमाणेंच न्यूयॉर्कदेखील बेटांचें शहर आहे आणि हीं बेटें एकमेकांना जोडणारे एकंदर २५ मैल लांबीचे पोलादी पूल (यांतच ६ कोटी डॉलर खर्चून बांधलेला ब्रुकलिन ब्रिज येतो) म्हणजे न्यूयॉर्क नगरीचीं भूषणें आहेत. न्यूयॉर्क बंदरांत शिरतांनाच १५१ फूट उंचीच्या 'स्वातंत्र्यदेवी' पुतळ्याचें दर्शन होतें. हा पुतळा एवढा प्रचंड आहे कीं त्याच्या डोक्यावर ४० माणसें बसूं शकतील!

न्यूयॉर्कचें सगळेंच अवाढव्य. 'एंपायर स्टेट' सारख्या शंभर मजली गगनभेदी इमारती तिथें आहेत आणि त्या इमारतींत वाल्डॉर्फ अॅस्टोरियासारखीं जगांतलीं सर्वांत बादशाही हॉटेलेंही आहेत. एकंदर ३७५ म्युनिसिपालिट्या न्यूयॉर्क शहराचें काम पाहातात.

डब्लिन : हें आतां स्वतंत्र आयर्लंड ऊर्फ आयरचें मुख्य शहर आहे. आयर्लंडच्या उत्तर भागांतला जो छोटा प्रदेश अद्याप ब्रिटिश हुकमतीखालीं आहे त्याची राजधानी बेलफास्ट.

: २ :

## कांहीं प्रश्न

फिलिअस फॉगच्या पृथ्वीप्रदक्षिणेची ही अजब कथा वाचल्यावर कांहीं प्रश्न साहजिकच मनांत उभे राहातात. त्यांचीं उत्तरें देण्याचा ज्यानें त्यानें

विचार करावा.

( १ ) प्रवासापरी प्रवास आणि गोष्टीपरी गोष्ट – खरोखरच ही एक असामान्य कादंबरी आहे ! गोष्ट सांगतां सांगतां यात्रा घडवणारीं अशीं आणखी कांहीं पुस्तकें असतील का मराठींत किंवा इंग्रजींत ?

( २ ) मॅगेलन, मार्को पोलो, कोलंबस यांचे प्रवास असेच चटकदार असतील का ?

( ३ ) सिंदबादच्या सफरीही पुन्हा वाचल्या पाहिजेत. त्यांतली माहिती सर्वस्वीं खरी नसली तरी तिला थोडा फार सत्याचा आधार असेल, नाहीं ?

( ४ ) पण काय हो ? ही सगळी धडपड फिलिअस फॉगनें कशासाठीं केली ? केवळ पैज जिंकण्यासाठीं ?— कारण तसें म्हणाल, तर इतके देश तो हिंडला पण त्यांतलें एक तरी स्थळ पाहायला त्याला वेळ मिळाला का? त्याचा आदर्श म्हणजे घड्याळ !

प्रवास करण्याची ही तऱ्हा बरोबर आहे का ?

( ५ ) पण फॉगला दोष देण्यांत काय अर्थ ? एकाच ध्येयानें तो झपाटलेला होता, नाहीं का ? खरोखर तें ध्येय गांठण्यासाठीं त्यानें जी धडपड केली तिचें कौतुकच करायला नको का ? काय विलक्षण स्वभावाचा माणूस होता तो ! त्याचें एक स्वभावचित्रच रेखाटलें पाहिजे.

( ६ ) फॉगला 'यंत्रासारखा माणूस' असें म्हटलें आहे, तें सर्वस्वीं खरें आहे कां ?

( ७ ) आणि खरेंच, फॉगचें चित्र रेखाटतांना आपल्या पासपार्तूला विसरून मुळींच चालायचें नाहीं. कारण नोकरामुळेंच तर मालकाला उठाव मिळाला आहे म्हणे !

पण याचा काय बरें अर्थ ?

( ८ ) इतकीं अचाट साहसें फॉगनें केलीं, त्यांत सर्वांत मोठें साहस कोणतें बरें ? मोठा विचार करण्यासारखाच हा प्रश्न आहे !

( ९ ) फिलिअस फॉगनें आपल्या या 'सूरसपाट्यां'त बराचसा काळ हिंदुस्थानांत घालवला. इथल्या स्थळांचें त्यानें केलेलें वर्णन बरोबर आहे ना ?

मुंबईच्या खांदेरी, उंदेरी, साष्टी, ट्रॉम्बे बेटांचा व्हर्ननें नुसता उल्लेख केला आहे. त्यांची – इतकेंच काय, आपल्या मुंबई शहराची सर्व माहिती आपल्याला हवी. ती आहे का ?

( १० ) आणि समजा, आपणही पृथ्वीप्रदक्षिणेला निघालों; तर... आपण पैजेवर आपला प्रवास कसा लवकरांत लवकर उरकूं ?

## : ३ : आजकालची पृथ्वीप्रदक्षिणा

पृथ्वी वर्तुळाकार आहे ही समजूत आपल्याकडे वेदकाळांतसुद्धा होती. पण ती तबकडीसारखी सपाट आहे आणि आपण फार कडेला गेलों तर कांठावरून पडूं अशी आपल्या पूर्वजांना भीति वाटत असे. या बाबतींत ग्रीक पंडित आपल्यापेक्षां पुढें गेले होते. प्लेटोनें २३५० वर्षांपूर्वींच पृथ्वी चेंडूसारखी गोल असल्याचें सांगितलें होतें म्हणतात. पण पृथ्वीचा वाटोळेपणा नक्की सिद्ध केला तो इसवी सनाच्या सुरवातीला एरॅस्टो-थेनीज् नांवाच्या माणसानें. एरॅस्टोथेनीजनें पृथ्वी वाटोळी आहे हें सिद्ध केलें, एवढेंच नाहीं तर तिचा परीघ २६,००० मैल आहे असें दाखवून दिलें. (तो २४,९०२ मैल असल्याचें आतां सर्वांनीं मान्य केलें आहे. पण त्या काळीं एरॅस्टोथेनीजनें केलेला अंदाज पुष्कळच बरोबर म्हटला पाहिजे. ) त्यानें हा अंदाज कसा बांधला ? त्यासाठीं त्यानें एक युक्ति केली.

एरॅस्टोथेनीज् अलेक्झांड्रियांत ग्रंथपाल म्हणून काम करीत असे. या शहरापासून ५२० मैल दक्षिणेला सईन गांवीं एक खोल विहीर होती. जूनच्या २१ तारखेला दुपारीं बारा वाजतां या विहिरींत सूर्यप्रकाश इतका थेट पडला कीं विहिरीच्या तळापर्यंतचा भाग उजळून निघालेला त्याला दिसला. याचा अर्थ या ठिकाणीं सूर्य अगदीं डोक्यावर होता. एरॅस्टोथेनीज्

इथून परत अलेक्झांड्रियाला गेला. तिथें त्यानें खड्डा खणून एक उंच खांब पक्का आणि शक्य तेवढा ताठ उभा ( म्हणजे पृथ्वीशीं ९० अंशांचा कोन करून ) पुरला. पुढल्या २१ जून रोजीं दुपारीं १२ वाजतां या खांबाची सावली कशी पडते ती त्यानें पाहिली. म्हणजे खांबाचा शेंडा व सावलीचा शेंडा जोडून पाहिला. आणि त्याला असें दिसलें कीं सावलीनें पृथ्वीशीं ७½ अंशांचा कोन केलेला आहे. याचाच अर्थ असा कीं हा खांब जर असाच पृथ्वीच्या मध्यबिंदूपर्यंत रेटला आणि सईन गांवची विहीरही मध्यापर्यंत खणली, तर खांब आणि विहीर एकमेकाला ७½ अंशांचा कोन करून मिळतील. आतां पृथ्वी वाटोळी आहे आणि कोणत्याही गोलाचे ३६० अंश असतात. अलेक्झांड्रिया व सईन या दोन ठिकाणांतलें अंतर ५२० मैल होतें. ७½ अंशांना ५२० मैल या हिशेबानें ३६० अंशांना २६,००० मैल होतात. हेंच पृथ्वीभोवतालचें एकंदर अंतर किंवा पृथ्वीचा परीघ.

पृथ्वी वाटोळी आहे असें एकदा कळल्यावर एका जागेवरून निघालेला माणूस थेट समोर समोर चालला तर अखेरीस पुन्हा पहिल्या जागीं येईल हें उघडच झालें. पण एवढें कळूनसुद्धा पृथ्वीप्रदक्षिणा करण्याचें धाडस कित्येक वर्षं कोणीं केलें नाहीं. याचें कारण त्या काळीं प्रवास दीर्घ मुदतीचा व धोक्याचा होता. शिवाय पुष्कळ जण तर असेंच समजत कीं पृथ्वी गोल असली तरी तिच्यावर आपला देश एवढीच जमीन असावी आणि बाकीचा सर्व समुद्र असावा, तेव्हां लांब जाऊन करायचें काय!

पंधराव्या शतकांत कोलंबसानें असा प्रयत्न केला. पण तो अपुरा राहिला आणि हिंदुस्थान समजून त्यानें अमेरिकेचा शोध लावला हें आपल्याला माहीत आहे. पुढें १५१९ सालीं मॅगेलननें पृथ्वीभोवतीं पहिली सफ़र केली अशी एक समजूत आहे; ती खोटी आहे. कारण मॅगेलन परत आला नाहीं. वाटेंतच मेला. त्याचा पासपार्टूसारखा एक इमानी नोकर होता. त्याचें नांव पिगाफेटा. यानें बरोबर कांहीं माणसें घेऊन जहाजांतून पहिली पृथ्वीप्रदक्षिणा केली. प्रदक्षिणा जवळ जवळ पुरी करून त्यांचें जहाज स्पेनच्या किनाऱ्यालगत असलेल्या केप व्हर्दे बेटाला लागलें. तिथल्या लोकांकडून त्याला कळलें कीं आज ९ जुलै

१५२२ ही तारीख आहे. त्यानें आपली डायरी उघडून पाहिलें, तों आज १० जुलै १५२२ तारीख असायला हवी !

पिगाफेटा अतिशय व्यवस्थित माणूस होता. त्यानें आपल्या प्रवासाचीं सर्व टिपणें लिहिलीं होतीं आणि प्रवासाचा प्रत्येक दिवस डायरींत नमूद केला होता. मग असा घोटाळा कसा झाला ?

खूप खूप विचार केल्यानंतर त्याला त्या घोटाळ्याचा उलगडा झाला. तो कसा तें या पुस्तकाच्या वाचकांना सांगायला नकोच. हा अत्यंत मनोरंजक इतिहास वाचल्यावर असें वाटायला लागतें कीं ज्यूल व्हर्नला आपली कादंबरी पिगाफेटावरून तर सुचली नसेल ?


कांहीं असो. आतां प्रवासाचीं साधनें बदललीं आहेत. त्यामुळें पृथ्वीप्रदक्षिणेंतलें कौतुक आतां कमी झालें आहे ! फॉगनें पृथ्वीप्रदक्षिणा ८० दिवसांत केली आणि ८० दिवसांतला त्याचा जवळ जवळ प्रत्येक क्षण (एखाद्या वाहनांत नसायचा तेव्हांदेखील तो घड्याळाकडे पाहात अस्वस्थपणें येरझारा घालायचा. म्हणजे पायपीट चालूच !) एखाद्या वाहनांतून म्हणा किंवा पायीं म्हणा, धावपळ करण्यांत गेला. आगबोट, आगगाडी, हत्ती, घसरनौका अशीं नाना प्रकारचीं वाहनें त्यानें वापरलीं. आज तुमच्या आमच्यासारखा साधा (यंत्रासारखा नकोच. यंत्रासारखीं माणसें आजकाल अमेरिकन बॉम्बरमधून वाटेंत पेट्रोलसाठींही न थांबतां बरोबर ३ दिवस २२ तासांत जगाभोंवतीं चक्कर टाकूं शकतात !) माणूस जरी पृथ्वीप्रदक्षिणेला निघाला तरी त्याला एवढे दिवस लागणार नाहींत. फॉगला स्वप्नांतसुद्धा दिसलें नसेल असें जलद वाहन आजचा मनुष्य वापरूं शकतो. तें म्हणजे **विमान**. जमिनीवरून किंवा समुद्रावरून प्रवास करतांना ज्या अडचणी येतात त्या आकाशांत येत नाहींत. विमानच कोसळलें तर इलाज नाहीं. एरवीं आपण बिनधोक, आरामशीर आणि झपाट्यानें सबंध प्रवास पांच सहा दिवसांत उरकूं शकतो.

अमेरिकेंत वॉशिंग्टन इथें 'नॅशनल जिऑग्रफिक सोसायटी' नांवाची एक जुनी संस्था आहे. ती भौगोलिक संशोधनाचें फार मोठें काम करीत असते. या सोसायटीमार्फत आतांपावेतों आफ्रिकेंतल्या जंगलापासून तों बर्फमय ध्रुवप्रदेशापर्यंत, जगाच्या वेगवेगळ्या भागांत शंभरावर सफरी

निघाल्या आणि पूर्वी मिळाली नव्हती अशी माहिती मिळून मनुष्याच्या ज्ञानांत भर पडली. पृथ्वीबद्दल नवी माहिती मिळत गेली तसतसे जुने नकाशे निकामी ठरले आणि नवे बनवावे लागले. या सोसायटीनें १९०५ सालापासून आजपर्यंत जगाचे ७ नकाशे तयार केले. १९४३ सालीं युद्धकाळांत जगाचा नकाशा बनवल्यानंतर आतां १९५१ च्या डिसेंबरांत सोसायटीनें आपला नवीन नकाशा तयार केला. या आठ वर्षांत जगांत किती विलक्षण उलथापालथी झाल्या तें तुम्हांला माहीत आहेच. महायुद्धामुळें जग बदललें. जर्मनीला पूर्वपश्चिम दोन्ही बाजूंनीं कात्री लागली, पोलंडचा फार मोठा भाग रशियानें घेतला; जर्मनी व इटली यांच्या आफ्रिकेंतल्या 'वसाहती' खलास झाल्या; हिंदुस्थान स्वतंत्र होऊन इथलीं संस्थानें नष्ट झालीं; इस्रायल, जॉर्डन, इंडोनेशिया व पाकिस्तान हीं नवीं राष्ट्रें जन्माला आलीं. (अगदीं परवां परवां उत्तर आफ्रिकेंतला लिबिया स्वतंत्र झाला.) कांहीं देशांचीं किंवा गांवांची नांवें बदललीं. उदाहरणार्थ ताइवानला आतां फॉर्मोसा म्हणतात. बटाव्हियाचें जकार्ता असें नामकरण झालें आहे आणि बँकॉकला क्रुंगथेप नांव मिळालें आहे. फ्रान्सच्या वर्चस्वाखालचीं मध्यपूर्वेंतलीं लेव्हान्ट संस्थानें आतां सिरिया व लेबनॉन या नांवांनीं ओळखलीं जातात. हे सर्व बदल नकाशांत नमूद व्हायला हवेत ना!

आपल्या नकाशाला पक्कें रूप देण्यापूर्वीं शेवटची पाहणी करण्यासाठीं नॅशनल जिऑग्रफिक सोसायटीनें आपल्या एका तज्ज्ञ अधिकाऱ्याला पृथ्वीप्रदक्षिणेला पाठवलें. विमानानें जगाभोंवतीं फिरून आल्यावर सोसायटीच्या मासिकांत त्यानें एक लेख लिहिला; त्यालाही 'ऐंशी दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा' असेंच नांव त्यानें दिलें. पण त्यांत त्यानें म्हटलें कीं 'ज्यूल व्हर्नच्या फिलिअस फॉगप्रमाणें मीं ८० दिवस घेतले असले तरी त्यांतले प्रत्यक्ष प्रवासासाठीं फक्त ६ दिवस मला लागले. बाकीचे ७४ दिवस मीं जगांतलीं वेगवेगळीं प्रेक्षणीय स्थळें पाहण्यांत घालवले. या गृहस्थानें आपला प्रवास कसकसा केला तें थोडक्यांत पाहाणें मनोरंजक ठरेल.

प्रथम त्यानें 'पॅन अमेरिकन एअरवेज' च्या कचेरींत जाऊन तिकीट विकत घेतलें. अनेक घड्या घातलेलें तें तिकीट उलगडून पाहिलें तर




= विमानमार्ग ] विमानानें पृथ्वीप्रदक्षिणा [ विमानटप्पे ●

त्याची लांबी ११ फूट भरेल. म्हणजे त्याच्या ३१,००० मैल लांबीच्या प्रवासाला शोभेसेंच तें तिकीट होतें. तिकिटाची किंमत १,९४३ डॉलर म्हणजे ७,७०० रुपये पडली. एवढ्या पैशांत आज या महागाईच्या काळांतसुद्धा अत्यंत आरामशीरपणें पृथ्वीप्रदक्षिणा करतां येते. फॉगप्रमाणें हजारों पौंड उधळायला नकोत.

अमेरिकेच्या पूर्वकिनाऱ्याजवळ न्यू फाऊंडलंड हें प्रसिद्ध मासळी बेट आहे. तिथल्या गॅंडर गांवीं प्रवासीबुवांचा पहिला मुक्काम झाला. तिथून निघाल्यानंतर मात्र अर्धा अॅटलांटिक ओलांडून विमान पेट्रोल घेण्यापुरतें आइसलॅंडमध्यें थांबलें. या बर्फाच्या प्रदेशांत हेक्ला नांवाचा सुप्त ज्वालामुखी आहे. त्याच्या तोंडांतून निघणारी धुराची पताका आणि वातना योकुल नांवाची प्रचंड हिमनदी त्यानें पाहिली. पण कुठेंही न थांबता सबंध अॅटलांटिक ओलांडून त्यानें नॉर्वेचा दंतुर किनारा गांठला. किनारा असा दंतुर बनवणारे नॉर्वेतील फिओर्ड किंवा समुद्रखिंडीही त्यानें पाहिल्या. या खिंडींमध्यें युद्धकाळांत जर्मन पाणबुड्या लपायच्या. मोठमोठीं आरमारी युद्धें नॉर्वेच्या किनाऱ्याजवळ झालीं आणि आपल्या फौजा उतरवण्याचे दोस्तांचे सर्व प्रयत्न फसले. १,४०० फूट उंचीच्या इथल्या एका बर्फाच्छादित शिखरावर १९५२ च्या फेब्रुवारींत बर्फावरून घसरण्याची ऑलिंपिक शर्यत व्हायची होती, तिची तयारी आपल्या प्रवाशानें पाहिली. नॉर्वेची राजधानी ऑस्लो इथें विमान उतरलें होतें. तिथून डेनमार्कमध्यें कोपन हेगनला गेल्यावर यानें सहज एकाला 'गुडमॉर्निंग' केलें तेव्हां तो म्हणाला, "मॉर्निंग कसली ! ही आफ्टरनून आहे !"

कोपनहेगनहून विमान लंडनकडे निघालें. वाटेंत जर्मनांना दोन युद्धांत जाचक ठरलेलें हेल्गोलॅंड बेट लागलें. दुसऱ्या महायुद्धांत तें जिंकून हिटलरनें आपला तोफखाना तिथें ठेवला होता.

फ्रिजियन बेटें, उत्तर समुद्र वगैरे ओलांडून विमान लंडन शहरीं पोचलें. तिथें 'लॉइड्स'मध्यें या गृहस्थाला कांहीं काम होतें. तेव्हां तिथेंच 'कॅप्टन्स रूम' मध्यें त्यानें खाना घेतला. 'लॉइडस्' ही जगांतली मोठी बॅंक व विमा कंपनी आहे. नेपोलियनचा विमा इथें उतरला होता !

लंडनहून परत युरोपकडे येतांच हॉलंडमधलें आम्स्टर्डाम हें जवाहीर

व्यापाराचें केंद्र, आणि जर्मनीतलें फ्रँकफुर्ट ठाणें या दोन शहरांत तो थांबला. वाटेंत युद्धांत उध्वस्त होऊन आतां दुरुस्तीच्या मार्गावर असलेला ऱ्हाइन नदीच्या कांठचा जर्मनीचा उद्योगी प्रदेश लागला. त्याचें नांव रूहर. इथें डार्मस्टाटच्या कारखान्यांवर तर दोस्तांनीं एका रात्रींत अडीच लक्ष टन बाँब टाकले होते. तिथली लोकसंख्या १ लक्ष १५ हजार होती ती ४० हजारांवर गेली !

जर्मनीच्या बव्हेरिया प्रांतांत रॉदेनबूर्ग नांवाचें शहर आहे. १७ व्या शतकांत तें ब्रिटिशांनीं जिंकलें होतें. त्या वेळीं त्यांच्या सेनापतीनें सर्व नगरपित्यांना फासावर चढवण्याचा हुकूम दिला. फक्त 'जो कोणी एका दमांत पाऊण गॅलन दारू पिईल त्याला शिक्षा माफ!' अशी गमतीदार अट घातली आणि एक अवलिया या परीक्षेला उतरला. तेव्हांपासून रॉदेनबुर्गमध्यें दरसाल या दिवशीं उत्सव करून या ऐतिहासिक प्रसंगाचें नाटक करतात. तेंही आपल्या प्रवाशाला पाहायला मिळालें. तो पॅरिसला पोचला तेव्हांही त्याला अशीच एक सुवर्णसंधी मिळाली. कारण पॅरिस शहराचा २,००० वा वाढदिवस या वेळीं साजरा होत होता.

स्वित्झर्लंड दोन कारणांसाठीं प्रसिद्ध आहे. एक तर युरोपचें काश्मीर म्हणून आणि दुसरें स्विस लोक घड्याळाचे उत्कृष्ट कारागीर आहेत म्हणून. जिनीव्हा इथें आर्जेन्टिनाच्या अध्यक्षांसाठीं तयार होत असलेलें १६,००० रुपये किमतीचें एक घड्याळ या गृहस्थानें पाहिलें. त्यांत सेकंद, मिनिट, तास, वार, तारीख, महिना, चंद्राची कळा, चार वर्षांनीं येणारी फेब्रु-वारीची २९ वी तारीख हें सर्व दाखवलेलें असून वाटल्यास दर मिनिटाला ठोके पडावेत अशी सोय केलेली होती !

आल्प्सच्या बर्फमय प्रदेशावरून जनरल फ्रँकोच्या स्पेनमधील बार्सिलोना शहरीं थांबून प्रवासी पुढें रोमला गेला. वाटेंत नेपोलियननें नांवाजलेलीं एल्बा व कॉर्सिका बेटें लागलीं. पाँपी शहराचा नाश करणाऱ्या वेसुवियस पर्वतांतून अजूनही म्हणे मधून मधून धूर निघत असतो.

इटलीच्या पूर्वेकडे एड्रियाटिक ओलांडून गेल्यावर अथेन्स हें प्राचीन शहर लागलें. ग्रीक लोक पुराणांत लढत तितक्याच शौर्यानें गेल्या महायुद्धांत लढले होते. त्या वेळीं जे कित्येक जण देशोधडीला लागले त्यांच्यासाठीं

‘ पुनरागमन दिन ’ राजानें याच सुमाराला जाहीर केला होता.

अथेन्समधल्या अक्रोपोलिससारख्या पडक्या इमारती पाहून झाल्यावर एजियन व मार्माराच्या समुद्रावरून उड्डाण करून तुर्कस्तानमधली मिनार-नगरी इस्तंबूल त्यानें गांठली. कॉन्स्टंन्टाइन नांवाच्या रोमन राजानें जिंकल्यामुळें या शहराला कित्येक वर्षे कॉन्स्टॅन्टिनोपल म्हणत असत. पूर्व-पश्चिम गोलार्ध या ठिकाणीं जणूं मिळत आहेत असें आपल्या प्रवाशाला वाटलें. कारण त्याचा मोटार ड्रायव्हर एकाच वाक्यांत बोलून गेला, “ या अल्ला, ओके !”

यानंतर भूमध्यसमुद्रावरून ईजिप्तकडे. वाटेंत हिऱ्यांचा हारच जणूं अशी दीपमाळा दिसली. सुएजच्या कालव्यांतल्या जहाजांवरचे ते दिवे होते. दृश्य मोठें सुरेख होतें, पण सुएज भागांत याच वेळीं केवढी राजकीय आग पेटत होती !

कैरोनंतर सिरियाची दमास्कस व इराकची बगदाद् अशा जगांतल्या दोन जुन्या राजधान्या त्यानें बघितल्या. ज्यू लोकांचें इस्रायल हें नवें राष्ट्र स्थापन झालें तेव्हां एक लक्ष ज्यू रहिवासी हा अरबांचा प्रदेश सोडून तिकडे राहायला गेले.

दहा तासांत बगदादहून विमान कराचीला पोचलें. फाळणीनंतर आलेल्या निर्वासितांमुळें इथली लोकसंख्या २ लक्षांवरून १९ लक्षांवर गेलेली त्याला आढळली. इथून सरहद्द प्रांतांत पेशावरला जाऊन इतिहासप्रसिद्ध खैबर व कोहट या बंदुकवाल्या पठाणांनीं गजबजलेल्या खिंडीही आपला प्रवासी पाहून आला; आणि मग काश्मीरला जाऊन तिथली वनश्रीही त्यानें नजरेखालीं घातली.

गेलीं चार वर्षे रणांगण बनलेला हा प्रांत सोडून प्रवासी आमच्या दिल्ली शहरीं आला. आग्र्याला जाऊन पहाटेच्या चांदण्यांत ताजमहाल बघण्याचें पुण्यही त्यानें संपादन केलें.

या नंतरचा टप्पा सयाममधलें बँकॉक शहर. हा तिथें पोचायला आणि बँकॉकमध्यें बंडाळीम व्हायला एक गांठ पडली. बंडखोरांनीं मुख्य प्रधान मार्शल पिबुल संग्राम याला पळवून युद्धनौकेवर कैद करून ठेवलें होतें पण नौकेवर बॉंब पडतांच त्या गडबडींत पिबुल संग्रमानें पळ

काढला आणि मग बंडखोरांनींही पुन्हा त्यालाच प्रधानकी दिली !

ही झटपट क्रान्ति एका दिवसांत संपली आणि सर्व शांत: झालें. तेव्हां प्रवासीबुवा इथून निघाले आणि इंडोचीन राज्यावरून, दक्षिण चिनी समुद्रावरून हैनानकडे गेले. हैनान हें चँग-कै-शेकच्या ताब्यांत आहे. इथें आणि हाँगकाँगला लाल चीनमधून पळून आलेले हजारों चिनी 'निर्वासित' त्याला दिसले.

नंतर चँगच्या फॉर्मोसा बेटावरून उड्डाण करून विमान पेट्रोल घेण्यापुरतें ओकिनावा बेटावर थांबलें आणि मग सरळ जपानमध्यें टोकियोला गेलें. टोकियो प्रचंड शहर आहे; पण मजबूत नाहीं. गेल्या महायुद्धांत तर त्याचा ५५ चौरस मैल भाग नष्ट झाला. आतां पुन्हां तिथें नव्या इमारती उठत आहेत.

वेक बेटांत पुन्हा पेट्रोल घेतल्यावर होनोलुलु या जलक्रीडेसाठीं प्रख्यात असलेल्या बेटावर आपल्या प्रवाशानें विश्रांति घेतली. आणि मग इथून जें उड्डाण केलें तें थेट पॅसिफिक पार होऊन अमेरिकेकडे. तिथलीं सान-फ्रान्सिस्को व लॉस ॲंजेलीस हीं पूर्व किनाऱ्यावरचीं शहरें आणि प्रचंड व्यापार व प्रचंड डाकूगिरी यासाठीं नांवाजलेलें चिकागो शहर हीं त्याच्या ओळखीचींच गांवें होतीं. पण तिथेंही थोडा मुक्काम करून तो परत न्यूयॉर्कला जाऊन पोचला.

त्याचे एकंदर टप्पे ३० झाले आणि विमानप्रवासांत ६ दिवस गेले. बाकीच्या ७४ दिवसांचा त्यानें किती उत्कृष्ट उपयोग करून घेतला याची साक्ष 'जिऑग्रफिक सोसायटी'नें तयार केलेला नवा नकाशा देईल. या नकाशांत एकंदर ५४८८ ठिकाणें दाखवलेलीं आहेत. नकाशा दहा रंगांत छापून सोसायटीनें त्याच्या २१ लक्ष प्रती काढल्या आणि सोसायटीच्या मासिकाबरोबर नकाशा फुकट वाटला.

८८४